दैनिक मनन
तुमचा दैनंदिन भविष्यसूचक शब्द

अंक 4
ऑक्टो- नोव्हे-डिसे
2026

# शुभसंदेश

दैनिक मननासाठी



मोफत
विक्रीसाठी नाही

तान्हेला जीवाला जसे गार पाणी तसे दूर देशाहून आलेले शुभ वर्तमान होय ( नीती २५:२५)

Uebert & BeBe
ANGEL

GoodNews DAILY

# अंक 4 | 2026

## ऑक्टोबर - नोव्हेंबर - डिसेंबर

### वैयक्तिक माहिती

**नाव:**

**फोन नंबर:**

**या तिमाहीसाठीची उद्दिष्टे:**

### या भक्तिपर साहित्याचा सर्वाधिक प्रभाव साधण्यासाठी याचा वापर कसा करावा

गुडन्युज डेली तुम्हाला दररोज देवाच्या वचनातून वाढण्यास मदत करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. पुस्तक हळूहळू वाचा आणि त्यातील संदेशावर चिंतन करा.

प्रार्थना करा आणि भविष्यसूचक घोषणा विश्वासाने करा, देव तुमच्या जीवनात काम करेल यावर विश्वास ठेवा.

देवाच्या वचनाची तुमची समज मजबूत करण्यासाठी आणि त्याच्यासोबत एक सुसंगत वाटचाल करण्यासाठी दररोज बायबल वाचन आव्हान आणि पुढील अभ्यास शास्त्रांचे अनुसरण करा.

तुम्ही दररोज या भक्तीचा वापर करत असतांना, देवाचे वचन तुम्हाला बळ देईल आणि तुम्हाला विजयाकडे घेऊन जाईल अशी अपेक्षा करा,

गुडन्युज डेलीद्वारे देवासोबत तुमचा दैनंदिन वेळ आनंदात घालवा, देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

**भविष्यवक्ता युबर्ट एंजल**




# भक्तीबद्दल

गुड्न्यूज डेली भक्ती हा आपला दिवसाचा भविष्यसूचक शब्द आहे आणि वर्षाच्या प्रत्येक दिवशी आध्यात्मिक समृद्धी प्रदान करण्यासाठी काळजीपूर्वक लिहिलेला एक अत्यंत मानला जाणारा ख्रिश्चन स्रोत आहे. हे सखोल अंतर्दृष्टी, शक्तिशाली प्रकटीकरण आणि दररोज **भविष्यसूचक घोषणा** प्रदान करते ज्याचा उद्देश वाचकांना ख्रिस्त-केंद्रित जीवनाकडे मार्गदर्शन करणे आहे, जे परिवर्तनशील शिकवणी आणि संदेष्टा उबर्ट एंजेलच्या प्रकटीकरणात रुजलेले आहे. त्रैमासिक आधारावर प्रकाशित होणारी ही भक्ती तिच्या जागतिक व्याप्तीमुळे वेगळी आहे आणि भाषिक अडथळ्यांवर मात करण्यासाठी आणि त्याचे जीवन बदलणारे संदेश जगभरातील सर्वांसाठी उपलब्ध आहेत हे सुनिश्चित करण्यासाठी अनेक भाषांमध्ये विनामूल्य उपलब्ध आहे. प्रौढ, किशोरवयीन मुले आणि मुले या तीन अनोख्या आवृत्त्यांसह, गुडन्यूज डेली भक्ती प्रत्येक पिढीला भविष्यसूचक वचन आणते, कुटुंबांना विश्वास आणि प्रकटीकरणात एकत्र वाढण्यास सक्षम करते.

## यूबर्ट आणि बेव्हरली एंजेल

पूर्ण-वेळ सेवेच्या अनुभवाच्या विपुल संपत्तीसह, उएबर्ट आणि बेव्हरली एंजेल देवाच्या कृपेची सुवार्ता (युएन्जेलियन) सामायिक करण्यात आणि जगभरात भविष्यसूचक सेवेची प्रगती करण्यात प्रमुख आवाज म्हणून उदयास आले आहेत. स्पिरिच्युअल वॉरफेअर, प्रेयर बँक, सुपरनॅचरल पॉवर ऑफ द बिलीव्हर, ग्रेस ड्रिव्हन लाइफ आणि गुडन्यूज डेली भक्ती यासारख्या प्रभावी पुस्तकांचे सर्वाधिक विकी करणारे लेखक म्हणून, त्यांनी ख्रिश्चन साहित्यात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या दृष्टी, नावीन्यपूर्ण आणि गतिशील नेतृत्वासाठी प्रसिद्ध, उएबर्ट आणि बेव्हरली एंजेल हे अत्यंत मागणी असलेले कॉन्फरन्स स्पीकर्स आहेत. द गुड्न्यूज चर्च (स्पिरिट एम्बेसी) चे जागतिक प्रणेते आणि संस्थापक आणि प्रेषित पदाचे धारक म्हणून, त्यांनी जगभरातील लाखो लोकांच्या जीवनावर खोलवर प्रभाव पाडला आहे, गुडन्यूज प्रकटीकरण आणि देवाच्या कृपेची परिवर्तनीय शक्ती (युएन्जेलियन) पसरविण्याच्या त्यांच्या अढळ वचनबद्धतेमुळे.





# वैमानिकाच्या पट्टया

**१ करिंथ १५:५८ (MARVBSI)**
**'म्हणून माझ्या प्रिय बंधूंनो, प्रभूमध्ये तुमचे श्रम व्यर्थ नाहीत हे तुम्ही जाणून आहात; म्हणून तुम्ही स्थिर व अढळ व्हा आणि प्रभूच्या कामात सर्वदा अधिकाधिक तत्पर असा.**

विमानचालनात, वैमानिकाच्यापट्टया (stripes) पद आणि जबाबदारी दर्शवतात. एक किंवा दोन पट्टया प्रशिक्षणार्थी किंवा कनिष्ठ वैमानिक दर्शवतात, तीन पट्टया पूर्णपणे पात्र प्रथम अधिकारी ओळख देतात आणि चार पट्टया कर्णधार, जो मुख्य वैमानिक असतो, त्याचे प्रतिनिधित्व करतात. पट्टयाची संख्या त्यांनी त्यांच्या कौशल्यासाठी अनेक वर्षाच्या समर्पणाचे प्रतिक असते. वैमानिकाच्या कामाचे बाह्य स्वरूप दिसण्यापूर्वी, अनेक वर्षांचे समर्पण त्यामागे असते, आणि या सर्वांचे अखेरीस फळमिळते.

त्याचप्रमाणे, देवाच्या राज्याच्या विस्तारासाठी तुम्ही करत असलेल्या कार्याकडे दुर्लक्षहोत नाही. जसे तुम्ही विश्वासाने सेवा करता आणि प्रगती करता, तसे तुमच्या कष्टाचे फळ दिसूलागते. तुमची जबाबदारीची पातळी वाढते आणि तुमच्या श्रमाचे फळ स्पष्ट दिसू लागते. तुमच्या जीवना वरील देवाच्या आवाहनासाठी स्वतःला समर्पित करा आणि त्याचे आशीर्वाद तुमच्या जीवनात कसे ओतले जातात ते अनुभवा..

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मला तुझी निष्ठेने सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल तेझे आभार. मला माहित आहे की माझे मन तुझ्यावर केंद्रित ठेवल्यास मी कधीही अपयशी होऊ शकत नाही.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी परमेश्वराच्या आणि त्याच्या कार्याप्रती भक्तिपूर्ण जीवन जगतो, मी निष्ठेने त्याची सेवा करत असतांना, माझ्या आध्यात्मिक खुना प्रकट होत आहेत. जशा माझ्या जबाबदाऱ्या वाढत आहेत, तसाच माझ्या जीवनावरील देवाचा आशीर्वादही वाढत आहे.**

**पुढील अभ्यास**
इब्रीलोकांस ६:१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस २७४**
लूक १९:१-२७; स्तोत्रसंहिता १०३-१०४





GoodNews DAILY

# डार्ट बेडकाचे रंग

**याकोब१:१४-१५ (MARVBSI)**
**तर प्रत्येक माणूस आपल्या वासनेने ओढला जातो व भुलवला जातो तेव्हा मोहात पडतो.मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते; आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजवते.**

प्राण्यांच्या राज्यात, डार्ट बेडूक (dart frog) घनदाट जंगलांच्या आणि अरण्यांच्या जमिनीवरून सखल प्रदेशातून सरपटत असला तरी जगातील सर्वात आकर्षक प्राण्यांमध्ये त्याचे स्थान मोठे आहे. याचे कारण म्हणजे या बेडकाची त्वचा रंगीबेरंगी असते, एक चमकदार आवरण जे भक्षकांना इशारा देण्यासाठी असते. जरएखाद्या भक्षकाने त्याला इजा करण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्या त्वचेवर असलेल्या शक्तिशाली विषाचा परिणाम त्यांना भोगावा लागतो.

शत्रू नेहमीच उघडपणे किंवा स्पष्टपणे स्वतःची घोषणा करत नाही. परंतु ज्याप्रमाणे डार्ट फ्रोग स्वतःमध्ये एक संरक्षण बाळगतो ज्यामेले भक्षकांना दोनदा विचार करायला लावते, त्याचप्रमाणे देवाने तुम्हाला तुमचे संरक्षण म्हणून त्याचे वचन दिले आहे. दररोज देवाच्या वचनात स्वतःला मजबूत करून सैतानाच्या अक्रमणाना तोंडदेण्याचा तुमचा दृढ निश्चय आणि क्षमता बळकट करा. सैतानाच्या कपटीपणाला बळी पडू नका; तुम्हाला त्याच्या हल्ल्यांना तोंड देण्याची आणि ते निष्प्रभ करण्याची शक्ती देण्यात आली आहे.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, तुझ्या वचनाने मला सुसज्ज केल्याबद्दल मी तुझे आभार मानतो. पवित्र शास्त्राच्या ज्ञानामुळे, शत्रू मला कधीही अंधारात ठेवू शकत नाही.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी सैतानाच्या उक्त्यांबद्दल अनभिज्ञ नाही. शत्रूच्या कपटीपणाचे स्वरूप काहीही असो, माझे जीवन देवाच्या वचनाने बळकट झाले आहे; सैतानाच्या हल्ल्यांचा माझ्यावर काहीही परिणाम होत नाही.**

**पुढील अभ्यास**
१ योहान २:१६

**३६५ बायबल आव्हान - दिवस २७५**
यशया ५६-५८; कलस्सैकर ४



# वटवाघूळा सारखे आंधळे

**यहोशवा ६:२ (MARVBSI)**
**परमेश्वर यहोशवाला म्हणाला, "पाहा, यरीहो, त्याचा राजा व त्याचे पराक्रमी वीर मी तुझ्या हाती दिले आहेत.**

तुम्हाला हे जाणून आछार्य वाटेल की "वटवाघूळा सारखे आंधळे" हा वाक्प्रचार जरी सामान्य असला, तरी वटवाघूळांना दिसत नाही ही एक कल्पना आहे. सर्व वटवाघूळ पाहू शकतात. तथापि, त्यांची ताकद 'इकोलोकेशन' मध्ये आहे, ही एक जैविक सोनार प्रणाली आहे जी त्यांना आवाजाद्वारे "पाहण्यास" मदत करते. ते उच्च-वारंवारतेचे आवाज काढतात जे वस्तूंवर आदळून प्रतिध्वनी म्हणून परत येतात, त्यांचा मेंदू आकार, अंतर आणि पोत निश्चित करण्यासाठी अर्थ लावतो.

ख्रिस्ती म्हणून, आपले स्थान निश्चत्ती चे साधन देवाचे वचन आहे. ते वचन स्पष्ट आहे: तुमची कल्पनाशक्ती हीच तुमची सृजनशील क्षमता आहे. यरीहो शहर यहोशवाच्या हाती दिले जाण्यापूर्वी, त्याला ते प्रथम पाहावे लागले. देवाने तुमच्यासाठी जे काही इच्छिले आहे ते सर्व प्राप्त करण्यासाठी, तुम्हाला प्रथम त्या सत्याची कल्पना करणे आवश्यक आहे. देवाच्या वचनाचा आवाज ऐका आणि त्याने तुम्हाला जे काही जीवन मूल्य दिले आहे ते सर्व पाहण्यास सुरुवात करा.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मी प्रार्थना करतो की मी माझ्या दैनंदिन जीवन जगात असताना, तुझे वचन ऐकून, तू मला विनामूल्य दिलेले सर्व काही मला प्राप्त होऊ दे .**

### भविष्यसूचक घोषणा

**यावर्षी माझ्यासमोर संधीचे असंख्य दारे उघडत असल्याचे मला दिसत आहे. जेव्हा मी देवाचे वचन ऐकतो, तेव्हा मला त्याच्या वचनाची प्रत्यक्ष पूर्तता होतांना दिसेल.**

**पुढील अभ्यास**
उत्पत्ती १३:१४-१५

**३६५ बायबल आव्हान - दिवस २७६**
यशाया ५९-६१; १ थेस्सलनी १



GoodNews DAILY

# देवाची अद्‌भूत पद्धत

**योहान ९:६ (MARVBSI)**
**असे बोलून तो भूमीवर थुंकला, थुंकीने त्याने चिखल केला; आणि तो चिखल त्या आंधळ्याच्या डोळ्यांना लावला,**

अनेक ख्रिस्ती लोक देवत्यांना आशीर्वाद किंवा चमत्कार कसा देईल यावर इतके लक्ष केंद्रित करतात की त्यांच्या विनंत्या त्याला सांगण्यापूर्वीच ते त्याच्या अडचणीची गणना करू लागतात. तरीही संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये, आपण पाहतो की देव तुम्हाला मदत करण्यासाठी विलक्षण पद्धती वापरू शकतो. आजच्या वाचनात, प्रभू येशूने स्वतःच्या थुंकीपासून चिखल बनवून आणि तो त्या माणसाच्या डोळ्यांवर लावून एका आंधळ्याला बरे केले. तो तितक्याच सहजतेने, केवळ बोटांची चुटकी वाजूनही त्यामाणसाला सहज बरे करू शकला असता.

हा उतारा दाखवून देतो की पद्धत कितीही विलक्षण किंवा असामान्य असली तरी, कोणत्याही नकारात्मक परिस्थितीतून तुमची सुटका करण्याचे सामर्थ्य देवाकडे आहे. ते कसे, काय किंवा केव्हा याची चिंता करू नका. तुम्ही अशा देवाची सेवा करता जो विलक्षण, अकल्पनीय चमत्कार करतो . त्याची पद्धत कोणतीही असो त्यावर विश्वास ठेवा,

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, देवा, मी या नव्या जगात वावरत असतांना मला मार्गदर्शन कर. मार्ग कोणताही असो, येशूच्या नावाने माझ्या कुटुंबावर आणि माझ्यावर आशीर्वाद पोहोचव.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी अद्भुत चमत्कार करणाऱ्या देवाची सेवा करतो! माझ्यासमोर असलेली परिस्थिती कितीही गुंतागुंतीची, कठीण किंवा अशक्य वाटत असली तरीही, मी त्यावर मात केली आहे कारण देवाने मला शत्रूवर विजय मिळविण्याचे सामर्थ्य दिले आहे.**

**पुढील अभ्यास**
१करिंथ १:२७

**३६५ बायबल आव्हान - दिवस २७७**
यशाया ६२-६४; १ थेस्सलनी २



GoodNews DAILY

# वचन हे तुमचे मोती आहे

**याकोब १:२२ (MARVBSI)**
**वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका; अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता.**

जग तुमच्या मुठीत आहे हा वाक्प्रचार संधी आवाक्यात आहेत यावर विश्वास ठेवण्यासाठी प्रोत्साहन म्हणून सर्वत्र ओळखला जातो. मात्र, त्याचा उगम शेक्सपियरच्या 'द मेरी वाइव्हज ऑफ विंडसर' या नाटकातून झाला आहे. मूळ वाक्प्रचार अशी कल्पना देतो की जगात खजिना दडलेला आहे परंतु तो ताकदीने आणि प्रयत्नांनी उघडला पाहिजे. संधी निष्क्रिय नसते; ती साधली जाते.

त्याचप्रमाणे, पवित्र शास्त्रात आपल्याला कृती, आज्ञाधारकपणा आणि विश्वासाद्वारे देवाची वचनांना धरून ठेवण्यास शिकवते. देवाचेवचन हे देवाच्या प्रत्येक मुलासाठी एक मार्गदर्शक पुस्तिका आहे, ज्यामध्ये आध्यात्मिक संपत्ती, यश आणि समृद्धी आणणारे मोती आहेत. केवळ वचन ऐकणे पुरेसे नाही; तुम्हाला त्यावर कृती करणे आवश्यक आहे. जसे आतील मोती मिळवण्यासाठी शिंपला उघडावा लागतो, त्याप्रमाणे खजिना प्राप्त करण्यासाठी तुम्ही वचनाला आचरणात आणले पाहिजे.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, तुझ्या वचनाचा अधिक मोठा अभ्यासक बनण्यास आणि त्यातील अनेक खजिने शोधून काढण्यास मला मदत कर. जेणेकरून मी त्यातील अनेक अनमोल ठेवा उलगडून पाहू शकेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाच्या वचनात आध्यात्मिक आणि भौतिक संपत्ती आहे, हे मोती मला वचनाच्या तत्त्वांवर कृती केल्याने मिळतात. मी जेव्हा शिकवणी लागू करतो, तेव्हा त्याचे परिणाम दिसून येतात. माझे जीवन प्रतिसाद देते, दरवाजे उघडतात आणि मी ज्यावर कार्य करतो ते दृश्यमान बदल होतो.**

**पुढील अभ्यास**
याकोब२:१७

**३६५ बायबल आव्हान - दिवस २७८**
यशया६५-६६; १ थेस्सलनी ३



# वचन दत्त देशात

**कलस्सै १:१३ (MARVBSI)**
**त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले.**

जीवनातील गोंधळ आणि संकटांचा सामना केल्यानंतर, अनेक लोक देवाकडे वळतात, जो त्यांना समस्या, दुर्दैवाचे ऋतू आणि संघर्षातून बाहेर काढण्यास सक्षम आहे. तथापि, ते अनेकदा हे विसरतात की तुम्हाला एखाद्या परिस्थितीतून बाहेर काढणे एवढेच देवाने त्याच्या वचनात दिलेले अभिवचन नाही. त्याची इच्छा आहे की तुम्हाला अंधारातून बाहेर काढून प्रकाशाच्या जीवनात आणावे.

इस्राएली लोकांनी अनेक दशके इजिप्तच्या राजवटीखाली घालवली आणि देवाच्या सामर्थ्याने मोशेच्या द्वारे त्यांना सुटका करण्यात आली. तरीही इजिप्तमधून त्यांच्या सुटकेने त्यांची कथा संपली नाही. जेव्हा त्यांनी दूधआणि मधाने वाहनाऱ्या, म्हणजेच वचन दिलेल्या भूमीत प्रवेश केला. तेव्हा त्याचे निर्गमन पूर्ण झाले. त्याचप्रमाणे, देवाने तुम्हाला त्याच्या राज्यात आणले आहे, जे आशीर्वाद, आरोग्य आणि समृद्धीने भरलेले आहे. त्याने तुम्हाला बाहेर काढले आणि हे सुनिश्चित केले की तुम्ही ज्यामध्ये प्रवेश केला आहे ते तुम्ही मागे सोडलेल्या गोष्टींपेक्षा मोठे आहे.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, तू मला ज्या प्रकाशात ठेवले आहेस त्या प्रकाशात चालण्यास मला मदत कर, जेणेकरून माझे जीवन तुझे खरे प्रतिबिंब बनू शकेल. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी सैतानाच्या तावडीतून सुटलो आहे. अंधाराच्या शक्तीचा माझ्यावर कोणताही प्रभाव नाही. देवाने मला केवळ संकटातूनच बाहेर काढले नाही, तर त्याने मला पूर्ण झालेल्या वचनाच्या भूमीतही आणले आहे.**

**पुढील अभ्यास**
प्रेषितांचीकृत्ये २६:१८

**३६५ बायबल आव्हान - दिवस २७९**
यिर्मया१-२; १ थेस्सलनी ४



GoodNews DAILY

# मर्फीचा नियम

**रोमकरांस पत्र८:२८ (MARVBSI)**
**परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांना म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांना देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात.**

मर्फीचा नियम हा निसर्गाचा कथित नियम आहे, जो असे सुचवतोकी जीवनात जे काही चुकीचे होऊ शकते ते नक्कीच घडते. विविध विनोदी म्हणींद्वारे या "नियमाला" प्रसिद्धी मिळाली असली तरी, अनेक लोक त्यांच्या जीवनात खरोखरच सर्वात वाईट परिणामांची अपेक्षा करतात, जणू काही हा एक गोष्ठ आहे. तथापि, देवाच्या प्रत्येक मुलासाठी, याच्या उलट सत्य आहे. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की सर्व गोष्टी आपले कल्याणच करतात.

मर्फीचा नियम असेलही, परंतु ख्रिस्ताचा नियम देखील आहे, एक आध्यात्मिक नियम जो यशाची आणि भरभराटीची हमी देतो. आशीर्वाद आणि विपुलतेने भरलेले जीवन जगणे हा ख्रिस्ती माणसाचा स्वभाव आहे. म्हणून, विनाशाची किंवा अपयशाची अपेक्षा करून आपले जीवन जगू नका. त्याऐवजी, दररोज महान गोष्टी घडण्याची अपेक्षा करण्यास सुरुवात करा.

### आजची प्रार्थना

**देवा, कृपेद्वारे तू मला मुक्तपणे दिलेल्या सर्व दानांबद्दल तुझे आभार! मी माझा आठवडा व्यतीत करत असताना, मला माहित आहे की सर्व गोष्टी मिळून माझे कल्याण करत आहेत.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझ्या जीवनात महान गोष्टी घडत आहेत! या वर्षी, माझ्या कुटुंबातील संकटे आणि दुर्दैव दूर झाले आहेत. येशूच्या नावाने मी आनंदाच्या बातमीची अपेक्षा करतो आणि वाट पाहतो!**

**पुढील अभ्यास**
यिर्मया २९:११

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८०**
यिर्मया ३-५; १ थेस्सलनी ५



GoodNews DAILY

# दैवी आरोग्य

**अनुवाद ७:१५ (MARVBSI)**
**आणि परमेश्वर तुझ्यापासून सर्व प्रकारचे रोग दूर करील. मिसर देशातल्या ज्या दुःखदायक व्याधी तुला ठाऊक आहेत, त्यांतली एकही तुला लागणार नाही; पण तुझ्या सर्व द्वेष्ट्यांना तो त्या लावील.**

ज्याक्षणी तुम्ही तुमच्या जीवनावर प्रभू येशू ख्रिस्ताचा प्रभुत्व कबूल केले, त्याच क्षणी तुम्हाला त्याच्या अस्तित्वाचे सार प्राप्त झाले. त्याच्या स्वभावाची चिरंतरता आत्ताच अनुभवणे हा तुमचा वाटा बनला आहे. तरीही अनेक ख्रिस्ती दैवी आरोग्यासाठी प्रार्थना करतात जे त्यांना तारणाच्या सामर्थ्याद्वारे आधीच प्राप्त झाले आहे.

वचन आपल्याला दाखवते की आजारपण हे पतन पावलेल्या जगाचा एक भाग आहे; तो देवाच्या मुलांच्या वाट्याला आला नाही. ज्या प्रमाणे देव रोग किंवा आजाराच्या बेड्यांनी बांधलेला नाही, त्याचप्रमाणे तुम्हीही नाही. ख्रिस्ताने वधस्तंभावर तुम्हाला जे मुक्तपणे दिले त्यानुसार तुमचे जीवन जगा. पुनरुत्थानाचे सामर्थ्य तुमच्यामध्ये प्रकट झाले आहे, केवळ मृत्यूनंतरच नाही तर अगदी इथे आणि आता. त्या सामर्थ्याला पकडून ठेवा!

### आजची प्रार्थना

**हे प्रभू येशू, आज मला दैवी आरोग्य दिल्याबद्दल तुझे आभार! ज्या क्षणी मी माझ्या जीवनावर तुझे प्रभुत्व कबूल केले, त्या क्षणी आजारपण आणि रोगांना नाहीसे होण्या शिवाय पर्याय राहिला नाही. मी उत्तम आरोग्यात चालतो यासाठी तुझे आभार.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझे जीवन देवाच्या चांगुलपणाची साक्ष देते. ख्रिस्ताद्वारे, आजारपणाचा माझ्या कुटुंबावर किंवा माझ्यावर कोणताही ताबा नाही. अलौकिक तेलाच्या या वर्षात, दैवी आरोग्य माझे आहे!**

**पुढील अभ्यास**
१ पेत्र २:२४

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८१**
लूक १९:२८-४८; स्तोत्रसंहिता १०५-१०६



Good News DAILY

# खळबळ म्हणजे पतन नव्हे

**२ करिंथ ४:१७ (MARVBSI)**
**कारण आमच्यावर येणारे तात्कालिक व हलके संकट हे आमच्यासाठी अत्यंत मोठ्या प्रमाणात सार्वकालिक गौरवाचा भार उत्पन्न करते;**

तुम्ही पाहिले आहे का की विमानातून प्रवास करताना, चढताना किंवा उतरताना बऱ्याचदा खळबळ (turbulence) सर्वात जास्त असू शकते? ती अस्थिरता उंचीतील बदलांसोबत किंवा विमानाच्या हवेच्या नवीन पातळीवरील हालचालीसोबत असू शकते. त्याचप्रमाणे, अनेक ख्रिस्ती लोकांना "खळबळजनक" परिस्थितीचा सामना करावा लागतो आणि ते गृहीत धरतात की सैतान यशस्वी होत आहे किंवा त्यांच्या जीवनाची घसरण होत आहे. तरीही जे प्रतिकार असल्यासारखे वाटते तो प्रत्यक्षात उन्नतीचा पुरावा असू शकतो.

काही साक्षींना संघर्षाची किंवा शुद्धीकरणाच्या ऋतूची आवश्यकता असते जेणेकरून प्रभूचा गौरव ते पाहणाऱ्यांना कळावा. जेव्हा तुमची परिस्थिती कठीण वाटत असेल तेव्हा काळजी करू नका किंवा ताण घेऊ नका; देव तुम्हाला पूर्वी कधीही नव्हते इतक्या उंचावर नेत आहे. तुमची सध्याची स्थिती हा पुरावा आहे की त्याने तुमच्यासोबतचे काम अद्याप पूर्ण केलेले नाही.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, उन्नती वेगवेगळ्या मार्गांनी येते हे ओळखण्यास मला मदत कर. परिस्थिती कितीही निराशाजनक वाटत असली तरी, भविष्यात येणाऱ्या नवीन उंची पाहण्याचे सामर्थ्य मला दे!**

### भविष्यसूचक घोषणा

**माझे विरोधक हा सिद्ध करतात की देव मला उन्नत करत आहे. मी आकाशात उडणाऱ्या विमानाप्रमाणे मी उंच भरारी घेत आहे. मी आजारपण, संघर्ष, वेदना आणि गरिबी जमिनीवरच मागे सोडून दिली आहे!**

**पुढील अभ्यास**
यशया ४८:१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८२**
यिर्मया ६-८; २ थेस्सलनी १




GoodNews DAILY

# रेटिक्युलर सक्रियकरण प्रणाली

**रोमकरांस पत्र ७:१५ (MARVBSI)**
**कारण मी काय करतो ते माझे मलाच कळत नाही; म्हणजे जे मी इच्छितो ते करतो असे नाही, तर जे मला द्वेष्य वाटते तेच करतो.**

जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट न करण्यावर लक्ष केंद्रित करता, तेव्हा अनेकदा तुम्ही नेमकी तीच गोष्ट करता जी तुम्हाला टाळायची असते. हे अंशतः रेटिक्युलर सक्रियकरण प्रणाली (RAS) द्वारे स्पष्ट केले जाऊ शकते. RAS हा तुमच्या मेंदूचा एक भाग आहे जो माहिती फिल्टर करतो आणि ज्यावर तुम्ही सर्वाधिक लक्ष केंद्रित करता त्याकडे तुमचे लक्ष वेधून घेतो. जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट न करण्याचा प्रयत्न करता, तेव्हाही तुमचा मेंदू त्यावर लक्ष केंद्रित करतो, ज्यामुळे ते तुमच्या विचारांमध्ये राहण्याची आणि तुमच्या कृतींवर प्रभाव टाकण्याची अधिक शक्यता असते.

आपल्याला जे करायचे नाही त्यावर आपले लक्ष केंद्रित करण्या ऐवजी, पवित्र शास्त्र आपल्याला जे चांगले आहे त्यावर आपले मन केंद्रित करण्याचे निर्देश देते. आपल्याकडे ख्रिस्ताचे मन आहे. जेव्हा तुम्ही समस्या थांबवण्यावर कमी आणि ती सोडवणाऱ्या देवावर जास्त लक्ष केंद्रित करता, तेव्हा तुमचा विचार बदलू लागतो, आणि ज्याने एकेकाळी तुमच्या लक्ष्यावर वर्चस्व गाजवले होते त्याचा प्रभाव गमावतो.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी प्रार्थना करतो की मी जसजसा मी वचनात वाढत जाईन, तसतसे माझे विचार आणि कृती येशूच्या सामर्थ्यशाली नावाने तुझा प्रतिबिंब बनोत!**

### भविष्यसूचक घोषणा

**माझ्याकडे ख्रिस्ताचे मन आहे. जेव्हा मी माझे लक्ष स्वर्गीय गोष्टींवर केंद्रित करतो, तेव्हा मी माझ्या जीवनात आतून परिवर्तन घडवत असतो!**

**पुढील अभ्यास**
१ करिंथकर २:१६

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८३**
यिर्मया ९-११; २ थेस्सलनी २



# तुझ्या विचारांसाठी एक नाणे

**२तीमथ्य २:१५ (MARVBSI)**
**तू सत्याच्या वचनाची योग्य विभागणी करून नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला, देवाच्या पसंतीस उतरलेला कामकरी, असा स्वत:ला सादर करण्यास होईल तितके कर.**

"तुझ्या विचारांसाठी एक नाणे" (a penny for your thoughts) हाएक लोकप्रिय वाक्प्रचार आहे, जो एखाद्या व्यक्तीचे विचार विकत घेण्याच्या कल्पनेतून आला आहे, विशेषत: जेव्हा ते शांत असतात किंवा विचारात हरवलेले दिसतात. हे अनेकदा गमतीने म्हटले जाते, परंतु तुम्हाला माहित आहे का की तुमचे विचार हे देवासाठी तुमच्या सर्वात मौल्यवान मालमत्तेपैकी एक आहेत?

खरी संपत्ती तुमच्या विचारांमध्ये आहे. साहित्य, रेडिओ आणि टेलिव्हिजन दररोज तुमच्या मनात जागा मिळवण्यासाठी स्पर्धा करतात. देवाचे लेकरू म्हणून, देवाच्या वचनाद्वारे तुमच्या वैयक्तिक विकासासाठी आणि ख्रिस्तासोबतच्या सहवासासाठी जागा देण्यास शिकणे हे तुमचे कर्तव्य आहे. तुमचे मन ख्रिस्ताला द्या. असे न केल्यास, तुम्ही तुमच्या जीवनाला कोणत्या संकटात टाकत आहात हे तुम्हाला उशीर होईपर्यंत दिसणार नाही.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मी आठवडाभर माझ्या कामात असताना, तुझ्या वचनाच्या अभ्यासात मला मार्गदर्शन कर. माझे मन पूर्णपणे नवीन करण्यास मला मदत कर, जेणेकरून माझ्या विचार करण्याच्या, प्रतिक्रिया देण्याच्या आणि जगण्याच्या जुन्या पद्धतींचा माझ्यावर यापुढे प्रभाव पडणार नाही. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझे विचार अब्जावधींपेक्षा अधिक मौल्यवान आहेत! जसजसे मी देवाचे वचन वाचतो, माझे जीवन प्रभू येशू ख्रिस्ताचे एक मोठे प्रतिबिंब बनते.**

**पुढील अभ्यास**
रोमकरांस १२:२

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८४**
यिर्मया १२-१४; २ थेस्सलनी ३



GoodNews DAILY

# यशात जोडलेले

**योहान १५:५ (MARVBSI)**
**मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहात; जो माझ्यामध्ये राहतो आणि मी ज्याच्यामध्ये राहतो तो पुष्कळ फळ देतो, कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हांला काही करता येत नाही.**

वनस्पतीशास्त्रात, कलमकरणे (grafting) ही एका रोपाची फांदी दुसऱ्या वनस्पतीच्या मुळाशी जोडण्याची प्रक्रिया आहे जेणेकरून ते दोन्ही एकच, कार्य करणारी वनस्पती म्हणून वाढतील. ख्रिस्ताने आपल्यासाठी नेमके हेच केले! तुम्ही ख्रिस्ताकडे येण्यापूर्वी, तुम्ही अंधाराने भरलेल्या, नाश पावणाऱ्या जगाचे होता. परंतु ज्या क्षणी तुम्ही ख्रिस्ताचा स्वीकार केला, त्याच क्षणी तुम्हाला यशाच्या जीवनात जोडले गेले!

या मानसिकतेने जगा: तुमचे जुने जीवन आता कोणत्याही अर्थाने तुमच्याशी जोडलेले नाही. प्रभू येशू ख्रिस्ताच्या मृत्यू आणि पुनरुत्थानाद्वारे तुम्हाला अंधाराच्या सत्तेतून सोडवण्यात आले आणि प्रकाशाच्या राज्यात आणण्यात आले. या नवीन जीवनात, तुम्ही फळ देण्यासाठी आणि भरभराट करण्यासाठी पूर्णपणे स्थित आहात. आज या वास्तवात चाला!

### आजची प्रार्थना

**देवा, भूतकाळ हा यापुढे माझ्या जीवनाचा स्रोत राहिला नाही हे मला दाखवल्याबद्दल आभार. यशस्वी होण्यासाठी तू मला अगदी योग्य ठिकाणी आणून ठेवलेआहेस!**

### भविष्यसूचक घोषणा

**मी यशात जोडला गेलो आहे. आजारपण, गरिबी आणि दुर्दैवी हे माझ्या मागील जीवनाचा भाग होता पण सैतान मला आता स्पर्श ही करू शकत नाही. माझ्या मध्ये ख्रिस्ताचे जीवन आहे.**

**पुढील अभ्यास**
कलस्सैकर १:१३

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८५**
यिर्मया १५-१७; १ तीमथ्य १



# हल्ला करणारा बैल

**नीतिसूत्रे ३:५-६ (MARVBSI)**
**'तू आपल्या अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव, आपल्याच बुद्धीवर अवलंबून राहू नकोस; ' 'तू आपल्या सर्व मार्गांत त्याचा आदर कर, म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल.**

हल्ला करणारा बैल सरळ रेषेतील वेग आणि अतूट वचनबद्धतेवर अवलंबून असतो. तीच ताकद, जेव्हा चुकीच्या दिशेने वापरली जाते, तेव्हा ती कमकुवतपणा बनते. वळू पकडणाऱ्याच्या दोरीला बैलावर मात करण्याची गरज नसते; फक्त कोनात थोडासा बदल त्याचे संतुलन बिघडवण्यासाठी पुरेसा असतो. चुकीच्या दिशेने लावलेली शक्तीमुळे अस्थिरता निर्माण करते.

त्याच प्रमाणे, अनेक ख्रिस्ती वेगाने आणि तीव्रतेने कार्य करतात, परंतु दाखवण्यासाठी कोणताही अर्थपूर्ण परिणाम त्यांच्याकडे नसतो. समस्या प्रयत्नांची नाही, तर दिशेची आहे. चुकीच्या दिशेने वेगाने जाणे हे स्थिर उभे राहण्यापेक्षा वाईट आहे. हे तुम्हाला प्रत्येक पावलावर देवाच्या योजने पासून दूर घेऊन जाते. जेव्हा तुमचा मार्ग चुकीचा असतो, जेव्हा तुमचा मार्ग चुकीचा असतो तेव्हा लहान अडथळे सुद्धा तुम्हाला मार्गावरून विचलित करू शकतात.

तुमच्या शक्तीला तुमच्याविरुद्ध काम करू देऊ नका. पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाचे अनुसरण करायला शिका. जेव्हा तुमची दिशा योग्य असते, तेव्हा तुमचे प्रयत्नांना फळ मिळते.

### आजची प्रार्थना

**प्रभू, मी तुझ्या पवित्र आत्म्याबद्दल आभारी आहे! मला माहित आहे की या आठवड्या पुढे जात असतांना, तू माझ्या प्रत्येक पावलाला मार्गदर्शन करत आहेस.**

### भविष्यसूचक घोषणा

**चुकीच्या दिशेने वेगाने धावणाऱ्या बैलाप्रमाणे नाही, तर माझी पावले पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनानुसार पडतात. जेव्हा मी माझ्यासाठी असलेल्या त्याच्या इच्छेशी स्वतःला जूळवून घेतो, तेव्हा अपयश अशक्य होऊन बसते.**

**पुढील अभ्यास**
रोमकरांस ८:१४

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८६**
यिर्मया १८-१९; १ तीमथ्य २



GoodNews DAILY

# मिठाईचे दुकान

**योहान१०:१० (MARVBSI)**
**चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करायला येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे.**

जर तुम्ही कधी एखाद्या मुलाला सुपरमार्केट मध्ये हवे तितके गोड पदार्थ निवडण्याचे स्वातंत्र्य दिले असेल, तर तुम्हाला एक मनोरंजक गोष्ट लक्षात येईल. मर्यादांची सवय असल्याने, त्यांना खरोखर किती घेण्याची परवानगी आहे याबद्दल ते साशंक असतात. त्यामुळे मूल संकोच करते आणि अपेक्षे पेक्षा कमी निवडते.

जरी तुम्हाला ख्रिस्तामध्ये नवीनजीवन मिळाले असले तरी, तुम्ही पूर्वी जगत असलेल्या विचारसरणीतून मुक्त होण्यासाठी जाणीवपूर्वक पावले उचलली पाहिजेत. अनेक ख्रिस्ती लोक देवाने दिलेल्या परीपुर्नते मध्ये चालण्यास अपयशी ठरतात कारण ते अजूनही जगातून शिकलेल्या मर्यादांमध्ये काम करतात. तुम्हाला विपुल जीवन देण्यात आले आहे, परंतु जर तुमचा विचार मर्यादित राहिला, तर तुमचा अनुभव देखील मर्यादित राहील. जग तुम्हाला कमी अपेक्षा ठेवण्याची सवय लावते, परंतु ख्रिस्ताने त्याने तुम्हाला उपलब्ध करून दिलेल्या सर्व गोष्टींवर हक्क सांगण्यासाठी तुम्हाला बोलावले आहे.

### आजची प्रार्थना

**प्रभू येशू, माझे जीवन सुंदर केल्याबद्दल तुझे आभार. मी माझा दिवस घालवत असताना, मला जगाच्या नव्हे तर तुझ्या संस्कृतीनुसार जगण्यास मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी जगाच्या संस्कृतीतून मुक्त झालो आहे. मिठाईच्या दुकानातील मुलाप्रमाणे, ख्रिस्ताने माझ्यासाठी उपलब्ध कलेली प्रत्येक भेट मी येशूच्या नावाने स्वीकारत आहे.**

**पुढील अभ्यास**
यहोशवा १:३

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८७**
यिर्मया २०-२१; १ तीमथ्य ३



# तपासलेले, मंजूर आणि विश्वनीय

**इब्री ४:१५ (MARVBSI)**
**कारण आपल्या सर्वांच्या दुर्बलतेविषयी ज्याला सहानुभूती वाटत नाही, असा आपला प्रमुख याजक नाही, तर तो सर्व प्रकारे आपल्याप्रमाणे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला.**

सुवार्तेचे सेवक अनेकदा ख्रिस्ती बांधवांना ख्रिस्ताच्या चारित्र्याचे प्रतिबिंब म्हणून जगण्यासाठी प्रोत्साहित करतात. जरी काही जण अजूनही हे आदर्श गाठणे अशक्य मानतात, तरी पवित्र शास्त्र त्याचा उलट दाखवते. येशू पूर्णपणे देव असूनही, त्याने एक संपूर्ण मानवी जीवन जगले. आपल्या दैनंदिन जीवनात आपल्याला सामोरे जाव्या लागणाऱ्या त्याच वास्तवांना-विश्वासघात, नकार, मोह आणि मर्यादा—त्यालाही सामोरे जावे लागले, तरीही त्याने पापा न करता त्यावर मात केली. त्याचे जीवन हे एकन गाठता येणारे आदर्श नाही; ते एक सिद्ध उदाहरण आहे.

देवाचे वचन केवळ एक सिद्धांत नाही. त्याची परीक्षा झाली आहे, ते मान्य झाले आहे आणि त्यावर पूर्ण विश्वास ठेवला येतो, कारण आपण ज्या परिस्थितींना सामोरे जातो, त्याच परिस्थितींत मध्ये स्वतः जागून दाखवले. जेव्हा तुम्ही वचनानुसार वागता, तेव्हा तुम्ही अज्ञात मार्गावर पाऊल ठेवत नाही; तर तुम्ही अशा मार्गाचे अनुसरण करत असता, ज्यावरून ख्रिस्त आधीच चालला आहे आणि विजयी ठरला आहे.

### आजची प्रार्थना

**देवा, माझ्या दुर्बलतेबद्दल सहानुभूती दाखवल्याबद्दल तुझे आभार. तू स्वतः सामोरे गेलेल्या प्रत्येक आव्हानावर मात करून, तू मला माझ्या आव्हानांवर मात करण्याचे सामर्थ दिले आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी सिद्ध झालेल्या आणि विश्वासार्हरत असलेल्या वचनानुसार जगतो. ख्रिस्ताने आपल्या जीवनातून माझ्यासाठी जो आदर्श ठेवला आहे. त्यामुळे कोणताही अडथळा किवा संकट माझ्या उत्कर्षात व्यत्यय आणू शकत नाही.**

**पुढील अभ्यास**
योहान १६:३३

**३६५ बायबल आव्हान - दिवस २८९**
लूक २०:१-२६; स्तोत्रसंहिता १०७-१०९



GoodNews DAILY

# ट्युटोबर्ग जंगलाचीलढाई

**रोमकरांस पत्र १२:१९ (MARVBSI)**
**प्रिय जनहो, सूड उगवू नका, तर देवाच्या क्रोधाला वाट द्या; कारण असा शास्त्रलेख आहे की, "सूड घेणे माझ्याकडे आहे, मी फेड करीन," असे प्रभू म्हणतो.**

ट्युटोबर्गच्या जंगलातील प्रसिद्ध लढाईत, रोमन सैन्याने राईन नदीच्या पूर्वेला (आधुनिक जर्मनी) विस्तार करण्याचा प्रयत्न केला. संख्या, शस्त्रे, कौशल्य आणि इतर अनेक बाबतीत ते त्यांच्या शत्रूपेक्षा खूपच मोठे होते, तरीही त्यांना विजय मिळवता आला नाही. अत्यंत प्रशिक्षित, सुसज्ज आणि शिस्तबद्ध असूनही, ही लढाई घनदाट जंगल, अरुंद वाटा, मुसळधार पाऊस आणि चिखलमय जमिनीवर झाली. या परिस्थितीमुळे त्यांची ताकद निष्प्रभ ठरली. त्यांची सैन्याची रचना विस्कळीत झाली आणि अनेक दिवसांत,त्यांना पद्धतशीरपणे पराभव झाला.

रोमन लोकांप्रमाणेच, ज्या लढाया लढण्यासाठी निर्मिती झालेली नाही, त्यामध्ये गुंतून तुम्ही तुमच्याकडील असलेली शक्ती कुचकामी करू शकता. काही संघर्ष तुमचे हातात नसतात. देवाने तुम्हाला प्रत्येक लढाई स्वत: जिंकण्यासाठी बोलावले नाही, तर कोणत्या लढाया त्याच्या आहेत हे ओळखण्यासाठी बोलावले आहे. सूड परमेश्वराचा आहे. जेव्हा तुम्ही देवाला तुमच्या वतीने लढू देता, तेव्हा त्याने तुमच्यासाठी नेमलेल्या कार्यासाठी तुम्ही तुमची शक्ती रोखून ठेवता.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, या वर्षी कोणत्या लढाया लढाव्यात हे ओळखण्याची बुद्धी मला दे. मी प्रत्येक परिस्थिती तुझ्या हाती सोपवत असल्यामुळे, यश निश्चित आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी अशा देवाची सेवा करतो जो माझ्यासाठी लढतो. जेव्हा मी माझ्या परिस्थिती देवाच्या हाती सोपवतो,तेव्हा शत्रू कोणीही असो, विजय निश्चित असतो.**

**पुढील अभ्यास**
निर्गम १४:१४

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९०**
यिर्मया २२-२३; १ तीमथ्य ४



GoodNews DAILY

# पृष्ठभागापलीकडे पाहणे

**१शमुवेल १६:७ (MARVBSI)**
**पण परमेश्वराने शमुवेलास म्हटले, "तू त्याच्या स्वरूपावर अथवा त्याच्या शरीराच्या उंच काठीवर जाऊ नकोस, कारण मी त्याला नापसंत केले आहे; मानवासारखे परमेश्वराचे पाहणे नसते; मानव बाहेरचे स्वरूप पाहतो पण परमेश्वर हृदय पाहतो."**

मायकेलएंजेलो हा कलावंत एक मास्टर चित्रकार, शिल्पकार म्हणून प्रसिद्ध होता. डेव्हिडचा पुतळा यांसारख्या कलाकृती त्यांनी निर्माण केल्या. त्याला जे वेगळे करत होते ते म्हणजे इतरांना जे दिसत नव्हते ते पाहण्याची त्याची क्षमता. जिथे इतरांना फक्त संगमरवरी ठोकळे दिसले, तिथे मायकेलएंजेलोने त्यातील आकार ओळखला. जिथे इतरांना फक्त दगड दिसला तिथे त्याने डेव्हिड पाहिला.

देव, विश्वासाचा शिल्पकार, तुम्हाला तुमच्या सध्याच्या स्थितीनुसार नाही तर त्याच्या उद्देशानुसार संभाव्यतेच्या दृष्टिकोनातून पाहतो. तो माणसांसारखा बाह्य देखावा पाहत नाही; तो पृष्ठभागाच्या पलीकडे हृदयाकडे पाहतो. तुम्ही त्याची कारागिरी आहात, चांगल्या कामांसाठी ख्रिस्त येशूमध्ये निर्माण केलेले आहात. तो जेव्हा त्याचा मास्टरपीस तयार करत आहे, तेव्हा त्याने तुमच्यामध्ये जे सुरू केले आहे ते त्याला पूर्ण करू द्या.

### आजची प्रार्थना

**देवा, तू माझ्यात सुरु केलेले चांगले कार्य ओळखण्यासाठी माझ्या शारीरिक डोळ्यांच्या जागी आत्मिक डोळे दे.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाला माझ्यातली क्षमता दिसते, त्याच्या वचनाला आणि त्याच्या कार्याला समर्पित असलेल्या माझ्या हृदयामुळे, तो मला एक उत्कृष्ट कलाकृती बनवत आहे, याची मला खात्री आहे.**

**पुढील अभ्यास**
फिलिप्पैकर १:६

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९१**
यिर्मया २४-२६; १ तीमथ्य ५



# येशू हे सत्य आहे

**योहान १४:६ (MARVBSI)**
**येशूने त्याला म्हटले, "मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्या द्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही.**

जरी न्यायालयातील सर्व शिक्षा सत्याच्या आधारावर दिल्या जातात असे म्हटले जात असले तरी, तज्ञांचा असा अंदाजानुसार काही टक्के दोषींना अन्यायकारकपणे तुरुंगात टाकले जाते. हे आवश्यक नाही की न्यायाधीश किंवा ज्युरी सादर केलेल्या पुराव्यांवर आधारित चुकीचे निर्णय घेतात, तर त्यांचे निर्णय देवाच्या परिपूर्ण सत्यावर आधारित नसतात.

ख्रिस्तामधील जीवन माणसाच्या चुकीच्या निर्णयांपलीकडे जाते; ते हृदयाला जाणते. तो कोण आहे याचे सत्य तथ्यांच्या पलीकडे जाते आणि आपले मूळ हेतू उघड करते. येशू सत्य आहे हे जाणून घेतल्याने पवित्र शास्त्रातील प्रत्येक वचनाच्या पायाला पुष्टी मिळते. जसा तो खरा आणि अपरिवर्तनीय आहे, तशीच त्याची अभिवचनेही आहेत. जेव्हा त्याने उपचार, तरतूद आणि संरक्षणाची घोषणा केली, तेव्हा ती ज्युरी किंवा न्यायाधीशाची चूक नव्हती; ते स्वतः सत्याने बोललेले अचूक शब्द होते!

### आजची प्रार्थना

**प्रभू येशू, तू कधीही न चुकणारे सत्य असल्याबद्दल तुझे आभार. मी माझे दैनंदिन व्यवहार करत असताना, माझ्या सर्व मार्गांमध्ये मला मार्गदर्शन कर आणि तुझे सत्य माझ्या निर्णयावर व कृतींवर नियंत्रित ठेऊ दे. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाचे वचन हे अपरिवर्तनीय सत्य विश्वसनीय आणि अचूक आहे. जेव्हा मी त्याच्या वचनावर विश्वास ठेवतो, तेव्हा गोंधळ, निराशा आणि अस्वस्थता माझ्यापासून दूर राहतात.**

**पुढील अभ्यास**
योहान १:१४

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९२**
यिर्मया २७-२९; १ तीमथ्य ६





# देवाचे ग्रीनहाऊस

**स्तोत्र १:३ (MARVBSI)**
**जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते, जे आपल्या हंगामात फळ देते, ज्याची पाने कोमेजत नाहीत, अशा झाडासारखा तो आहे; आणि जे काही तो हाती घेतो ते सिद्धीस जाते.**

फलोत्पादनामध्ये, ग्रीनहाऊस एक नियंत्रित वातावरण तयार करते जिथे बाह्य हवामानाची पर्वा न करता झाडे वाढू शकतात आणि भरभराट करू शकतात. तापमान, प्रकाश आणि परिस्थिती नियंत्रित केली जाते जेणेकरून वाढ ऋतूंवर अवलंबून राहणार नाही. त्याचप्रमाणे, देवाचे वचन हे परिपूर्ण वातावरण आहे. जेव्हा तुम्ही त्यात रुजलेले राहता, तेव्हा तुमची वाढ तुमच्या आजूबाजूला काय घडत आहे यावर अवलंबून राहत नाही.

पवित्रशास्त्र देवाच्या मुलांची तुलना अशा झाडांशी केली आहे, जी नेहमी फळ देतात, कधीही पान गळत नाही आणि नेहमी फुललेले असतात. हे योग्य वातावरणात लावल्याचे फळ आहे. तुम्ही तुमच्या परिस्थितीद्वारे नियंत्रित नाही. तुम्हाला उपायांचे कोठार बनवण्यात आले आहे. तुमचे कौशल्य क्षेत्र कोणतेही असो, तुम्हाला परिणाम देण्यासाठी घडविलेले आहात.

### आजची प्रार्थना

**देवा, परिस्थिती कोणतेही असो तू मला उत्कृष्ट बनवल्याबद्दल आभार. मला माहित आहे की तुझ्या वचनाने माझ्या जीवनाबद्दल जे सांगितले आहे त्यावर विश्वास ठेवून, मी विजेता आहे!**

### भविष्यसूचक घोषणा

**माझी निर्मिती अशी झाली आहे की माझ्यावर कोणतेही समस्या येऊ नये, परिस्थिती किंवा प्रसंग कोणताही असो, मी विजेताच आहे आणि सैतानाचा माझ्यापुढे कोणताही टिकाव लागणार नाही.**

**पुढील अभ्यास**
यिर्मया ३२:१७

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९३**
यिर्मया ३०-३१; २ तीमथ्य १




GoodNews DAILY

# देवाचे औषध

**स्तोत्रसंहिता १०७:२० (MARVBSI)**
**तो आपले वचन पाठवून त्यांना बरे करतो, नाशापासून त्यांचा बचाव करतो.**

बहुतेक वैद्यकीय व्यावसायिक, मग ते डॉक्टर, पॅरामेडिक्स, परिचारिका किंवा फिजिशियन असोत, त्यांना आजारपणाचे निदान करण्यासाठी किंवा त्याचा भार कमी करण्यासाठी प्रशिक्षित केले जाते. जरी अनेक आजारांवर उपचार उपलब्ध असले तरी, मृत्यू आणि आजारपण अजूनही अब्जावधी लोकांच्या जीवनाला त्रास देत आहेत. अशा व्यक्तींकडे उपचारांबद्दल आणि इतर गोष्टींबद्दल अफाट ज्ञान असले तरी, वैद्यकीय व्यवसायातील व्यक्तीचा सरासरी मृत्यू दर सामान्य लोकसंख्येपेक्षा फारसा वेगळा नाही.

तुमच्या आरोग्यावरील उपाय फक्त रुग्णालयापुरता मर्यादित नाही. प्रभू येशूने त्याच्या प्रत्येक मुलाला अनंतकाळचे जीवन दिले आहे. ते जीवन तुमच्या अस्तित्वाच्या प्रत्येक भागापर्यंत विस्तारलेले आहे. देवाने तुम्हाला जे बनवले आहे त्यात चालायला शिका. देवाचे वचन हे तुमच्या शरीरासाठी औषध आहे; डोज जितका जास्त, तितक्या लवकर तुम्हाला आरोग्य प्राप्त होते!

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मला दैवी आरोग्यामध्ये चालण्याची संधी दिल्याबद्दल तुझे आभार. मी माझा आठवडा व्यतीत करत असताना, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने इतरांनाही तीच दैवी आरोग्यसेवा देण्यास मला मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाच्या वचनाच्या सामर्थ्याने आजारपण, रोग आणि व्याधी नष्ट झाले आहेत! जेव्हा मी त्याचे वचन ग्रहण करतो, तेव्हामी खरोखर मुक्त होतो, येशूच्या नावाने.**

**पुढील अभ्यास**
मार्क ५:३४

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९४**
यिर्मया ३२-३३; २ तीमथ्य २



GoodNews DAILY

# बॉक्सरचा बचाव

**लूक१८:१ (MARVBSI)**
**त्यांनी सर्वदा प्रार्थना करावी आणि खचूनये, ह्याविषयी त्याने त्यांना एक दाखला सांगितला;**

बॉक्सिंग आणि मिश्र मार्शल आर्ट्समध्ये, लढाऊ जो पहिला धडा शिकतो तो म्हणजे आपले हात नेहमी वर ठेवणे. जेव्हा एखादा लढवय्या क्षणभरासाठी जरी आपले हात खाली करतो, तेव्हा तो स्वतःला उघडे पाडतो आणि प्रतिस्पर्ध्याच्या 'काऊंटर पंच'साठी असुरक्षित बनतो.

प्रार्थनेचे सामर्थ्य असूनही अनेक ख्रिस्ती अपयशी का ठरतात याचे कारण म्हणजे ते फक्त संकटे आल्यावरच प्रार्थना करतात. हे प्रतिस्पर्ध्याने पंच मारल्यानंतर आपले हात वर करण्यासारखे आहे. जर तुम्ही प्रार्थना करण्यासाठी संकट येईपर्यंत वाट पाहत असाल, तर तुम्हाला खूप उशीर झाला आहे. एका उत्तम प्रशिक्षित बॉक्सरप्रमाणे, तुम्हाला बचावात्मक पवित्रा (defensive stance) कायम ठेवावा लागेल. तुमचा हात फेकण्याची गरज भासण्यापूर्वीच तुमचे हात वर ठेवा. प्रार्थनेद्वारे देवासोबत सतत आणि सातत्यपूर्ण सहवासात रहा जेणेकरून जेव्हा शत्रू हल्ला करेल, तेव्हा तुम्ही अंतिम नॉकआउट पंच मारण्यासाठी नेहमी तयार असाल!

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, प्रार्थनेच्या दानाबद्दल तुझे आभार. मला तुझ्या संगतीतम स्थिरराहण्यास मदत कर, जेणेकरून मी कधीही बेसावध सापडणार नाही तर नेहमी मजबूत आणि संकटांवर मात करण्यासाठी सज्ज असेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी आध्यात्मिकयुद्धात पारंगत आहे. जसा रिंगणातील मुष्टीयोद्धा नेहमी आपले हात वरठेवतो, तसा मी प्रार्थनेच्या ठिकाणी राहतो, शत्रूवर हल्ला करण्यासाठी नेहमी तयार असतो.**

**पुढील अभ्यास**
१ थेस्सलनीक:१६-१८

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९५**
यिर्मया ३४-४६; २ तीमथ्य ३



GoodNews DAILY

# महान पराक्रम

**दानीएल ११:३२ (MARVBSI)**
**'जे करारासंबंधाने दुष्ट वर्तन करतात त्यांना तो खुशामत करून भ्रष्ट करील; पण जे लोक आपल्या देवास ओळखतात ते बलवान होऊन थोर कृत्ये करतील.**

संपूर्ण पवित्राशात्रामध्ये, आपण देवाला पुरुष, स्त्रिया, तरुण आणि वृद्धांद्वारे महान कार्य करताना पाहतो. तरीही आज लाखो ख्रिस्ती तेच सामर्थ्य हाताळण्यात अपयशी ठरतात. याचे कारण सोपे आहे: पवित्र शास्त्र आपल्याला दाखवते की देवाने तुमच्यामध्ये ठेवलेले सामर्थ्य मुक्त करण्याची अट ही त्याच्यासोबतच्या सहभागीता आहे.

ख्रिस्ताने म्हटले आहे की या शेवटल्या काळात देवाच्या प्रत्येक मुलाला भूतकाळातील कार्यांपेक्षा महान कार्ये करण्याचा आदेश देण्यात आला आहे. ती भविष्यवाणी पूर्ण करण्याची जबाबदारी देवाशी असलेल्या तुमच्या नातेसंबंधात अधिक खोलवर जाण्यावर आणि त्याच्या वचनाचा विद्यार्थी बनण्यावर आहे. तो कोण आहे हे जाणून घेण्यासाठी तुम्ही जितका जास्त वेळ काढाल, तितके जास्त तुम्हाला ख्रिस्तामध्ये त्याने तुम्हाला कोण बनवले आहे हे कळेल!

### आजची प्रार्थना

**येशूच्या नावाने, तुझ्या अद्भुत वचनामध्ये अधिक सखोल अभ्यास करण्यास आणि तू कोण आहेस याची अधिक समज मिळवण्यासाठी मला मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**अलौकिक तेलाच्या या वर्षात मी पराक्रम करत आहे, कारण मी विश्वाच्या निर्मात्याची निर्मिती आहे!**

**पुढील अभ्यास**
फिलिप्पैकर ३:१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९६**
लूक २०:२७-४७; स्तोत्रसंहिता ११०-११२



GoodNews DAILY

# तुमची खरी प्रतिमा

**याकोब १:२३-२४ (MARVBSI)**
**कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे; 'तो स्वत:ला पाहून तेथून निघून जातो आणि आपण कसे होतो हे तेव्हाच विसरून जातो.**

दररोज घर सोडण्यापूर्वी, सर्वकाही व्यवस्थित आहे याची खात्री करण्यासाठी तुम्ही कदाचित आरशात पाहता. आरसा अशी प्रतिमा प्रतिबिंबित करतो जी तुम्ही ओळखता आणि टिकवून ठेवणे निवडता. देवाच्या वचनाची तुलना आरशाशी केली गेली आहे; त्यात तुमची आध्यात्मिक स्व-प्रतिमा (self-image) तयार करण्याचे सामर्थ्य आहे.

कधीकधी, ख्रिस्ती लोक पवित्र शास्त्र वाचतात, ख्रिस्तामध्ये ते कोण आहेत हे पाहतात, आणि नंतर वचनाच्या आरशात त्यांनी जे पाहिले ते विसरतात. परिणामी, ते ती स्व-प्रतिमा त्यांच्या कृतींना मार्गदर्शन करू न देता दिवसभर वावरतात. समस्या परिवर्तनाच्या अभावाची नाही—तुमचे पूर्णपणे परिवर्तन झाले आहे, त्याच्या आत्म्याशी तुम्ही जोडले आहात. तथापि, वचनावर कृती करणे हेच तुमच्या खऱ्या स्व-प्रतिमेला अधिक स्पष्ट करते आणि तुमच्या दैनंदिन जीवनात पूर्णपणे व्यक्त होण्यास कारणीभूत ठरते.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी माझा आठवडा असताना जगात असताना, माझ्या प्रत्येक पावलाला मार्गदर्शन कर. परिस्थिती कोणतीही असो, तू बोललेल्या प्रत्येक वचनावर कृती करण्यास मला मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**जेव्हा लोक मला पाहतात, तेव्हा ते ख्रिस्ताला पाहतात. मी ईश्वराचे प्रतिबिंब आहे, केवळ मी वचन ऐकतो म्हणून नाही, तर मी त्याचे पालन करतो म्हणून!**

**पुढील अभ्यास**
इफिसकरांस २:१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९७**
यिर्मया ३७-३९; २ तीमथ्य ४



GoodNews DAILY

# मध्यस्थी करणे

**फिलिप्पैकर २:१२ (MARVBSI)**
**म्हणून, माझ्या प्रियजनांनो, जसे तुम्ही नेहमीच आज्ञापालन केले आहे, तसे केवळ माझ्या उपस्थितीतच नाही, तर आता माझ्या अनुपस्थितीतही, भीतीने आणि कांपत राहून आपले तारण साधत जा.**

जीवनातील अशांततेच्या काळात, तुम्ही ख्रिस्ती लोकांना असे म्हणताना ऐकले असेल की, ते प्रार्थनेत तुमच्यासाठी मध्यस्थी (stand in the gap) करतील. जरी त्या प्रार्थना आणि प्रोत्साहनाचे शब्द ऐकणाऱ्यांना कृपा, उपचार आणि समृद्धी देऊ शकतात, तरीही पवित्र शास्त्र स्पष्ट आहे: ख्रिस्तामधील तुमचे जीवन हा एक असा प्रयत्न आहे जो तुम्ही स्वतः जोपासला पाहिजे.

मध्यस्थी हे शरीरातील एक शक्तिशाली आणि आवश्यक साधन आहे, तरीही पवित्र शास्त्र तुम्हाला वैयक्तिकरित्या तुमचे तारण साधण्याचे आवाहन करते. तुमचा आध्यात्मिक अधिकार असो, तुमचे वडील, आई, बहीण किंवा भाऊ असोत, देवाने त्यांना तुमच्या जीवनात त्याच्यासोबतच्या तुमच्या वाटचालीत मार्गदर्शन करण्यासाठी ठेवले आहे, तुमच्या स्वतःच्या वैयक्तिक नातेसंबंधासाठी पर्याय म्हणून काम करण्यासाठी नाही. पवित्र शास्त्र वाचा आणि स्वतःसाठी त्याला जाणून घ्या. तुम्ही पहाल की तुमचे जीवन किती बदलू लागते.

### आजची प्रार्थना

**हे स्वर्गीय पित्या, तुझ्याप्रती मध्यस्थी करण्याच्या आणि तुझ्यासोबतच्या सहवासा बद्दल तुझे आभार. जस जसे मी तुझे वचन वाचत असताना, तसतसे माझे आतून बाहेरून परिवर्तन होत आहे!**

### भविष्यसूचक घोषणा

**मी प्रभू येशूला स्वतः ओळखतो! देवाचे वचन वाचून, मी आज त्याच्यासोबत एक वैयक्तिक नातेसंबंध जोपासत आहे.**

**पुढील अभ्यास**
कलस्सैकर १:९-१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९८**
यिर्मया ४०-४२; तीत १



# मधमाशी यंत्रणा

**१करिंथ१२:२१-२२ (MARVBSI)**
**डोळ्याला हातास म्हणता येत नाही की, "मला तुझी गरज नाही;" तसेच मस्तकाला पायांना म्हणता येत नाही की, "मला तुमची गरज नाही." 'इतकेच नव्हे तर शरीराचे जे अवयव विशेष अशक्त दिसतात तेही आवश्यक आहेत,**

मधमाशीचा स्वभाव साधा असला तरी, ती जीवनात महत्त्वाची भूमिका बजावते. मधमाशा आणि इतर परागकण वाहकांशिवाय (pollinators), जागतिक संकट निर्माण होईल, ज्याचा जगाच्या अन्नपुरवठ्यावर लक्षणीय परिणाम होईल. मधमाशांच्या भूमिकेला तुम्ही पाहू शकता अशा तात्काळ परिणामांपुरते मर्यादित करणे सोपे आहे, तरीही त्यांचा खरा प्रभाव आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, हे देवाच्या अनेक मुलांना लागू होते.

अनेक ख्रिस्ती असे गृहीत धरतात की त्यांची भूमिका लहान किंवा क्षुल्लक वाटत असल्याने, त्यांच्या प्रयत्नांना महत्त्व नाही. हे सत्यापासून खूप दूर आहे. जेव्हा देव तुम्हाला पाहतो, तेव्हा तो मोठे चित्र पाहतो, केवळ नैसर्गिकरित्या जे दृश्यमान आहे तेच नाही. तुम्ही ख्रिस्ताच्या शरीराचे एक अंग आहात, त्याच्या राज्याच्या प्रगतीसाठी आवश्यक आहात. तुमच्याकडे तुम्ही जे काही करता त्यात उत्कृष्ट होण्या शिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही.

### आजची प्रार्थना

**देवा, तू माझ्यामध्ये ठेवलेल्या दानाबद्दल तुझे आभार. मी कोणत्याही भूमिकेत सेवाकरत असलो तरी, इतरांना ख्रिस्ताचे ज्ञान देणे हे अत्यंत आवश्यक आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी ख्रिस्ताच्या शरीराचा एक अवयव आहे. माझे कार्य जगासाठी आवश्यक आहे आणि अलौकिक तेलाच्या या वर्षात यशस्वी होण्या शिवाय माझ्याकडे दुसरा पर्याय नाही.**

**पुढील अभ्यास**
कलस्सैकर ३:२३-२४

**३६५ बायबल आव्हान - दिवस २९९**
यिर्मया ४३-४५; तीत २




# देवाची टेलिफोनलाईन

**मत्तय२२:१४ (MARVBSI)**
**कारण बोलावलेले पुष्कळ आहेत, पणनिवडलेले थोडेके आहेत.**

जर तुम्ही कधी जुना टेलिफोन किंवा रोटरी डायल वापरला असेल, तर तुम्हाला माहित असेल की जेव्हा कोणी तुम्हाला कॉल करत असेल तेव्हा तो कसा आवाज करतो. तो वेगवान, सुसंगत आणि दुर्लक्षित करणे अशक्य असा असतो! देवाचे बोलावणे त्याहूनही अधिक तीव्रतेने येते. तुम्ही पाहाल की, देवाच्या राज्याची प्रगती करण्यासाठी स्वतःला परिपूर्ण स्थितीत ठेवण्यासाठी प्रत्येक ख्रिश्चनाला दान आणि बोलावणे देण्यात आले आहे, परंतु त्या आवाहनाकडे लक्ष देण्याची जबाबदारी शेवटी आपल्यापैकी प्रत्येकावर येते.

तुम्ही तंत्रज्ञान, संगीत, व्यवसाय किंवा ललित कलांमध्ये पारंगत असाल, ही सर्व अशी साधने आहेत ज्याद्वारे देवाने तुम्हाला संतांच्या उभारणीसाठी आणि सुवार्तेचा प्रसार करण्यासाठी दान दिले आहे. देवाची टेलिफोन लाईन वाजत आहे. बाजूला निष्क्रीय बसून त्याचे बोलावणे अनुत्तरित राहू देऊ नका. आजच कृती करा!

### आजची प्रार्थना

**हे पित्या, तुझे शब्द सदैव सत्य आहे, तू माझ्या मध्ये ठेवलेल्या प्रत्येक दानासाठी मी नेहमीच कृतज्ञ आहे. जगभरात तुझ्या नावाचा गौरव करण्यासाठी मी प्रत्येकाचा उपयोग करेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाने मला कार्यासाठी पाचारण आहे, आणि मी त्याकडे दुर्लक्ष करणार नाही. त्याने मला दिलेल्या देणगी मी येशूच्या नावाने ख्रिस्त देहाच्या हितासाठी वापरेल.**

**पुढील अभ्यास**
रोमकरांस ८:२८

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३००**
यिर्मया ४६-४७; तीत ३



GoodNews DAILY

# अंजिराच्या झाडाचेफळ

**मार्क११:१३-१४ (MARVBSI)**
**तेव्हा पानांनी डवरलेले एक अंजिराचे झाड त्याला दुरून दिसले, आणि कदाचित त्याच्यावर काही मिळेल ह्या अपेक्षेने तो तिकडे गेला; परंतु तेथे गेल्यावर पानांवाचून त्याला काही आढळले नाही; कारण अजून अंजिराचा हंगाम आला नव्हता. तेव्हा तो त्याला म्हणाला, "ह्यापुढे कोणीही तुझे फळ कधीही न खावो. त्याचे शिष्य हे ऐकत होते.**

ही कथा एक लक्षवेधी प्रश्न उपस्थित करते: विश्वाचा निर्माता एका झाडाला फळ न दिल्याबद्दल शाप का देईल जेव्हा त्याला माहित होते की तो ऋतू नव्हता? कारण सोपे आहे! उत्तर ते झाड कशाचे प्रतिनिधित्व करते यात दडलेले आहे. सर्व निर्मितीची क्षमता जगाच्या नैसर्गिक दुष्टीकोनातून मोजली जात नाही, तर देवाने त्याबद्दल जे काही बोलले आहे त्याद्वारे मोजली जाते.

जेव्हायेशू बोलला, तेव्हा त्याने अंजिराच्या झाडाला त्याच्या ऋतूनुसार नाही तर देवाने दिलेल्या क्षमतेनुसार संबोधित केले. तुम्ही तुमच्या नैसर्गिक डोळ्यांनी जे पाहता ते देवाला तुम्हाला जिथे न्यायचे आहे त्याला मर्यादित करू देऊ नका. देवाचे वचन तुमची क्षमता स्थापित करते. तुमची पार्श्वभूमी, व्यवसाय किंवा परिस्थिती काहीही असली तरीही, तुम्ही फळ देत आहात कारण प्रभू येशूने तसे म्हटले आहे.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मला तुझ्या अद्भुत कृपेचा लाभार्थी बनवल्याबद्दल तुझे आभार. तुझ्या वचनामुळे मी आणि कुटुंब सुशोभित केले आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**ऋतू कोणताही असो, मी नेहमीच फळ देतो. जगाने माझ्यावर लादलेल्या मर्यादा देवाच्या कृपेने नाहीशा झाल्या आहेत.**

**पुढील अभ्यास**
योहान १३:३४-३५

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०१**
यिर्मया ४८-४९; फिलेमोन



GoodNews DAILY

# प्रेम वाटणारा

**१ योहान ४:२० (MARVBSI)**
**मी देवावर प्रीती करतो," असे म्हणून जर कोणी आपल्या बंधूचा द्वेष करील तर तो लबाड आहे; कारण डोळ्यांपुढे असलेल्या आपल्या बंधूवर जो प्रीती करत नाही त्याला न पाहिलेल्या देवावर प्रीती करता येणे शक्य नाही.**

आपल्या अनुयायांना वेगळे ओळखण्यासाठी पोशाख, आहाराच्या पद्धती किंवा चिन्हांचा वापर करणाऱ्या इतर संघटित धर्माच्या विपरीत, ख्रिस्ती धर्माची आपण इतरांना दाखवत असलेल्या प्रेमावरून ओळखला जातो. प्रेम हा ख्रिस्त आपल्यात असल्याचा पुरावा आहे. देवाचे वचन स्पष्ट आहे: जर तुम्ही ज्यांना पाहू शकता त्यांच्याबद्दल प्रेम व्यक्त करू शकत नाही तर ज्या देवाला तुम्ही पाहिले नाही त्याच्यावर प्रेम करण्याचा दावा करत असाल, तर तुम्ही खोटे आहात.

ज्याक्षणी तुम्ही तुमचे जीवन ख्रिस्ताला समर्पित केले, त्याच क्षणी तुम्ही त्याचा दैवी, राजेशाही आणि प्रेमळ स्वभाव स्वीकारला. त्याचे वंशज म्हणून, प्रेम तुमच्या चारित्र्यात आधीच अंतर्भूत आहे. तुम्ही देवापासून जन्मला आहात आणि देव प्रेम आहे. त्यामुळे तुमच्यातील त्याचे प्रेम जगात मुक्तपणे वाहू द्या.

### आजची प्रार्थना

**प्रभू, तू माझ्यावर दाखवलेल्या प्रेमाबद्दल तुझे आभार. मी भेटणाऱ्या प्रत्येकासाठी त्याच प्रेमाचे प्रतिबिंब बनलो आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझा ख्रिस्तावरील विश्वास मी भेटणाऱ्या प्रत्येकाला दाखवत असलेल्या प्रेमातून व्यक्त होतो. अलौकिक तेलाच्या या वर्षात, मी प्रेम वाटणारा आहे!**

**पुढील अभ्यास**
मत्तय १८:२१-२२

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०२**
यिर्मया ५०; इब्री १



# झोपू नका!

**नीतिसूत्रे २४:३३-३४ (MARVBSI)**
**आणखी थोडीशी झोप घेतो, आणखी थोडीशी डुलकी घेतो, हात उराशी धरून जरा निजतो," 'असे म्हणत जाशील तर दारिद्र्य तुला दरोडेखोराप्रमाणे, गरिबी तुला हत्यारबंद माणसाप्रमाणे गाठील.**

आरोग्यतज्ञांचा अंदाज आहे की प्रौढांचे सरासरी आयुर्मान अंदाजे सत्तर ते पंचाहत्तर वर्षे आहे, आणि झोपेचा सामान्य कालावधी दररोज आठ ते दहा तासांचा असतो. याचा अर्थ संपूर्ण आयुष्यात, एक व्यक्ती साधारणपणे पंचवीस वर्षे झोपेत घालवू शकते! आजचे वचन एक धक्कादायक बायबलसंबंधी सत्य उघड करते: चुकीच्या वेळी विश्रांती घेतल्याने गरिबीच्या विनाशकारी आकर्षणाला चालना देणारी प्रवृत्ती निर्माण होते.

देवाचे मूल म्हणून, तुम्हाला सक्रिय जीवन जगावे लागेल. जेव्हा करायला काम असते आणि जिंकण्यासाठी आत्मे असतात तेव्हा विश्रांती घेऊ नका! झोप, सुस्ती आणि आळस ही अशी साधने आहेत ज्यांचा उपयोग सैतान तुमचा नाश करण्यासाठी करतो. निष्क्रिय जीवनाची सवय लावू नका, कारण त्यामुळे गरिबी आणि विनाशाशिवाय काहीही निर्माण होत नाही.

### आजची प्रार्थना

**हे देवा, या वर्षी माझ्यासाठी तुझी योजना पार पाडण्यासाठी मला ऊर्जा आणि इच्छाशक्ती दे. मला सतर्क आणि शिस्तबद्ध ठेव, जेणेकरून मी येशूच्या नावाने, तू माझ्यासमोर ठेवलेल्या प्रत्येक संधीचा पुरेपूर फायदा घेईन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी माझ्या जीवनासाठी देवाच्या योजनांमध्ये अडथळा आणण्यासाठी शत्रूला आळसाचे शस्त्र वापरू देणार नाही. जेव्हा देवाच्या राज्याचे काम करायचे असेल तेव्हा मी निष्क्रिय राहण्यास नकार देतो.**

**पुढील अभ्यास**
नीतिसूत्रे १०:४

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०३**
लूक २१:१-१९; स्तोत्रसंहिता ११३-११५



GoodNews DAILY

# पतित स्थितीच्यावर

**यशया२४:५-६ (MARVBSI)**
**'पृथ्वी आपल्या रहिवाशांकडून भ्रष्ट झाली आहे, कारण त्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, विधींचे अतिक्रमण केले आहे आणि सनातन करार मोडला आहे. 'ह्यास्तव पृथ्वी शापाने ग्रासली आहे, तिचे रहिवासी पापाचे फळ भोगत आहेत; पृथ्वीचे रहिवासी जळून भस्म झाले आहेत, मानव थोडेच उरले आहेत.**

याची कल्पना करा: अगदी व्हिक्टोरिया फॉल्सचे विलोभनीय पाणी आणि हिमालय पर्वताची नम्र करणारी उंची ही पवित्र शास्त्रानुसार, एका पतित स्थितीतील (fallen state) स्मारके आहेत. ज्या क्षणी आदामने एदेन बागेत पाप केले आणि जगात पापाचा प्रवेश झाला, तेव्हापासून आजारपण, क्षय आणि मृत्यू त्यासोबत आले—ज्या गोष्टी देवाने त्याच्या मुलांसाठी कधीही इच्छिल्या नव्हत्या!

अनेक ख्रिस्ती असे मानून आपले जीवन जगतात की सामान्य गोष्टींची अपेक्षा करणे योग्य आहे, परंतु देवाचे वचन आपल्याला दाखवते की या जगाची पतित अवस्था आपला दर्जा नाही. तुम्हाला ख्रिस्तामध्ये जीवनाच्या उच्च स्तरावर बोलावले गेले आहे, जिथे सैतानाच्या खोटेपणाला कोणताही आधार नाही.

### आजची प्रार्थना

**प्रभू येशू, वधस्तंभावरील केलेल्या तुझ्या बलिदानाबद्दल तुझे आभार. माझ्या मध्ये राहण्यासाठी आणि मला दररोज पूर्ण विजयात चालण्यासाठी सक्षम केल्याबद्दल तुझे आभार.**

### भविष्यसूचक घोषणा

**ख्रिस्तामध्ये मी आता बळी नाही तर विजयी आहे! जगात असलेल्या सर्व आजारी, कुजलेल्या आणि समस्या माझ्या वाट्याला आलेल्या नाहीत. मी देवाचे मूल आहे; मी पतित स्थितीच्या वर जगतो!**

**पुढील अभ्यास**
रोमकरांस १२:२

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०४**
यिर्मया ५१-५२; इब्री २




# आध्यात्मिक रिसेप्टर्स

**उत्पत्ती २८:१६ (MARVBSI)**
**मग याकोब झोपेतून जागा होऊन म्हणाला, "खरोखर ह्या ठिकाणी परमेश्वर आहे, पण हे मला कळले नव्हते."**

ख्रिस्तामध्ये ख्रिस्ती कोण आहेत आणि देवाचे मूल म्हणून त्यांना कोणते आध्यात्मिक विशेषाधिकार आहेत याबद्दलचे सत्य पसरवण्यात लक्षणीय प्रगती होऊनही, आजही अनेकजण संघर्ष करताना, अस्वस्थ होताना किंवा त्यांच्या परिस्थितीच्या भाराखाली दबलेले दिसतात. यावरून एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो: काही लोक ख्रिस्तामधील जीवनाची समृद्धी इतरांपेक्षा अधिक पूर्णपणे अनुभवत आहेत असे का वाटते?

आजच्या वचनात, याकोबाला हे समजते की परमेश्वर उपस्थित होता, तरीही त्याने ते ओळखले नव्हते. जेव्हा तो जागा झाला तेव्हाच त्याला याची जाणीव झाली. देवाची उपस्थिती अनुपस्थित नसते, परंतु ती बऱ्याचदा ओळखली जात नाही. जोपर्यंत तुम्ही आध्यात्मिकरित्या लक्ष देत नाही, तोपर्यंत देवाने त्याच्या वचनात दिलेल्या सर्व गोष्टींच्या पूर्णतेचा तुम्ही कधीही अनुभव घेणार नाही. ख्रिस्ती जीवनातील वाढीमध्ये त्याच्या वचनात वेळ घालवून त्याची उपस्थिती आणि त्याचा आवाज ओळखायला शिकणे समाविष्ट आहे.

### आजची प्रार्थना

**प्रभू येशू, तू नेहमी जवळ असतोस याबद्दल मी खूप कृतज्ञ आहे. तुझ्या माझ्यावरील प्रेमाला सीमा नाही आणि तुझ्या कृपेला अंत नाही. तुझ्या नावाला सदासर्वकाळ धन्य असो!**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाची उपस्थिती कशी ओळखायची हे मला माहित आहे! जेव्हा तो जवळ असेल, तेव्हा मी झोपलेला आढळणार नाही. माझे आध्यात्मिक रिसेप्टर्स उच्च सतर्कतेवर आहेत!**

**पुढील अभ्यास**
यशया ३०:२१

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०५**
विलापगीत १-२; इब्री ३




# मला लाज वाटत नाही

**प्रेषितांची कृत्ये ४:१८ (MARVBSI)**
**तेव्हा पेत्र पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन त्यांना म्हणाला, "अहो लोक अधिकाऱ्यानो व वडील जनांनो,**

येशूच्या नावात असे काहीतरी आहे ज्याकडे जग दुर्लक्ष करू शकत नाही. त्यात सामर्थ्य, अधिकार आणि तारण आहे. स्वर्गात, पृथ्वीवर किंवा पृथ्वीखाली यापेक्षा मोठे दुसरे कोणतेही नाव नाही. त्याच्या नुसत्या उल्लेखाने शत्रूही थरथर कापतो.

प्रेषितपेत्र आणि योहान यांना येशूच्या नावाने बोलणे थांबवण्यास सांगण्यात आले कारण नेत्यांनी त्यातील सामर्थ्य पाहिले होते. लोकांचे जीवने बदललेले, आजारी लोक बरे झाले आणिअनेक जण देवाकडे वळत होते. त्यांना समजले होते की जोपर्यंत येशूच्या नावाची घोषणा केली जाईल, तोपर्यंत देवाचे राज्य वाढतच राहील.

आज हीजग जे नाव दाबण्याचा प्रयत्न करू शकते. ते त्याला विरोध करू शकतात किंवा नाकारू शकतात, परंतु आपल्याला सत्य माहित आहे: येशूचे नाव हे आपल्या तारणासाठी आपले सामर्थ्य आहे. त्यामुळे आपण शांत राहणार नाही. आपण धैर्याने, रात्रंदिवस त्याच्या नावाची घोषणा करत राहू, कारण त्याच्यामध्ये जीवन, स्वातंत्र्य आणि विजय आहे.

### आजची प्रार्थना

**मला सुवार्तेची किंवा येशूच्या नावाची लाज बाळगत नाही, कारण येशूच्या सामर्थ्यशाली नावाने ते आपल्या तारणासाठी सामर्थ्य आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**आपण महामार्ग, रस्ते, वाटा आणि इतर कोणत्याही ठिकाणी धैर्याने येशूच्या नावाबद्दल बोलू. आपण जगाने आणि त्याच्या व्यवस्थांनी शांत केले जाण्यास नकार देतो, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने. आमेन.**

**पुढील अभ्यास**
प्रेषितांचीकृत्ये ४:२९

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०६**
विलापगीत ३-५; इब्री ४



# पुढे चला!

**१करिंथ१६:९ (MARVBSI)**
**कारण मोठे व कार्य साधण्याजोगे द्वार माझ्यासाठी उघडले आहे; आणि विरोध करणारे पुष्कळच आहेत.**

देवानेआपल्या मुलांसाठी मोठे, अर्थपूर्ण आणि जीवन बदलणारे दारे उघडण्यात प्रभुत्व मिळवले आहे, जसे त्याने प्रेषित पौलासाठी केले होते. तरीही पौल हे स्पष्ट करतो: दार उघडे असतानाही, विरोध होऊ शकतो.

सत्य हे आहे की, प्रत्येकजण तुमच्या प्रगतीचे उत्सव साजरा करत नाही. काही जण तुम्ही अपयशी व्हावे अशी शांतपणे वाट पाहत असतात. अडथळे येऊ शकतात आणि आव्हाने दिसू शकतात, परंतु महत्त्वाचे हे आहे: देवाने उघडलेले दरे कोणीही बंद करू शकत नाही.

म्हणून विरोधाकडे लक्ष देऊ नका. तुमचे लक्ष देवावर केंद्रित ठेवा, जो कोणत्याही प्रतिकारापेक्षा महान आहे आणि शत्रूची प्रत्येक योजना थांबवण्यास पूर्णपणे सक्षम आहे.

### आजची प्रार्थना

**पवित्र आत्म्याच्या अधिकाराने, मी माझ्या मार्गातील प्रत्येक अडथळा आणि अडचण दूर करतो. मी असा हुकूम देतो आणि घोषित करतो की माझ्या प्रगतीमध्ये आणि जीवनातील उन्नतीमध्ये मला कोणीही रोखू शकणार नाही.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाची शपथ, मी सैन्यावरून धावतो आणि भिंतीवरून उडी मारतो. येशूच्या सामर्थ्यशाली नावाने, माझ्या प्रगतीमधील प्रत्येक अडथळा, प्रत्येक विरोध आणि प्रत्येक प्रतिकार मोडून काढण्यात आला आहे.**

**पुढील अभ्यास**
स्तोत्र १८:२९

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०७**
यहेज्केल १-२; इब्री ५



GoodNews DAILY

# ख्रिस्तामध्ये रुजलेले

**कलस्सै २:७ (MARVBSI)**
**त्याच्यामध्ये मुळावलेले, रचले जात असलेले, तुम्हांला शिकवल्याप्रमाणे विश्वासात दृढ होत असलेले, आणि निरंतर उपकारस्तुती करणारे व्हा.**

"रुजलेले" (rooted) हा शब्द ग्रीक शब्द 'rhizoo' (रिझो) वरून आला आहे, ज्याचा अर्थ ठामपणे लावले जाणे आणि खोलवर आधारलेले असणे असा होतो. देवाचे मूल म्हणून, तुमचे सामर्थ्य आणि स्थिरता त्याच्या वचनाद्वारे ख्रिस्तामध्ये स्थिर राहण्यातून येते.

जेव्हा तुम्ही नियमितपणे पवित्र शास्त्राचा अभ्यास करता आणि त्यावर मनन करता, तेव्हा तुम्ही रुजलेले बनता. देवाचे वचन येशूला प्रकट करते, आणि तुम्ही जितके अधिक त्यावर लक्ष केंद्रित कराल, तितके अधिक तुम्ही त्याला प्रतिबिंबित करू लागाल. परिवर्तन नेहमीच त्वरित असू शकत नाही, परंतु जेव्हा तुम्ही वचनात राहता तेव्हा ते निश्चित असते.

जसजसे तुम्ही देवाच्या वचनात वाढत जाता , तसतसा तुमचा पाया अधिक मजबूत होतो. जीवनातील आव्हानांनी तुम्ही आता सहज डळमळीत नाही किंवा वेगवेगळ्या शिकवणींनी गोंधळून जात नाही. उलट, तुम्ही ठाम, अढळ, पायाभूत आणि विश्वासाने परिपूर्ण असे उभे राहता.

जो ख्रिस्ती ख्रिस्तामध्ये खोलवर रुजलेला असतो, तो प्रत्येक ऋतूमध्ये स्थिर राहतो आणि फलदायी बनतो.

### आजची प्रार्थना

**मी तुझ्या वचनात वास्तव्य करत असल्यामुळे, एका गौरवापासून दुसऱ्या गौरवापर्यंत, तुझे प्रतिरूप बनत आहे. माझे जीवन दररोज तुझे स्वरूप अधिक प्रतिबिंबित करत आहे, येशूच्या नावाने. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझा विश्वास प्रभूमध्ये रुजलेला आणि स्थापित आहे. मी परिस्थितींनी किंवा खोट्या शिकवणींनी विचलित होत नाही. मी ख्रिस्तामध्ये ठाम आणि अढळ उभा आहे, येशूच्या नावाने. आमेन.**

**पुढील अभ्यास**
स्तोत्र १:२-३

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०८**
यहेज्केल ३-४; इब्री ६



GoodNews DAILY

# देवाचे युद्ध

**२ इतिहास २०:२१ (MARVBSI)**
**सैन्याबरोबर बाहेर जाताना 'परमेश्वराचा धन्यवाद करा, कारण त्याची दया सनातन आहे,' हे स्तोत्र पावित्र्याने मंडित होऊन गावे म्हणून त्याने प्रजेचा सल्ला घेऊन कित्येकांना त्या कामी नेमले.**

जेव्हा यहोशाफाट राजा आणि यहुदा यांच्यासमोर एका मोठ्या शत्रूचे आव्हान उभे राहिले, तेव्हा त्यांनी परमेश्वराकडे मदत मागितली. देवाच्या प्रतिसादाने एक शक्तिशाली सत्य उघड केले: ते युद्ध त्यांचे नव्हते, तर देवाचे होते.

देवाचे लेकरे म्हणून, आपण बऱ्याचदा प्रत्येक परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य असलेल्या देवापेक्षा शत्रूवर अधिक लक्ष केंद्रित करतो. यहोशाफाट आणि यहुदा यांना स्तुती करत युद्धात जाण्याची आणि उपासनेला शस्त्र बनवण्याची सूचना देण्यात आली होती.

जेव्हा तुम्ही देवाची स्तुती आणि उपासना करता, तेव्हा तो तुमच्या वतीने लढू लागतो. तो तुमच्या शत्रूंच्या विरोधात सापळे रचतो, आणि विजय निश्चित होतो. देव दयाळू आहे, आणि त्याची दया तुमच्या जीवनावर बोलेल.

### आजची प्रार्थना

**पित्या, मी तुझे आभार मानतो की तुझी दया दररोज सकाळी माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर नवीन असते माझ्यासमोर येणाऱ्या प्रत्येक लढाईत मीतुझ्यावर विश्वास ठेवतो.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी घोषितकरतो की परमेश्वर माझ्या पाठीशी आहे आणि कोणीही माझ्याविरुद्ध उभे राहू शकत नाही. त्याचा चांगुलपणा आणि दया माझ्या आयुष्या मध्ये सर्व दिवसा मध्ये माझ्यासोबत राहो, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने, आमेन.**

**पुढील अभ्यास**
रोमकरांस ८:३१

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३०९**
यहेज्केल ५-७; इब्री ७



GoodNews DAILY

# सलोख्याची सेवा

**२करिंथ५:१९ (MARVBSI)**
**म्हणजे जगातील लोकांची पातके त्यांच्याकडे न मोजता, देव ख्रिस्तामध्ये स्वत:बरोबर जगाचा समेट करत होता; आणि त्याने आपल्याकडे समेटाचे वचन सोपवून दिले.**

देवाने आपल्या मुलांना सलोख्याची सेवा (ministry of reconciliation) सोपवली आहे, ख्रिस्त येशूद्वारे जगाला त्याच्याकडे परत आणण्यासाठी आपल्याला बोलावले आहे. पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी व्यक्तीमुळे स्वर्गात आनंद होतो, यावरून आपल्याला दिसून येते की प्रत्येक आत्मा देवासाठी किती मौल्यवान आहे.

आत्मे जिंकण्याची जबाबदारी केवळ काही निवडक लोकांसाठी नाही तर देवाच्या प्रत्येक मुलासाठी आहे. आपल्याला पुनर्संचयित (restoration) संदेश वाहून नेण्यासाठी बोलावले आहे आणि इतरांना ख्रिस्ताकडे निर्देशित करण्यासाठी प्रत्येक संधीला तयार असले पाहिजे. येशूला वधस्तंभावर उंच केले गेले जेणे करून तो सर्व लोकांना स्वत:कडे आकर्षित करू शकेल, आणि आपण त्या दैवी आदेशाचा एक भाग आहोत. आपण हे कार्य कधीही हलके घेऊ नये, तर तारण न मिळालेल्यांना देवाकडे नेण्याच्या बहुमानाचा सन्मान केला पाहिजे.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, आत्म्यांना जिंकण्याच्या कार्यात माझी बुद्धी दररोज वाढव. जे तुला ओळखत नाहीत त्यांच्याशी जीवन आणि पुनर्संचयित शब्द बोलण्याचे धाडस मला दे.**

### भविष्यसूचक घोषणा

**एकाच दिवसात गाव, शहर आणि राष्ट्र जिंकण्याची कृपा माझ्या वाट्याला आली आहे. मी आत्मे जिंकण्याच्या कार्यात धाडसी, सातत्यपूर्ण आणि अजिंक्य आहे. येशूच्या सामर्थ्यशाली नावाने, आमेन.**

**पुढील अभ्यास**
मत्तय २८:१९-२०

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१०**
यहेज्केल ८-१०; इब्री ८




# राजनैतिक संरक्षण

**उत्पत्ती ३१:२९ (MARVBSI)**
**तुला अपाय करण्याचे सामर्थ्य मला आहे, पण काल रात्री तुझ्या वडिलांच्या देवाने मला सांगितले की, सांभाळ, याकोबाला बरेवाईट काही बोलू नकोस.**

देवाचे मूल म्हणून, तुमच्याकडे दैवी संरक्षण (divine immunity) आहे. त्याच्या आज्ञेने, तुमचे शत्रू रोखले गेले आहेत; ते तुम्हाला हानी पोहोचवण्यासाठी सीमा ओलांडू शकत नाहीत. ख्रिस्तामधील तुमची ओळख हेच तुमचे आवरण आणि तुमचे संरक्षण आहे. देव प्रत्येक लपलेला हेतू पाहतो. त्याच्या नजरेतून काहीही सुटत नाही. शत्रूने कृती करण्यापूर्वीच, तो हस्तक्षेप करतो आणि त्यांच्या योजना थांबवतो. हा तुमचा आत्मविश्वास आहे; स्वर्ग सक्रियपणे तुमच्यावर लक्ष ठेवून आहे.

ज्या प्रमाणे देवाने लाबानाला याकोबाला स्पर्श न करण्याचा इशारा दिला, त्याचप्रमाणे तो तुमच्या जीवना भोवती सीमा निश्चित करतो. प्रत्येक हल्ला, मग तो शारीरिक असो वा आध्यात्मिक, तुमच्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच अडवला जातो आणि नष्ट केला जातो. ख्रिस्ताचे राजदूत म्हणून हा तुमचा वारसा आहे. तुम्हाला दैवी संरक्षण मिळाले आहे हे ओळखून धैर्याने चाला.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, पवित्र आत्म्याच्या अधिकाराने, मी घोषित कारतो की शत्रू त्याच्या कल्पनेत जे काही रचत आहे त्याचा पूर्णपणे अंत झाला आहे. येशूच्या सामर्थ्यशाली नावाने शत्रूची प्रत्येक योजना नष्ट केली गेली आहे. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शत्रूच्या प्रत्येक अनपेक्षित हल्ल्यापासून सुरक्षित आहे. येशूच्या सामर्थ्यशाली नावाने मी संरक्षित आणि रक्षित आहे. आमेन.**

**पुढील अभ्यास**
१ थेस्सलनी ३:३

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३११**
यहेज्केल ११-१३; इब्री ९




# पुनरुत्पादक क्षमता

**नीतिसूत्रे २३:२ (MARVBSI)**
**तू खादाड असलास तर आपल्या गळ्याला सुरी लाव.**

देवाची अशी इच्छा आहे की त्याच्या मुलांनी पूर्ण, दीर्घ आणि फलदायी आयुष्य जगावे. पवित्र शास्त्र दाखवते की शंभर किंवा त्याहून अधिक वर्षे जगणे हे सामान्य मानले पाहिजे; त्यापेक्षा कमी काहीही असल्यास ते आयुष्य अपूर्ण असल्याचे दर्शवते. दीर्घायुष्याची एक गुरुकिल्ली म्हणजे शिस्त, विशेषत: अन्नाच्या इच्छेबाबत.

उपवास करणे हे अन्नापासून दूर राहण्यापेक्षा खूप मोठे आहे; हे एक आध्यात्मिक कार्य आहे जे तुमचे शरीर आणि आत्मा देवाच्या उद्देशाशी संरेखित करते. जेव्हा तुम्ही तुमच्या लालसेवर नियंत्रण ठेवता, तेव्हा तुम्ही दैवी शक्ती आणि नूतनीकरणासाठी जागा करता. संशोधनातूनही असे दिसून आले आहे की उपवास केल्याने शरीरातील पेशी सक्रिय होतात ज्या तारुण्य परत प्राप्त करून देतात.

ज्या आत्म्याने येशूला मेलेल्यांतून उठवले, तेच पुनरुत्थानाचे सामर्थ्य तुमच्यात राहते. तुम्ही क्षय किंवा अकाली मृत्यूच्या अधीन नाही. तुमच्यातील देवाचे जीवन नैसर्गिक मर्यादांच्या पलीकडे तुमचे नूतनीकरण करण्यास, पुनर्संचयित करण्यास आणि तुम्हाला टिकवून ठेवण्यास सक्षम आहे.

जेव्हा तुम्ही प्रार्थना आणि उपवासाच्या जीवनशैलीसाठी स्वत:ला समर्पित करता, तेव्हा तुमच्या शरीर, मन आणि आत्म्यामध्ये एक ताजेतवाने पणाची अपेक्षा करा.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी उपवास आणि प्रार्थनेत स्वत:लावाहून घेत असतांनामाझे तारुण्य गरुडासारखे पुनर्संचयित कर आणि माझ्या नश्वर शरीराला बळ दे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी माझ्या आयुषापेक्षा दीर्घायुष्याची घोषणा करतो. येशू ख्रिस्ताच्या सामर्थ्यशाली नावाने अकाली मृत्यूची प्रत्येक योजना रद्द करण्यात आली आहे. आमेन.**

**पुढील अभ्यास**
स्तोत्र ९१:१६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१२**
लूक२१:२०-३८; स्तोत्रसंहिता ११६-११८



# सकाल शहाणपण

**१शमुवेल १८:१४ (MARVBSI)**
**दावीद आपली सर्व कामे चतुराईने सिद्धीस नेत असे, आणि परमेश्वर त्याच्याबरोबर असे.**

शहाणपणही सर्वात मुख्य गोष्ट आहे. याकोब आपल्याला प्रोत्साहित करतो: जर कोणाला शहाणपणाची कमतरता असेल, तर त्याने देवाजवळ मागावे, जो दोष न काढता उदारतेने देतो, आणि ते त्याला दिले जाईल. दाविदाचे जीवन या आलोकिक शहाणपणामुळे—सकाल (sakal)—उठून दिसले. त्याने योग्य निर्णय घेतले कारण देव त्याच्यासोबत होता.

तुम्हीदेखील शहाणपणात वाढू शकता आणि खऱ्या मार्गावर चालू शकता. पवित्र शास्त्र प्रकट करते की येशू ख्रिस्त हाच देवाचे शहाणपण आणि सामर्थ्य आहे. नव्याने जन्म घेणे म्हणजे ख्रिस्त, गौरवाची आशा, तुमच्यामध्ये राहतो—याचा अर्थ शहाणपण तुमच्यामध्ये आधीच आहे, आणि तुम्ही देवाच्या वचनात वेळ घालवता तसे ते वाढत जाते.

यहोशवाला वचनावर रात्रंदिवस मनन करण्याची आज्ञा दिली होती, आणि परिणामी, तो समृद्ध होईल आणि त्याला चांगले यश मिळेल. ते "चांगले यश" हेच दाविदाच्या जीवनात दिसणारे सकाल शहाणपण आहे, असे शहाणपण जे परिणाम घडवून आणते.

देवाच्या वचनाला तुमच्या जीवनाचा दर्जा बनवा आणि जाणीवपूर्वक शहाणपणाचा पाठपुरावा करा. जसे तुम्ही हे कराल, तसे तुम्ही स्पष्टता, दिशा आणि आलोकिक यशाच्या मार्गावर चालाल.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, जसजसे मी तुझे वचन ग्रहण करतो, तसतसा मी तुझ्यासारखा होत जातो. येशूच्या सामर्थ्यशाली नावाने मी शहाणपणाच्या एका पातळीवरून दुसऱ्या पातळीवर वाढत जातो.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी आणि माझे कुटुंब मूर्खांमध्ये गणले जाणार नाही. आपण जे काही करतो त्यामध्ये आपण शहाणपणाने चालतो; म्हणून, आपण अपयशी होणार नाही. उत्तम यश आणि समृद्धी आमच्या वाट्याला येणार आहे.**

**पुढील अभ्यास**
यहोशवा १:८

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१३**
यहेज्केल १४-१५; इब्री १०





GoodNews DAILY

# सन्मानाची वृत्ती

**मत्तय१३:५८ (MARVBSI)**
**तेथे त्यांच्या अविश्वासामुळे त्याने फारशी अद्भुत कृत्ये केली नाहीत.**

देव बऱ्याचदा महान गोष्टी साध्य करण्यासाठी जे क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीचा वापर करतो. संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये, ज्यांना देवाने निवडले ते माणसांच्या दृष्टीने नेहमीच सर्वात पात्र नव्हते, तरीही त्यांच्यावर दैवी कृपा होती.

ओळखीमुळे लोकांना महानता दिसत नाही. जेव्हा येशूच्या गावतील लोकांनी त्याला पाहिले, तेव्हा ते त्याचा दैवी स्वभाव ओळखण्यात अपयशी ठरले. त्यांनी त्याला "सुताराचा मुलगा" म्हणून कमी लेखले, आणि असे करून त्यांनी त्याच्या जीवनावरील कृपेचा अनादर केला. सामर्थ्य उपस्थित असले तरी, त्यांच्या सन्मानाच्या अभावामुळे त्यांना जे मिळू शकले असते ते मर्यादित झाले.

सन्मान ही एक आध्यात्मिक गुरुकिल्ली आहे. देवाने इतरांमध्ये जे ठेवले आहे त्यात प्रवेश करण्यासाठी हे तुम्हाला योग्य स्थितीत ठेवते. जेव्हा तुम्ही लोकांवरील कृपेला ओळखता आणि त्याचा आदर करता—विशेषतः ज्यांना देवाने तुमच्या वर ठेवले आहे—तेव्हा तुम्ही स्वतःला आशीर्वादाशी जोडता. दुसरीकडे, अनादर असे दरवाजे बंद करू शकतो जे केवळ प्रार्थना आणि उपवासाने उघडत नाहीत.

कृपा लवकर ओळखायला शिका आणि नम्रता आणि आदराने प्रतिसाद द्या. कधीकधी, तुमच्या पुढच्या पातळीचे कुलूप उघडणारी गोष्ट अधिक प्रयत्न नसून, सन्मानाची वृत्ती (posture of honour) असते.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मला नम्र आणि शिकण्याची वृत्ती दे. तू माझ्या जीवनात ज्यांना ठेवले आहे त्यांना ओळखण्यास आणि त्यांचा सन्मान करण्यास मला मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी शहाणपण आणि विवेकाने चालतो. मी कृपा पाहतो आणि तिचा आदर करतो. जसा मी आदराचा सराव करतो, तसे माझे जीवन पुढे जाते आणि माझ्यासाठी संधीचे दारे उघडतात.**

**पुढील अभ्यास**
१ तीमथ्य ५:१७

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१४**
यहेज्केल १६-१७; इब्री ११



# पहारेकऱ्यांनो उठा!

**यहेज्केल २२:३० (MARVBSI)**
**मी भूमीचा नाश करू नये म्हणून तिच्यातला कोणी तट बांधील, कोणी माझ्यासमोर देशासाठी तटाच्या खिंडीत उभा राहील की काय ह्याची मी वाट पाहिली, पण मला कोणी आढळला नाही.**

प्रार्थना न करणारा ख्रिस्ती हा संरक्षण व्यवस्थेशिवाय असलेल्या राष्ट्रासारखा आहे. आधुनिक देश विमाने, ड्रोन आणि क्षेपणास्त्रांपासून संरक्षण करण्यासाठी यंत्रणांवर मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. अशा संरक्षणाशिवाय, शत्रूला अनिर्बंध प्रवेश मिळतो, ज्यामुळे विनाश आणि दुःख होते.

आपल्या सुरुवातीच्या शास्त्रात देवाचा हाच आक्रोश होता. त्याला इस्राएलवर न्याय आणायचा नव्हता, परंतु मध्यस्थी करायला कोणीही नव्हते. मोशे आणि अब्राहाम यांसारख्या पुरुषांना मध्यस्थीचे सामर्थ्य समजले होते; त्यांच्या प्रार्थनांद्वारे, देवाने दया दाखवली आणि न्याय रोखून धरला.

प्रार्थना ही केवळ एक दिनचर्या नाही; ती एक आध्यात्मिक जबाबदारी आहे. हे राष्ट्रे, शहरे, कुटुंबे आणि व्यक्तींवर संरक्षणाचे कुंपण स्थापित करते. जेव्हा आपण प्रार्थना करतो, तेव्हा दृष्टं शक्तींना रोखले जाते आणि आलोकिक सुव्यवस्था सोडली जाते. आत्म्यात शांत राहणे जीवनांना आणि प्रदेशांना धोक्यात आणते, परंतु सातत्यपूर्ण प्रार्थना त्यांना सुरक्षित करते.

देव आजही पहारेकऱ्यांचा शोध घेत आहे, असे लोक जे उठतील आणि आत्म्यात जबाबदारी स्वीकारतील.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने मला अविरत मध्यस्थी करण्याच्या कृपेने वस्त्र परिधान कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी माझ्या पिढीत एक पहारेकरी म्हणून उभा राहतो. जसा मी मध्यस्थी उभा राहतो, तशा माझ्या राष्ट्राभोवती, शहराभोवती, कुटुंबाभोवती आणि नशिबाभोवतीच्या भिंती मजबूत होतात. मी प्रार्थनेत विजयी होत असताना विजय निश्चित आहे.**

**पुढील अभ्यास**
उत्पत्ती १८:२३-२५

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१५**
यहेज्केल १८-१९; इब्री १२



GoodNews DAILY

# आशीर्वादाची दरी

**२राजे३:१७ (MARVBSI)**
**परमेश्वर म्हणतो, काही वादळ किंवा पाऊस तुमच्या दृष्टीस न पडता हे खोरे पाण्याने भरून जाईल; आणि तुम्ही, तुमची पाठाळे आणि जनावरे पाणी पितील.**

इस्राएल, यहुदा आणि अदोमच्या राजांनी मवाबाशी लढण्यासाठी रानातून प्रवास केला, परंतु सात दिवसांनंतर, सैन्य आणि त्यांच्या प्राण्यांसाठी पाणी संपले. निराश होऊन त्यांनी भविष्यवक्ता अलीशाची मदत मागितली.

अलीशाने परमेश्वराचा शब्द घोषित केला: तिथे वारा किंवा पाऊस नसणार, तरीही दरी पाण्याने भरेल. दुसऱ्या दिवशी सकाळी, चमत्कारिकरित्या, पाणी दरीत आले, आणि जिथे कोरडेपणा होता तिथे जीवन आले.

जे मृत्यूची दरी वाटत होते ते दैवी तरतुदीचे स्थान बनले. यहोशाफाटला समजले होते की जेव्हा देव त्याच्या सेवकाद्वारे बोलतो, तेव्हा अलौकिक पुरवठा सोडला जातो. त्याने अशा देवावर विश्वास ठेवला जो नैसर्गिक व्यवस्थेच्या पलीकडे जाऊन तरतूद करतो.

आज, ख्रिस्ताद्वारे, आपण त्याच देवाची सेवा करतो जो गौरवात असलेल्या आपल्या संपत्तीनुसार आपल्या सर्व गरजा पुरवतो. जेव्हा विश्वासाला कृतीत आणले जाते तेव्हा तुमचे कोरडे स्थान विपुलतेचे स्थान बनते.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, माझ्या जीवनातील प्रत्येक कोरड्या हंगामाचे फलदायीतेत रूपांतर कर. येशूच्या नावाने अलौकिक तरतूद मला शोधू दे आणि माझ्या जीवनातील कमतरता दूर करू दे. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी सर्व बाजूंनी वाढलो आहे. मी कृपा आणि विपुलतेत चालतो. माझे जीवन समृद्ध आहे, आणि येशूच्या सामर्थ्यशाली नावाने मी इतरांसाठी एक आशीर्वाद आहे.**

**पुढील अभ्यास**
स्तोत्र ३७:२५

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१६**
यहेज्केल २०-२१; इब्री १३




# वेळेशी निगडितशाप

**यहोशवा ६:२६ (MARVBSI)**
**त्या समयी यहोशवाने असा शाप दिला की, "जो कोणी यरीहो नगर उभारण्यास प्रवृत्त होईल त्याला परमेश्वराचा शाप लागेल. त्याचा पाया घालताच त्याचा ज्येष्ठ पुत्र मरेल आणि त्याच्या वेशी उभारताच त्याचा कनिष्ठ पुत्र मरेल.**

शत्रू वेळेशी निगडित शापांद्वारे (time-sensitive curses) कार्य करतो जे व्यक्तीच्या जीवनातील विशिष्ट हंगामात प्रकट होतात. या यादृच्छिक घटना नसून, ठरलेल्या वेळी सक्रिय होणारी चक्रे आहेत.

पवित्र शास्त्रामध्ये नोंद आहे की,यहोशवाने यरीहोची पुनर्बांधणी जो कोणी करेल त्याला शाप दिला होता. अनेक पिढ्यांनंतर, अहाबाच्या काळात हिएलने तसे केले, आणि ते वचन पूर्ण झाले. त्याने आपल्या पहिल्या मुलाच्या बदल्यात त्याचा पाया घातला आणि सर्वात धाकट्या मुलाच्या बदल्यात त्याचे दरवाजे बसवले हा पुरावा आहे की शब्दांमध्ये वेळेच्या पलीकडे आध्यात्मिक वजन असते.
तथापि, देव कोणत्याही शापापेक्षा महान आहे. तुमच्या जीवनावर लादलेली प्रत्येक मर्यादा मोडून काढण्याचे आणि प्रत्येक आध्यात्मिक आणि भौतिक अडथळा नष्ट करण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे आहे.

आज, प्रत्येक नकारात्मक नमुना, प्रत्येक वारशाने मिळालेला संघर्ष आणि प्रत्येक विलंब मोडला गेला आहे. तुम्ही भूतकाळातील चक्रांची पुनरावृत्ती करणार नाही किंवा तुमच्या आधीच्या लोकांनी जे भोगले ते तुम्ही भोगणार नाही.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी तुझा आभारी आहे की ख्रिस्ताने मला नियमशास्त्राच्या शापातून मुक्त केले आहे. त्याच्यामध्ये, मी अब्राहामाचे वंशज आणि अभिवचनानुसार वारसदार आहे. येशूच्या नावाने मी तुझ्या आशीर्वादात चालतो. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**आजचा दिवस माझ्यासाठी अल्लोकिक हस्तक्षेपाचा क्षण आहे. प्रत्येक वाईट नमुना आणि मर्यादा मोडून काढली गेली आहे, आणि मी माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर स्वातंत्र्य, पुनर्संचयन आणि विजयाची घोषणा करतो. आमेन.**

**पुढील अभ्यास**
गलती ३:१३-१४

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१७**
यहेज्केल २२-२३; याकोब १



Good News DAILY

# एक नवीन सुरुवात!

**२ करिंथ ५:१८ (MARVBSI)**
**ही सगळी देवाची करणी आहे; त्याने स्वत:बरोबर आपला समेट येशू ख्रिस्ताच्या द्वारे केला आणि समेटाची सेवा आम्हांला दिली;**

पश्चात्ताप न करणाऱ्या नव्व्याण्णव नीतिमानांपेक्षा लोकांपेक्षा, पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी व्यक्तीमुळे स्वर्गात अधिक आनंद होतो. देवाने सलोख्याची सेवा आपल्याकडे सोपवली आहे. त्याची इच्छा आहे की कोणाचाही नाश होऊ नये आणि प्रत्येकाने देवाच्या ज्ञानाकडे यावे. सुवार्ता सामायिक करण्याबाबत आणि आपल्या सभोवतालच्या लोकांपर्यंत पोहोचण्याबाबत हेतुपुरस्सर असा.

देवासाठी बोलण्यास तयार राहा. जर जगाने ऐकलेच नाही तर ते विश्वास ठेवू शकत नाहीत, आणि उपदेशाशिवाय ते ऐकूही शकत नाहीत. तुम्ही तेच दूत आहात ज्यांना तारण मिळाले नाही ,त्याच्या पर्यंत पोहोचण्यासाठी देवाने पाठवलेले, निवडलेले आणि सामर्थ्य दिले आहे.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, आजपासून माझ्या मुखातून पुनर्संचयित (restoration) शब्द निघत आहेत. येशूच्या सामर्थ्यशाली नावाने, मी माझ्या जगातील हरवलेल्या लोकांना पुनर्संचयनाचा संदेश देण्यासाठी तत्पर आणि धाडसी आहे. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी देवाच्या सुवार्तेचा राजदूत आणि कारभारी आहे. मी माझ्या अंत:करणात त्याचे वचन जिवंत करतो, ख्रिस्ताच्या प्रेमाने आणि त्याच्या कृपेच्या सामर्थ्याने हृदयांना स्पर्श करतो, येशूच्या नावाने. आमेन.**

**पुढील अभ्यास**
मार्क १६:१५

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१८**
यहेज्केल २४-३६; याकोब २




# बांधकाम स्थळ

**प्रेषितांची कृत्ये २०:३२ (MARVBSI)**
**आता बंधूंनो, मी तुम्हांला प्रभूकडे व त्याच्या कृपेच्या वचनाकडे सोपवतो; तो तुमची वाढ करण्यास व पवित्र केलेल्या सर्व लोकांमध्ये तुम्हांला वतन देण्यास समर्थ आहे.**

"बांधणे" (build) हा शब्द प्रकट करतो की देवाचे वचन हे देवाच्या मुलाच्या जीवनात बांधकामासाठी एक साधन आहे. ख्रिस्तामधील तुमची वाढ तुम्ही नियमितपणे स्वीकारत असलेल्या, मनन करत असलेल्या आणि लागू करत असलेल्या वचनाच्या थेट प्रमाणात असते. वचनाची कमतरता आध्यात्मिक वाढ खुंटवते आणि तुमच्या दैवी वतनात पूर्णपणे चालण्याच्या क्षमतेला मर्यादित करते.

ज्याप्रमाणे एक बांधकाम करणारा वीट-वीटांनी एक इमारत उभी करतो, त्याचप्रमाणे देवाच्या वचनाद्वारे तुमचे आध्यात्मिक जीवन जाणीवपूर्वक दररोज बांधले गेले पाहिजे. तुम्ही ज्या प्रत्येक शास्त्राशी जोडले जाता, ते तुम्हाला मजबूत करते, स्थिर करते आणि उंचावते. या प्रक्रियेद्वारे, तुम्ही परिपक्वतेत वाढता आणि देवाच्या अभिवचनांमध्ये ठामपणे स्थापित होता. देवाचे वचन हे तुमचे सामर्थ्य आहे; ते तुम्हाला ख्रिस्तामध्ये वचन दिलेल्या सर्व गोष्टी प्राप्त करण्यास आणि प्रकट करण्यास सामर्थ्य देते.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मला माझ्या आध्यात्मिक जीवनात सातत्य ठेवण्यास मला मदत कर, जेणेकरून देवाच्या वचनाचा अभ्यास आणि मनन करण्याच्या माझ्या समर्पणात कधीही ढिलाई करू नकोस. माझ्या वेदीवरील अग्नी सतत तेवत राहू दे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी देवाच्या वचनाने दृढ आणि मजबूत स्थिर झालो आहे, माझ्या वारस्यात, सामर्थ्यात आणि न थांबवता येणाऱ्या दैवी उद्देशात मी विजयी होऊन चालत आहे.**

**पुढील अभ्यास**
याकोब १:२२-२५

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३१९**
लूक २२:१-३०; स्तोत्रसंहिता ११९:१-८८



# आश्चर्यकारक आशीर्वाद!

**२ करिंथ ९:८ (MARVBSI)**
**सर्व प्रकारची कृपा तुमच्यावर विपुल होऊ देण्यास देव समर्थ आहे; ह्यासाठी की, तुम्हांला सर्व गोष्टींत सगळा पुरवठा नेहमी होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सर्वकाही तुमच्याजवळ विपुल व्हावे.**

असे काही लोक आहेत ज्यांना देव सोडून देऊ शकत नाही, असे लोक ज्यांच्या शिवाय तो राहू शकत नाही. याचे रहस्य देण्यात दडलेले आहे. एक उदार व्यक्ती समृद्ध होतो आणि त्याचे जग विस्तारते, तर कंजूष व्यक्ती प्रभाव आणि परिणामात आकुंचन पावते. देणे हे विस्ताराचे दैवी तत्त्व आहे. हे देवाच्या कृपेला, त्याची अनुकूलता आणि तुमच्या जीवनावरील आशीर्वादांना सक्रिय करते.

तबिथा (दुर्कस) चा विचार करा, जी तिच्या दयाळूपणासाठी आणि उदारतेसाठी ओळखली जात होती. जेव्हा ती आजारी पडली आणि मरण पावली, तेव्हा देवाने तिच्याकडे दुर्लक्ष केले नाही. प्रेषित पेत्राच्या प्रार्थनेद्वारे, तिला परत जिवंत करण्यात आले. देवाला एका दानशूर व्यक्तीची जागा घेण्यापेक्षा एका देणाऱ्याला पुन्हा जिवंत करणे सोपे वाटले. यावरून हे दिसून येते की, देवाच्या दृष्टीने दानशूर जीवन किती मौल्यवान आहे.

जर तुम्हाला अफाट आश्चर्यकारक आशीर्वादांची हवे असेल, तर स्वतःला दान देण्यासाठी समर्पित करा. देव केवळ तुम्हाचा सांभाळ करणार नाही, तर तुमच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात आणि प्रत्येक स्वप्नात विपुल प्रमाणात वाढवेल. देवाचे मूल म्हणून, तुम्हाला विपुलतेत जगण्यासाठी आव्हान आहे, जेणे करून तुम्ही उदारपणे इतरांना आशीर्वाद देऊ शकाल.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मला देण्याच्या कृपेत उत्कृष्ट होण्यास मदत कर जेणे करून मी माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विपुलतेत चालू शकेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझ्या देण्याद्वारे, माझ्याकडे कृपा निर्देशित केली जाते. मी अनुकूलता, सन्मान आणि प्रतिष्ठेमध्ये चालतो. योग्य लोक, संधी आणि संसाधने माझ्या जीवनासाठी देवाच्या उद्देशाशी जुळतात.**

**पुढील अभ्यास**
याकोब ४:६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२०**
यहेज्केल २७-२९; याकोब ३




# प्रवाहाविरुद्ध जाणे

**याकोब ४:६ (MARVBSI)**
**म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुमच्यापासून पळून जाईल.**

आपल्या मुलांना कृपा वाटणे हा देवाचा विशेषाधिकार आहे, तरीही ही कृपा समान प्रमाणात दिली जात नाही. पवित्र शास्त्र घोषित करते की कृपा वेगवेगळ्या प्रकारे विभागली गेली आहे, ज्यामुळे प्रत्येक ख्रिस्ती अभिव्यक्ती आणि कार्यात अद्वितीय बनतो. चांगली बातमी ही आहे की एखादी व्यक्ती कृपेत वाढू शकते.

कृपेत वाढण्याची एक गुरुकिल्ली म्हणजे नम्रता. अहंकार देवाकडून विरोध ओढवून घेतो. "गर्विष्ठ" (proud) हा शब्द ग्रीक शब्द 'अँटिटासोमाई' (antitassomai) वरून आला आहे, ज्याचा अर्थ "स्वतःला विरुद्ध उभे करणे" असा होतो. हे अशा सैनिकाचे चित्र रेखाटते जो बाकीच्या सैन्यापासून विरुद्ध दिशेने कूच करतो, ज्यामुळे संपूर्ण सैन्य त्याच्या विरुद्ध उभे राहण्यास भाग पडते.

त्याचप्रमाणे, जेव्हा एखादी व्यक्ती अहंकाराने चालते, तेव्हा ते स्वतःला देवाच्या विरुद्ध उभे करतात. अहंकारातून जन्मलेल्या कोणत्याही गोष्टीला परमेश्वर सक्रियपणे विरोध करतो आणि निराश करतो. अहंकार म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध जाण्यासारखे आहे; प्रगती कठीण होते आणि परिणामांमध्ये अडथळा येतो. परंतु नम्रता दैवी साहाय्याला आकर्षित करते, व्यक्तीला अधिक कृपेच्या आणि आशीर्वादाच्या कक्षेत उचावते.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने मला नम्र आणि शिकण्याची वृत्ती दे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी नम्रतेने चालतो आणि मला विपुल कृपा करतो. प्रत्येक प्रतिकार मोडून काढला गेला आहे, आणि मी दैवी सहजतेने पुढे जात आहे. देवाची कृपा माझ्या जीवनाला विशेष बनवते, येशूच्या नावाने. आमेन.**

**पुढील अभ्यास**
नीतिसूत्रे ३:३४; १ पेत्र ५:५-६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२१**
यहेज्केल ३०-३२; याकोब ४



# देवाच्या वाणीसारखे बोलणे

**१पेत्र४:११ (MARVBSI)**
**भाषण करणाऱ्याने, आपण देवाची वचने बोलत आहोत, असे बोलावे; सेवा करणाऱ्याने, ती आपण देवाने दिलेल्या शक्तीने करत आहोत, अशी करावी; ह्यासाठी की, सर्व गोष्टींत देवाचा गौरव येशू ख्रिस्ताच्या द्वारे व्हावा; गौरव व पराक्रम हे युगानुयुग त्याचे आहेत. आमेन.**

भविष्यवक्ता शमुवेल हे एक दुर्मिळ पात्र होते; परमेश्वर त्याच्यासोबत होता आणि त्याने त्याचे एकही शब्द निष्फळ होऊ दिले नाहीत. त्याच्या शब्दांना दैवी वजन होते ते रिकामे परत आले नाहीत. त्याचप्रमाणे, देवाच्या मुलांना कमी लेखता येणार नाही. तुम्हाला अधिकाराने बोलण्यासाठी, देवाच्या इच्छेशी जुळवून घेण्याचे बोलावणे आहे.

या जगातही, अशा व्यक्तींना देववाणी (oracles) मानले जाते जे देवापासून जन्मलेले नाहीत. अहीथोफेल हा असाच एक होता ज्याचा सल्ला प्रत्यक्ष देवानेच बोलल्यासारखा मानला जात असे. जर असा प्रभाव अंधारात अस्तित्वात असेल, तर तुम्ही जे देवापासून जन्मलेले आहात त्यांच्यासाठी किती अधिक असेल?

पवित्रशास्त्र विचारते, "जेव्हा परमेश्वराने आज्ञा दिली नाही, तेव्हा कोण आहे जो बोलतो आणि ते घडते?" बोलण्यातील खरे सामर्थ्य देवाकडून येते. तुमचे शब्द आत्मा आणि जीवन आहेत. जीवनात राज्य करणारा राजा म्हणून, तुमचे शब्द रिकामे नाहीत, कारण राजाचे शब्द जिथे असतात तिथे सामर्थ्य असते.

आजपासून, देवाचे प्रतिनिधित्व करणारा म्हणून दैवी जाणीवेने बोला.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, तुझे वचन घोषित करते की मी एखाद्या गोष्टीची घोषणा करीन आणि ती स्थापित होईल. पवित्र आत्म्याच्या अधिकाराने, मी बोललेला प्रत्येक शब्द पूर्ण होईल, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी बोललेला प्रत्येक शब्द स्थापित झाला आहे. माझ्या घोषणा वेगाने प्रकट होतात, नशिबांना देवाच्या उद्देशाशी जुळवून घेतात.**

**पुढील अभ्यास**
विलापगीत ३:३७

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२२**
यहेज्केल ३३-३४; याकोब ५



GoodNews DAILY

# उरलेले तुकडेगोळा करा

**योहान६:१२ (MARVBSI)**
**ते तृप्त झाल्यावर त्याने आपल्या शिष्यांना सांगितले, "काही फुकट जाऊ नये म्हणून उरलेले तुकडे गोळा करा."**

येशूने आपल्या कृतीतून कारभारीपणाची (stewardship) शक्तिशाली तत्त्वे उघड केली. त्याने कधीही भौतिक किंवा आध्यात्मिक संसाधने वाया घालवली नाहीत. जनसमुदायाला खायला घातल्यानंतर, त्याने आपल्या शिष्यांना उरलेले अन्न गोळा करण्याची सूचना दिली, हे दर्शवून की विपुलता हा वाया घालवण्याचा परवाना नाही तर ती एक जबाबदारी आहे.

जेव्हा कनानी स्त्रीने मदत मागितली, तेव्हा येशूने सुरुवातीला नकार दिला आणि म्हणाला की त्याचे कार्य इस्राएलांसाठी आहे. तरीही तिच्या विश्वासातून आणि नम्रतेतून, तिने "तुकडे" वाटणाऱ्या गोष्टींमध्ये प्रवेश मिळवला आणि एक चमत्कार प्राप्त केला. हे दर्शवते की जे लहान किंवा क्षुल्लक वाटते त्यातही दैवी सामर्थ्य असू शकते.

येशूने संयम आणि शहाणपण दोन्ही दाखवले; त्याने प्रत्येक तुकड्याची किंमत जाणली. त्याचप्रमाणे, जीवनात तुम्ही ज्या गोष्टींकडे दुर्लक्ष करता, योग्यरित्या व्यवस्थापित केल्यास त्या मोठ्या प्रभावाचे साधन बनू शकतात.

व्यवसायात, सेवकाईत आणि दैनंदिन जीवनात, उधळपट्टी टाळा. तुकडे गोळा करा आणि त्यांचा जास्तीत जास्त वापर करा. देव जे संरक्षित केले जाते आणि ज्याचे चांगले व्यवस्थापन केले जाते त्याची वाढ करतो.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, , माझ्या जीवनात नाश करणारी प्रत्येक दृष्ट शक्ती, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने, मुळापासून उपटून नष्ट होऊ दे.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाने माझ्यावर सोपवलेल्या सर्व गोष्टींचा मी सुज्ञपणे कारभार करत असल्यामुळे, मी हळूहळू फलदायी होत आहे, येशूच्या नावाने. आमेन.**

**पुढील अभ्यास**
लूक १६:१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२३**
यहेज्केल ३५-३६; १ पेत्र १



# अलौकिक गती!

**योहान६:२१ (MARVBSI)**
**म्हणून त्याला मचव्यात घेण्याची त्यांना इच्छा झाली; तेवढ्यात त्यांना जायचे होते त्या ठिकाणी मचवा किनाऱ्यास लागला.**

जेव्हा येशू नावेत प्रवेश करत असे, तेव्हा चमत्कारांची रांग लागत असे. आपल्याला आठवते की पेत्राने रात्रभर परिश्रम केले पण काहीही यश आले नाही, तरीही येशूच्या आगमनानंतर त्याला आणि त्याच्या साथीदारांना माशांचा मोठा साठा मिळाला. या उताऱ्यात, जनसमुदायाला खायला घातल्यानंतर, येशू आपल्या शिष्यांचा पाठलाग करण्यासाठी पाण्यावरून चालत गेला, ज्यांनी आधीच नावेतून समुद्रापार आपला प्रवास सुरू केला होता.

ज्याक्षणी त्यांनी त्याला नावेत घेतले, त्याच क्षणी पवित्र शास्त्रात एकाशक्तिशाली चमत्काराची नोंद करते: जहाज लगेचच त्याच्या गंतव्यस्थानी पोहोचले. हे दर्शवते की जेव्हा येशू एखाद्या परिस्थितीत पाऊल टाकतो, तेव्हा विलंब संपतो आणि प्रगतीला गती मिळते. त्याची उपस्थिती उत्पादकता, गुणाकार आणि अलौकिक गती (supernatural speed) आणते.

येशू एखाद्याच्या जीवनात उपस्थित असतांना ते जीवन स्थिर किंवा गतिहीन राहू शकत नाही. देवाने तुमच्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या कृपेचा लाभ घ्या. येशू तुमच्या नावेत आहे. वाट पाहा.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, हे सामर्थ्याने किंवा बळाने नाही, तर तुझ्या आत्म्याने आहे. मी आज प्रार्थना करत असताना, येशूच्या नावाने अलौकिक गती मला प्राप्त होऊ दे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी माझ्या जीवनावर अलौकिक गतीची घोषणा करतो. माझ्या प्रगतीचा प्रत्येक प्रतिकार मोडला गेला आहे, आणि विलंबाचा प्रत्येक आत्मा येशूच्या नावाने रद्द करण्यात आला आहे. आमेन.**

**पुढील अभ्यास**
उत्पत्ती २४:१२

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२४**
यहेज्केल ३७-३९; १ पेत्र २



GoodNews DAILY

# सुटकेचा मार्ग

**योहान६:४९ (MARVBSI)**
**तुमच्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला तरी ते मेले.**

येशूने अशी रहस्ये सांगितली जी सामान्य माणसाला खटकणारी होती, तरीही त्याने आध्यात्मिक मनुष्याला जीवन प्रकट केले. अरण्यात मान्नाने इस्राएलांना तात्पुरते टिकवून ठेवले, तरीही ते मृत्यूवर विजय मिळवू शकले नाही. त्याने ख्रिस्ताकडे म्हणजेच स्वर्गातून आलेल्या खऱ्या भाकरीकडे निर्देश केला.

ख्रिस्तामध्ये, आपल्याला केवळ तरतूद दिली जात नाही; आपल्याला संरक्षण (preservation) दिले जाते. येशूने घोषित केले, "जो माझे मांस खातो आणि माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त होते, (योहान ६:५४). प्रभूभोजनातून, आपण त्याचे जीवन, त्याचा स्वभाव आणि त्याच्या विजयात सहभागी होतो.

प्रभूचे मेज हे सुटकेचे एक रहस्य आहे. पवित्र शास्त्र घोषित करते की देव विश्वासू आहे आणि तो सुटकेचा मार्ग उपलब्ध करून देईल. प्रभूभोजन हे त्या दैवी माध्यमांपैकी एक आहे. जेव्हा तुम्ही यामध्ये सहभागी होता, तेव्हा तुम्ही मर्यादेतून बाहेर पडून संरक्षणात पाऊल टाकता, आणि विनाश, आजारपण आणि अकाली मृत्यू पासून सुटका मिळवता.

ज्या गोष्टीने तुमच्या पूर्वीच्या लोकांवर परिणामकारक ठरल्या, त्या तुमच्यावर प्रभाव पाडू शकणार नाही. ख्रिस्तामध्ये, प्रस्थापित पद्धती मोडल्या जातात आणि एक नवीन वंश स्थापित होतो.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, येशूच्या शरीराच्या आणि रक्ताच्या सामर्थ्याद्वारे, येशूच्या नावाने माझ्या जीवनातील प्रत्येक मृत भागाला पुनरुत्थानाचे सामर्थ्य प्राप्त होऊ दे. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी घोषित करतो की मी दैवी सुटका आणि संरक्षणात चालतो. मी प्रत्येक क्षेत्रात भरभराट करतो. ज्याने इतरांना थांबवले ते मला थांबवू शकणार नाही. ख्रिस्तामध्ये, मी विजयी होतो!**

**पुढील अभ्यास**
१ करिंथकर १०:१६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२५**
यहेज्केल ४०-४१; १ पेत्र ३



GoodNews DAILY

# शेवटपर्यंत

**योहान६:६८ (MARVBSI)**
**शिमोन पेत्राने त्याला उत्तर दिले, "प्रभूजी, आम्ही कोणाकडे जाणार? सार्वकालिक जीवनाची वचने आपणाजवळ आहेत;**

जेव्हा येशूने स्वतः जीवनाची भाकर असल्याबद्दल शिकवले, तेव्हा त्याच्या अनेक शिष्यांनी म्हटले, "ही शिकवण कठीण आहे. हे कोण स्वीकारू शकेल, परिणामी, अनेक जण मागे वळले आणि त्यांनी त्याचे अनुसरण करणे सोडले. त्या क्षणी, पेत्र ठामपणे उभा राहिला आणि म्हणाला, "प्रभू, आम्ही कोणाकडे जावे? तुझ्याकडे अनंतकाळच्या जीवनाची वचने आहेत."

पेत्राने आपला शब्द पाळला. यहूदाच्या विपरीत, ज्याचे हृदय भ्रष्ट होते आणि ज्याने त्याचा विश्वासघात केला, पेत्राकडे कमकुवतपणाचा एक क्षण होता जेव्हा त्याने येशूला नाकारले, परंतु त्याचे हृदय खरे राहिले—तो मार्गावर टिकून राहिला. आज तुमच्यासाठी हे एक आवाहन आहे: शेवटपर्यंत येशू ख्रिस्ताचे अनुसरण करण्याची वचनबद्धता करा. जगाच्या प्रेमाला तुमच्यात रुजू देऊ नका. त्याचे सुख क्षणिक आहे, परंतु ख्रिस्तामध्ये मिळणारे जीवन सार्वकालिक आहे.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मला माझ्या हृदयाचे पूर्ण काळजीने रक्षण करण्यास मदत कर, जेणेकरून शेवटी मी तुला असे म्हणताना ऐकेन, "शाब्बास, चांगल्या आणि विश्वासू दासा."**

### भविष्यसूचक घोषणा

**आतामागे वळायचे नाही. मी येशू ख्रिस्ताचे अनुसरण करण्याचा मार्ग निश्चित केला आहे. मी इकडे तिकडे पाहणार नाही; माझी नजर प्रभूवर केंद्रित आहे.**

**पुढील अभ्यास**
प्रेषितांची कृत्ये ४:१२

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२६**
लूक २२:३१-४६; स्तोत्रसंहिता ११९:८९-१७६




# हाच मार्ग आहे; यावरून चाला

**योहान १०:२७ (MARVBSI)**
**माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात; मी त्यांना ओळखतो व ती माझ्यामागे येतात;**

जेव्हा येशू म्हणतो, "माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात," तेव्हा ते एक गहन सत्य प्रकट करते: अनेक आवाज बोलत आहेत, परंतु सर्वांचेच अनुसरण केले जाऊ नये. मेंढरे, स्वभावतःच, अनोळखी लोकांपेक्षा आपल्या मेंढपाळाचा आवाज ओळखतात आणि त्याला प्राधान्य देतात.

एदेनबागेत, हव्वेने देवाऐवजी सैतानाचे ऐकले, आणि त्याचा परिणाम विनाश झाला. आज, अशा युगात जिथे सोशल मीडिया, लोकांचा दबाव, दूरचित्रवाणी आणि संगीत हे संस्कृती आणि वर्तन घडवतात, तिथे प्रश्न उरतो: तुम्ही कोणाचा आवाज ऐकत आहात?

शत्रू अनेकदा स्वतःला प्रकाशाच्या देवदूताचा वेष धारण करतो. त्याचा आवाज खात्रीशीर, अगदी शास्त्रानुसार वाटू शकतो. येशूची परीक्षा पाहताना सैतानाने पवित्र शास्त्राचा संदर्भ दिला होता, तरीही येशूने फसवणूक ओळखली कारण तो स्वतः सत्य होता आणि आहे.

तुम्हीजे ऐकता ते तुमची दिशा ठरवेल, तुमच्या निर्णयांवर प्रभाव टाकेल आणि तुमचे नशीब ठरवेल.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, तुझ्या मार्गांवर चालण्यासाठी मला एक इच्छुक आणि आज्ञाधारक हृदय दे. येशूच्या नावाने तुझे वचन माझ्यामध्ये विपुलतेने वास करू दे. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी घोषित करतो की माझे कान देवाच्या वाणीशी दैवीरित्या तयार आहेत. माझ्या जीवनावरचा प्रत्येक परका आवाज शांत करण्यात आला आहे. मी अलौकिक विवेकात बुद्धीने चालतो. मी सत्याद्वारे मार्गदर्शित आहे, आणि माझी कधीही फसवणूक होणार नाही.**

**पुढील अभ्यास**
इब्री ५:१४

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२६**
यहेज्केल ४२-४४; १ पेत्र ४



GoodNews DAILY

# शेवटल्या काळातील पीक

**मत्तय९:३७ (MARVBSI)**
**तेव्हा तो आपल्या शिष्यांना म्हणाला, "पीक फार आहे खरे, पण कामकरी थोडे आहेत;**

प्रत्येकवेळी जेव्हा येशूने गरज पाहिली, तेव्हा त्याच्या मनात करुणा वाटली. ज्या गोष्टीने देवाचे हृदय हेलावले, त्याच गोष्टीने येशू ख्रिस्तालाही हेलावले. याच कारणामुळे त्याने शब्बाथ दिवशीही आजारी लोकांना बरे केले, गर्दीला शिकवले आणि भुकेल्यांना अन्न दिले.

या उताऱ्यात, मेंढपाळ नसलेल्या मेंढ्यांसारख्या थकून विखुरलेल्या गर्दीला पाहून येशू हेलावला. त्याने आपल्या शिष्यांना पिकाच्या मालकाला त्याच्या शेतात आणखी कामकरी पाठवण्यासाठी प्रार्थना करण्याची आज्ञा दिली.

अनेक ख्रिस्ती अजूनही आत्मे जिंकण्यासाठी योग्य वेळेची वाट पाहत आहेत, तरीही येशूने घोषित केले की पीक आधीच तयार आहे. या ऋतूत तातडीची आवश्यकता आहे. महामार्गांवर, कुंपणांवर आणि सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जा आणि देवाचे घर भरले जावे म्हणून त्यांना आत येण्यास भाग पाडा. कोणत्याही विलंबाशिवाय प्रत्येक प्राण्याला सुवार्तेचा प्रचार करा.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, आमच्या समोर असलेले पीक पाहण्यासाठी आमचे डोळे उघड. तुझ्या वचनाचा प्रचार करण्यासाठी आम्हाला धैर्याने भरून काढ आणि तुझ्या शेतात आणखी कामकरी पाठव, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी देवाच्या हातात एक युद्धकुऱ्हाड आहे, येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेसाठी शहरे, गावे आणि राष्ट्रे बदलण्यासाठी पाठवलेला आहे. हालेलुया!**

**पुढील अभ्यास**
लूक १४:२३

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२७**
यहेज्केल ४५-४६; १ पेत्र ५



# प्रार्थनेची स्थिती

**यहूदा१:९ (MARVBSI)**
**आद्य देवदूत मीखाएल ह्याने जेव्हा मोशेच्या शरीरासंबंधाने सैतानाला विरोध करून त्याच्याशी वाद घातला, तेव्हा त्याला दोषी ठरवून त्याची निंदा करण्यास तो धजला नाही; तर "प्रभू तुला धमकावो" एवढेच तो म्हणाला.**

जीवन तुम्हाला नेहमीच ते देत नाही जे तुम्हाला पात्र वाटते; तुम्ही ज्यासाठी संघर्ष (contend) करता त्याला ते शरण जाते. प्रगती आणि नशिबाला सतत विरोध होत असतो. जर शत्रू मोशेच्या शरीरावर दावा सांगत होता, तर तो देवाच्या जिवंत मुलाच्या उद्देशाला किती अधिक विरोध करेल?

कलस्सैकरास ४:१२ मध्ये, पौल एपाफ्रासची प्रार्थनेत "अतिशय श्रम" केल्याबद्दल प्रशंसा करतो. ग्रीक शब्द 'अॅगोनिझोमाई' (agonizomai) म्हणजे संघर्ष करणे, विवाद करणे, लढणे. प्रार्थना ही निष्क्रिय नाही; ही एक आध्यात्मिक सहभागिता आहे, सातत्य आणि दृढनिश्चयाने ठामपणे उभे राहणे आहे.

आरामात राहू नका. शत्रू गर्जना करणाऱ्या सिंहासारखा फिरत असतो, कोणाला गिळता येईल हे शोधत असतो. प्रार्थनेत उठा. तुमचे कुटुंब, आरोग्य, राष्ट्र आणि नशिबासाठी संघर्ष करा. प्रार्थनेच्या ठिकाणी विजय सुरक्षित केले जातात.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, जसा मी प्रार्थनेत संघर्ष करतो, तसा तू माझ्या वतीने उभा राहा. माझ्या नशिबाला विरोध करणाऱ्या प्रत्येक शक्तीला येशूच्या सामर्थ्यशाली नावाने फटकारले जावो. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी प्रार्थनेच्या ठिकाणी ठामपणे उभा राहतो. मला संघर्ष करण्यासाठी सामर्थ्य आणि विजयी होण्यासाठी कृपा प्राप्त होते. माझे जीवन, कुटुंब आणि नशिबाविरुद्धचा प्रत्येक विरोध उलटवला गेला आहे. मी विजयात चालतो, आणि माझा उद्देश पूर्ण होईल, येशूच्या नावाने. आमेन.**

**पुढील अभ्यास**
लूक १८:१; इफिसकरांस ६:१२; याकोब ५:१६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२८**
यहेज्केल ४७-४८; २ पेत्र १




# अविभक्त हृदय

**याकोब ४:८ (MARVBSI)**
**देवाजवळ या म्हणजे तो तुमच्याजवळ येईल. अहो पापी जनहो, हात निर्मळ करा; अहो द्विबुद्धीच्या लोकांनो, आपली अंतःकरणे शुद्ध करा.**

गेल्या महामारीच्या काळात, बरेच लोक आध्यात्मिकरित्या अधिक सक्रिय झाले. देवाच्या वचनात, प्रार्थना आणि उपवास वेळ वाढला, परंतु बऱ्याचदा प्रेरणा देवाच्या भीतीची नसून मृत्यूच्या भीतीची होती.

दाविदाने स्तोत्र ८६:११ मध्ये प्रार्थना केली, "माझे हृदय एकाग्र कर, यासाठी की मी तुझ्या नावाची भीती बाळगीन." ही देवाला पूर्ण अंतःकरणाने प्रेम आणि आदर देण्याची इच्छा होती. दाविदाला समजले होते की परिपूर्ण प्रेम भीती दूर करते, आणि तुमच्या हृदयात तुम्ही ज्याला सर्वात जास्त महत्त्व देता त्यावरच तुम्ही प्रेम करता.

पवित्र शास्त्र आपल्याला आठवण करून देते की आपल्याला भीतीचा आत्मा दिलेला नाही, आणि जेव्हा हृदय देवामध्ये नांगरलेले असते, तेव्हा भीतीची पकड सैल होते. देव आपल्यापासून कधीही दूर जात नाही; तो आपल्या प्रामाणिक 'होकार'ची वाट पाहतो. त्याच्या जवळ जा, आणि तुम्हाला दिसेल की तो नेहमीच जवळ होता. तुमची देवासोबतची चाल सातत्यपूर्ण असू द्या, हंगामी नाही तर खऱ्या प्रेमात रुजलेली असावी.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, माझे तुझ्यावरील प्रेम शुद्ध आणि अढळ असू दे. मला दररोज, सदासर्वकाळ तुझ्याशी सतत सहवासात मला स्थापित कर, आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझी इच्छा येशू ख्रिस्तावर केंद्रित आहे. मी माझ्या पूर्ण अंतःकरणाने, जिवाने, मनाने आणि शरीराने त्याच्यावर प्रेम करतो. वेळेवर आणि वेळेव्यतिरिक्त, मी त्याच्या अढळ प्रेमाबद्दल बोलेन. हालेलुया!**

**पुढील अभ्यास**
१ योहान ४:१८

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३२९**
दानीएल १-२; २ पेत्र २



GoodNews DAILY

# पदोन्नतीचे सामर्थ्य

**इफिसकरांस पत्र ३:८ (MARVBSI)**
**मी जो सर्व पवित्र जनांतील लहानाहून लहान त्या माझ्यावर ही कृपा अशी झाली की, मी ख्रिस्ताच्या अगाध समृद्धीची सुवार्ता परराष्ट्रीयांना सांगावी;**

पवित्र शास्त्र हे स्पष्ट करते की पदोन्नती देवाकडून येते. तोच एकाला उंचावतो आणि दुसऱ्याला खाली आणतो. हे प्रकट करते की देव हा अंतिम पात्र करणारा (qualifier) आहे, आणि त्याची कृपा ही प्रत्येक खऱ्या उन्नतीच्या मागील शक्ती आहे.

प्रेषित पौलाने स्वतःला सर्व संतांमध्ये सर्वात कनिष्ट मानले, तरीही कृपेने त्याला वेगळे केले. सेवकाईतील त्याचा प्रभाव नैसर्गिक पात्रतेच्या पलीकडे दैवी सशक्तीकरण दर्शवतो.

देवासाठी, तुमची पार्श्वभूमी, तुमचा जन्म कुठे झाला किंवा कोणाच्या पोटी झाला हे तुमचे भविष्य ठरवत नाही. जे महत्त्वाचे आहे ती तुमच्या जीवनावरील त्याची कृपा आहे. आज, हे ओळखा की ही कृपा तुमच्या पदोन्नतीचे सामर्थ्य आहे. नम्र आणि कष्टाळू राहा, कारण जे देवावर अवलंबून असतात त्यांना देव उंचावतो.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, तू माणसांना उन्नत करणारा आहेस. तुझी कृपा मला शोधू दे आणि तू ठरवून दिलेल्या प्रत्येक पातळीसाठी मला पात्र करू दे. तू मला दैवी पदोन्नतीसाठी स्थित करत असताना मला नम्रता आणि परिश्रमाने चालण्यास सामर्थ्य दे, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी ईश्वरीकृपेने मिळाली आहे आणि मी दैवीरित्या पात्र आहे. माझे वातावरण माझ्या उन्नतीसाठी संरेखित होत आहे. मी गौरवाकडून गौरवाकडे जातो, आणि माझे जीवन सतत पदोन्नती प्रतिबिंबित करते, येशूच्या सामर्थ्यशाली नावाने.**

**पुढील अभ्यास**
स्तोत्र ९२:१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३०**
दानीएल ३-४; २ पेत्र ३



# तुमच्या दिवसांची मोजणी करा

**लूक१०:४२ (MARVBSI)**
**परंतु थोडक्याच गोष्टींचे, किंबहुना एकाच गोष्टीचे अगत्य आहे; मरीयेने चांगला वाटा निवडून घेतला आहे, तो तिच्यापासून काढून घेतला जाणार नाही.**

आजच्या आपल्या सुरुवातीच्या शास्त्रवचनात, मार्थाचे प्राधान्य येशूची सेवा करणे हे होते, तरीही तिची बहीण मरीयेचे प्राधान्य प्रभू येशू ख्रिस्ताच्या चरणांशी बसून वचनाचे पोषण करणे हे होते.

मार्थाने आपला वेळ ऐहिक गोष्टींमध्ये गुंतवला, तर मरीयेने अनंतकाळचे मूल्य असलेल्या आध्यात्मिक गोष्टींमध्ये गुंतवणूक केली. हा आपल्यासाठी एक शक्तिशाली धडा आहे: आपण आपल्या दिवसांची मोजणी करायला शिकले पाहिजे. मोजणी (number) हा एक हिशोबाचा शब्द आहे, ज्याचा अर्थ हेतूपुरस्सर नियोजन आणि वेळापत्रकाद्वारे आपल्या वेळेचा योग्य हिशोब ठेवणे आणि व्यवस्थापन करणे असा होतो.

येशू मार्थाला हेच तत्त्व शिकवत होता. वेळ हे एक महत्त्वाचे संसाधन आहे ज्याचे मूल्य असले पाहिजे आणि ज्याचा शहाणपणाने वापर केला पाहिजे. जसे तुम्ही वचनात वेळ घालवता आणि पवित्र आत्म्याशी संवाद साधता, तसे तो तुम्हाला मार्ग दाखवेल, काय करावे, ते कसे करावे आणि ते करण्याची योग्य वेळ कोणती हे प्रकट करेल.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मला माझे दिवस मोजायला शिकीव, म्हणजे मी माझे मन हृदय शहाणपणाकडे लावू शकेन. माझ्या वेळेचे नियोजन तुझ्या इच्छेनुसार कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझे दिवस परमेश्वराने नियोजित आहेत. मी तात्पुरत्या गोष्टींपेक्षा अनंतकाळच्या गोष्टींना प्राधान्य देतो. माझा वेळ फलदायी आहे, माझ्या पावलांना मार्गदर्शन लाभले आहे आणि मी देवाच्या परिपूर्ण इच्छेनुसार चालतो.**

**पुढील अभ्यास**
स्तोत्र ९०:१२

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३१**
दानीएल ५-७; १ योहान १




# झोपू नका!!!

**मत्तय१३:२५ (MARVBSI)**
**लोक झोपेत असताना त्याचा वैरी येऊन गव्हामध्ये निदण पेरून गेला.**

शत्रू वाईट बिया पेरण्यासाठी रात्रीच्या वेळेचा फायदा घेतो. रात्रीची वेळ अज्ञानाचा किंवा आध्यात्मिक अनभिज्ञतेचा ऋतू दर्शवते, जिथे शत्रू देवाच्या मुलांच्या जीवनात अडथळे आणण्याचा प्रयत्न करतो.

देवाचे लेकरे म्हणून, आपण जगाचा प्रकाश आहोत, इतरांसमोर चमकण्यासाठी बोलावलेले आहोत. आपल्याला अंधाराच्या राज्याकडून प्रकाशाच्या राज्यात आणले गेले आहे. मग प्रकाशाचा अंधाराशी काय संबंध?

पवित्र शास्त्र योहान १:५ मध्ये म्हणते, 'तो प्रकाश अंधारात प्रकाशतो; तरी अंधाराने त्याला ग्रासले नाही. तरीही काही ख्रिस्ती रात्रीच्या स्वप्नातून आणि दृष्टांतांतूनही पराभवाचा अनुभव घेतात. अशा क्षणी, आजारपण, गरिबी, अपघात आणि पदावनती पेरली जाऊ शकते. परंतु हे आपले वास्तव असू नये. आजच उठा. प्रार्थना, उपवास आणि वचनात मग्न व्हा. बळी म्हणून जगण्यास नकार द्या. तुम्ही विजेत्यापेक्षाही महान आहात; त्या सत्यात दररोज चाला.

### आजची प्रार्थना

**हे माझ्या पित्या, ख्रिस्तामधील माझी खरी ओळख प्रकट करण्यास आणि प्रत्येक परिस्थितीवर तुझ्या वचनाच्या प्रकाशात चालण्यास मला मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी बळी होण्यास नकार देतो. मी प्रभुत्वात गाजवतो, आणि अंधार माझ्यावर मात करू शकत नाही. हालेलुया!**

**पुढील अभ्यास**
नीतिसूत्रे ४:१८

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३२**
लूक २२:४७-७१; स्तोत्रसंहिता १२०-१२२



# तारणाच्या विहिरी

**यशया १२:३ (MARVBSI)**
**तेव्हा तुम्ही तारणकूपातून उल्लासाने पाणी काढाल.**

येशू ख्रिस्ताच्या मृत्यूने आणि पुनरुत्थानाने जगासाठी, विशेषतः त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी एक संपूर्ण तारण पॅकेज आणले. आमचे आजचे शास्त्र तारणाच्या विहिरींबद्दल बहुवचनात बोलते, एकाच विहिरीबद्दल नाही. तरीही अनेक ख्रिस्ती लोकांनी ख्रिस्तामध्ये नवीन जीवन देणाऱ्या एकाच विहिरीतून पाणी काढण्यापुरते स्वतःला मर्यादित ठेवले आहे.

तुमच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला तारणाच्या विहिरींचा स्पर्श होतो. तारणामध्ये समृद्धी, आरोग्य, आनंद आणि इतर प्रत्येक गरजेसाठी विहिरी आहेत, परंतु त्यातून काढणे हे तुमच्यावर अवलंबून आहे.

आपण विपुलतेत जगावे ही देवाची इच्छा आहे. देवाचे मूल म्हणून, आपले जीवन नैसर्गिक गोष्टींच्या पलीकडे जाणारे आहे जेव्हा आपण तारणाच्या विहिरींतून काढतो. तुमच्यासाठी साठवून ठेवलेल्या देवाच्या विपुल विहिरींतून काढण्यासाठी तुमचा विश्वास वापरा.

### आजची प्रार्थना

**हे माझ्यापित्या, तारणाच्या कार्य पूर्ण झालेल्या बद्दल मी तुझे आभारी मानतो. येशूच्या नावाने उपलब्ध असलेल्या तारणाच्या प्रत्येक झऱ्यातून दररोज काढण्यास मला मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी तारणाच्या झऱ्यातून पाणी काढत असताना, मी भरभराट करण्याच्या कृपेची घोषणा करतो. कोरडेपणाचा प्रत्येक ऋतू दूर झाला आहे, आणि मी योग्य वेळेवर आणि अयोग्य वेळीही फलदायी आहे. आमेन.**

**पुढील अभ्यास**
२ पेत्र १:३

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३३**
दानीएल ८-१०; १ योहान २



GoodNews DAILY

# पृथ्वीला आज्ञाद्या

**यशया१:२ (MARVBSI)**
**हे आकाशा, ऐक; अगे पृथ्वी, कान दे, कारण परमेश्वर बोलत आहे : "मी मुलांचे पालनपोषण केले, त्यांना लहानाचे मोठे केले तरी ती माझ्याशी फितूर झाली.**

या वर्षी एक अंत्यविधी होईल, पण तो माझा नसेल. येशूच्या नावाने हे प्रकटीकरण तुमच्यासाठी खरे आहे. देवाचे लेकरे म्हणून, आपल्याकडे पृथ्वीला आज्ञा देण्याचा अधिकार आहे. मोशेने आपल्या काळात पृथ्वीला उघडून त्याच्या शत्रूंना: कोरह आणि त्याच्याशी जोडलेल्या सर्व लोकांना गिळण्याची आज्ञा दिली.

पवित्र शास्त्र स्वर्ग आणि पृथ्वीबद्दल एक रेकॉर्डिंग डिव्हाइस म्हणून बोलते ज्याला देव आणि मोशे यांनी ज्या प्रकारे सूचना दिल्या त्याच पद्धतीने बोलले आणि सूचना दिल्या जाऊ शकतात. म्हणूनच जादूटोणा करणारे लोक एखाद्याने चाललेली माती गोळा करू शकतात आणि एखाद्याच्या जीवनाविरूद्ध सूचना देण्यासाठी त्याचा वापर करू शकतात.

हे वर्ष संपत असताना, आपण पृथ्वीला सूचना देतो की ती आपल्याला गिळण्यासाठी खूप भरलेली आणि समाधानी आहे. आपण दीर्घायुष्याने समाधानी होऊ, आणि अकाली मृत्यूची प्रत्येक योजना आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या जीवनासंबंधी रद्द केली गेली आहे.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी प्रार्थना करतो की माझे आणि माझ्या कुटुंबाचे जीवन सुरक्षित राहो. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**हे स्वर्ग आणि पृथ्वी, माझे ऐका: प्रत्येक शत्रूला गिळून टाका आणि माझ्या नशिबाविरूद्ध गाडलेल्या प्रत्येक आशीर्वादाला ओकून टाका, येशूच्या नावाने.**

**पुढील अभ्यास**
अनुवाद ३०:१९

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३४**
दानीएल ११-१२; १ योहान ३



# अल्फा आणि ओमेगा

**प्रकटीकरण १:८ (MARVBSI)**
**प्रभू देव जो आहे,' जो होता व जो येणार, 'जो सर्वसमर्थ,' तो म्हणतो, "मी अल्फा व ओमेगा आहे.**

जेव्हा बायबल देवाचे वर्णन अल्फा आणि ओमेगा म्हणून करते, तेव्हा बहुतेकांना वाटते की याचा अर्थ तो सुरुवात आणि शेवट आहे, परंतु ते त्याहूनही अधिक आहे. यहुदी उजवीकडून डावीकडे लिहीत असत, याचा अर्थ तो प्रत्यक्षात ओमेगा आणि अल्फा आहे. तो सुरुवात करण्यापूर्वी शेवटापासून सुरू करतो. म्हणूनच बायबल म्हणते की पृथ्वीच्या स्थापनेपूर्वी येशूला वधस्तंभावर खिळले गेले होते. माणसाने पाप करण्यापूर्वी, तो आधीच त्यांचे बलिदान होता.

तुमचे जीवन हे एक पूर्ण झालेले पॅकेज आहे. देवाने तुम्हाला निर्माण करण्यापूर्वी, त्याने तुमच्या जीवनाशी संबंधित प्रत्येक आध्यात्मिक आणि भौतिक आशीर्वाद पूर्ण केला. येशूच्या नावाने तुम्हाला कोणत्याही चांगल्या गोष्टीची कमतरता भासणार नाही.

### आजची प्रार्थना

**सर्वशक्तिमान प्रभू, अल्फा आणि ओमेगा, मी तुझे आभार मानतो. माझे जीवन तुझ्यामध्ये आधीच ज्ञात आणि स्थापित आहे. मी सुरुवात करण्यापूर्वीच, तू माझ्याशी संबंधित सर्वकाही पूर्ण केले आहेस. मी आज आत्मविश्वासाने चालतो की मी ख्रिस्त येशूमध्ये प्रत्येक आध्यात्मिक आणि भौतिक आशीर्वादाने धन्य झालो आहे. मला कोणत्याही चांगल्या गोष्टीची कमतरता भासणार नाही; मी शांती, उद्देश आणि तुझ्या योजनेच्या खात्रीने या दिवसात पाऊल टाकतो. येशूच्या नावाने, आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**या जीवनात मला कोणत्याही चांगल्या गोष्टीची कमतरता भासणार नाही. मी एक जिवंत, चालती-फिरती साक्ष आहे. माझ्या सर्व इच्छा येशूच्या नावाने पूर्ण होत आहेत.**

**पुढील अभ्यास**
१ पेत्र १:१९-२०

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३५**
होशेय १-४; १ योहान ४



# ओळख

**२ करिंथ ५:१७ (MARVBSI)**
**म्हणून जरकोणीख्रिस्तामध्ये आहे, तर तो नवीन सृष्टी आहे: जुन्या गोष्टी निघून गेल्या आहेत; पाहा, सर्व गोष्टी नवीन झाल्या आहेत.**

जेव्हा मी गाडी चालवत असतांना, मला कधीकधी महामार्गावर वाहतूक नियंत्रित करणारे आणि आदेश देणारे अगदी तरुण आणि लहान शरीरयष्टीचे पोलीस अधिकारी दिसतात. लहान असूनही, मोठ्या मालवाहू ट्रक्स चालवणाऱ्या प्रौढ माणसांना थांबवण्यास कोणती गोष्ट त्यांना सक्षम करते? ती त्यांची ओळख (identity) आहे. त्यांना अशा सरकारचा पाठिंबा आहे जे त्यांच्या शारीरिक उंचीपेक्षा अधिक सामर्थ्यवान आणि मोठे आहे. जर तुम्ही त्यांना त्रास दिलात, तर ते राज्याविरुद्धचे उल्लंघन मानले जाते.

तुम्ही देवाचे लेकरू आहात, देवापासून जन्मलेले आहात. तुमची ओळख आणि अधिकार तुमच्या शारीरिक देखाव्यापलीकडे आहेत. तुमच्या दिवसाला आणि महिन्याला आज्ञा द्या; ते तुम्हाला अपेक्षित परिणाम देतील. तुमच्या सभोवतालच्या परिस्थितीशी बोला आणि येशूच्या नावाने परिणाम प्राप्त होतील.

### आजची प्रार्थना

**प्रभू, मला तुझे लेकरू बनवल्याबद्दल आणि ख्रिस्तामध्ये मला एक नवीन ओळख दिल्याबद्दल तेझे आभार. मला तुझ्या अधिकाराचा आणि सामर्थ्याचा पाठिंबा आहे हे जाणून मी आज चालत आहे. मी माझा दिवस, माझा महिना आणि माझ्या वातावरणावर जीवन, कृपा आणि विजयाची घोषणा करतो. प्रत्येक परिस्थिती माझ्याविषयीच्या तुझ्या इच्छेशी संरेखित आहे. मी घाबरणार नाही, मी डळमळणार नाही, कारण मी तुझा आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी देवाचे लेकरू आहे, आत्म्यापासून जन्मलेला आहे. उत्तम आरोग्य आणि समृद्धी हा माझ्या वाट्याला येत आहे. येशूच्या नावाने माझ्याकडे सर्व बाजूंनी संधी येत आहेत.**

**पुढील अभ्यास**
योहान १:१२

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३६**
होशेय ५-६; १ योहान ५



# पराजित शत्रू

**यशया १४:१६ (MARVBSI)**
**जे तुला पाहतील ते तुला निरखून मनात म्हणतील की, 'ज्याने पृथ्वी थरथर कापवली व राज्ये डळमळवली तो हाच का पुरुष?**

अनेक लोकांचा, ज्यात काही ख्रिश्चनांचाही समावेश आहे, असा विश्वास आहे की सैतान ही शिंगे असलेली एक प्रचंड आकृती आहे, परंतु ते शास्त्रानुसार नाही. ती तुमच्या बालवाडीच्या पुस्तकांमध्ये चित्र काढणाऱ्यांनी रंगवलेली एक प्रतिमा आहे. यशयाच्या म्हणण्यानुसार, आपण त्याच्याकडे बारकाईने पाहू. याचा अर्थ तो इतका लहान असेल की तुम्हाला डोळे बारीक करून पाहावे लागेल. राष्ट्रांमध्ये गोंधळ निर्माण करण्याची ताकद त्याला कुठून मिळाली याचे तुम्हाला आश्चर्य वाटेल.

सैतान मोठा नाही; तो तुमच्यासाठी खूप लहान आहे. त्याच्या क्षमतेला वाढवून सांगू नका; तो तुमच्या पायाखाली राहण्यास योग्य आहे. त्यामुळे मोठी प्रगती करत राहा. शत्रू तुम्हाला येशूच्या नावाने थांबवू शकत नाही.

### आजची प्रार्थना

**प्रभू, ख्रिस्त येशूमध्ये मला मिळालेल्या विजयाबद्दल तुझे आभार. तुझे वचन घोषित करते की वधस्तंभाद्वारे सर्व सत्ता आणि अधिकार पराभूत झाले आहेत, आणि मी त्या विजयात उभा आहे. मी भीती आणि माझ्या जीवनातील तुझ्या सामर्थ्यापेक्षा शत्रूला श्रेष्ठ मानणाऱ्या प्रत्येक खोट्या गोष्टीला नकार देतो. मी अधिकारात चालतो, हे जाणून की जो जगात आहे त्यापेक्षा माझ्यामध्ये असलेला महान आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**शत्रू माझ्या पायाखाली आहे, आणि गोष्टींवर माझे नाव आहे तो ती थांबवू शकणार नाही. मी एक यशस्वी व्यक्ती आहे, कारण जगात जो आहे त्यापेक्षा माझ्यामध्ये जो आहे तो महानआहे.**

**पुढील अभ्यास**
कलस्सैकर २:१५

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३७**
होशेय ७-८; २ योहान १



GoodNews DAILY

# अधिकार लागू करा

**लूक १०:१९ (MARVBSI)**
**पाहा, मी तुम्हांला साप आणि विंचू ह्यांना तुडवण्याचा व शत्रूच्या सर्व शक्तीवरचा अधिकार दिला आहे, तुम्हांला काहीएक बाधणार नाही. '**

येशू म्हणाला की स्वर्गातील आणि पृथ्वीवरील सर्व अधिकार त्याला देण्यात आले आहेत. त्यानंतर तो म्हणाला, "पाहा, मी तुम्हाला अधिकार दिला आहे..." ख्रिस्ताकडे असलेला सर्व अधिकार मला आणि तुम्हाला देण्यात आला आहे: भरभराट करण्याचा, यशस्वी होण्याचा आणि चमत्कार करण्याचा अधिकार. तुम्ही तुमच्या आत अजेय सामर्थ्य घेऊन चालत आहात; फक्त तुमच्या जीवनातील प्रत्येक समस्येवर तुमचा अधिकार लागू करा.

आजचा दिवस एक नवीन दिवस आहे. देव तुम्हाला सर्व अधिकार देतो या वास्तवाला जागे व्हा. परिस्थितींवर तुमची शक्ती आणि अधिकार वापरा आणि तुम्ही नक्कीच एक साक्ष घेऊन परत याल.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी परिस्थितीचा बळी म्हणून जगण्यास नकार देतो. मी शत्रूच्या प्रत्येक कामाला तुडवतो आणि घोषणा करतो की मला कशाचीही इजा होणार नाही. ज्या परिस्थितीने माझ्या प्रगतीला विरोध केला आहे, मी आत्ताच त्यावर सुव्यवस्था, यश आणि दैवी संरेखनाची घोषणा करतो. मी भरभराट करण्याची, यशस्वी होण्याची आणि चमत्कारांमध्ये चालण्याची शक्ती सक्रिय करतो. मी माझे आरोग्य, आर्थिक स्थिती, कुटुंब आणि भविष्यावर अधिकार गाजवतो. प्रत्येक लपलेला विरोध ख्रिस्ताच्या प्रभुत्वाला शरण जावो.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी धैर्याने उभा राहतो. मी विजयाने चालतो, पराभवाने नाही. मी घोषित करतो की सर्व गोष्टींवर मात करण्यासाठी आणि विजयी होण्यासाठी देवाकडून सामर्थ्य मिळाले आहे.**

**पुढील अभ्यास**
मत्तय २८:१८

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३८**
होशेय ९-१०; ३ योहान १




GoodNews DAILY

# चालती-फिरती साक्ष

**२ करिंथ ३:२ (MARVBSI)**
**तुम्हीच आमचे पत्र, आमच्या अंत:करणांवर लिहिलेले, सर्व माणसांना कळलेले आणि त्यांनी वाचलेले असे आहात;**

मी अनेकदा म्हणतो, "सुवार्तेचा प्रचार करा, आणि केवळ आवश्यक असेल तेव्हाच शब्दांचा वापर करा." काहींना आश्चर्य वाटेल की शब्दांशिवाय आपण दुसरे काय वापरू शकतो? बायबल म्हणते की तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताचे लिहिलेले पत्र आहात, याचा अर्थ तुमचे जीवन ही एक साक्ष (sermon) आहे. लोकांनी तुमची जीवनशैली पाहून आपले जीवन ख्रिस्ताला दिले पाहिजे. तुमच्या जीवनाने देवाची पूर्णता प्रदर्शित केली पाहिजे. त्याचा चांगुलपणा आणि सौंदर्य तुमच्याद्वारे प्रदर्शित झाले पाहिजे.

जसे तुम्ही ही भक्तीपूर्ण वाचत करत असतांना, तुम्ही देवाच्या स्वरूपाचे रुपांतरीत होत आहे. देव अस्तित्वात आहे हे दाखवून देण्याचे हे तुमचे वर्ष आहे. तुमच्या जीवनशैलीद्वारे, अनेक जण आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या ज्ञानाकडे येतील.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मला आतूनबदल, जेणेकरूनमाझे चारित्र्य ख्रिस्ताची स्पष्ट साक्ष बनेल. जिथे कमकुवतपणा आहे, तिथे मला सामर्थ्य दे; जिथे विसंगती आहे, तिथे मला तुझ्या आत्म्याशी संरेखित कर. माझे जीवन केवळ बोलू नये, तर प्रामाणिकपणा, दयाळूपणा आणि पावित्र्याद्वारे सुवार्तेचा प्रचार करो.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी एक लिखित आणि चालते-फिरते पत्र आहे. माझ्याद्वारे अनेक जण ख्रिस्ताच्या ज्ञानाकडे येतील. खरोखरच माझ्या आयुष्याच्या सर्व दिवस चांगुलपणा आणि कृपा माझ्या पाठीशी राहतील.**

**पुढील अभ्यास**
मत्तय ५:१६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३३९**
लूक २३:१-२५; स्तोत्रसंहिता १२३-१२५



# तुला कोणी सांगितले

**उत्पत्ती ३:११ (MARVBSI)**
**देवाने म्हटले, "तू नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ तू खाऊ नकोस अशी मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस काय?**

जेव्हा आदाम आणि हव्वेने पाप केले, तेव्हा बायबल म्हणते की ते "उघडे" असल्यामुळे लपले. जेव्हा देव आला, तेव्हा त्याचा प्रश्न सोपा होता: "तू उघडा आहेस असे तुला कोणी सांगितले?" ते उघडे होते या वस्तुस्थितीवर तो वाद घालत नव्हता. तो या गोष्टीबद्दल चिंतेत होता की त्यांना ते उघडे आहेत असे कोणी सांगितले. ते सुरुवाती पासूनच उघडे होते, परंतु सैतानाने त्यांना त्या वास्तवाची जाणीव करून दिली.

कोणतीही व्यक्ती जी तुम्हाला तुमचे पाप किंवा अपयश आठवण करून देते ती सैतानाच्या कार्यालयातून कार्य करते. तुम्ही पाप केले आहे आणि तुम्हाला क्षमा केली गेली नाही असे तुम्हाला कोणी सांगितले? तुम्ही यशस्वी होऊ शकत नाही असे तुम्हाला कोणी सांगितले? तुम्हाला ख्रिस्तासोबत वधस्तंभावर खिळले गेले होते आणि त्याच्यासोबत तुम्ही मेलेल्यांतून उठला आहात. कोणतेही पाप किंवा कमकुवतपणा तुमच्या जीवनाशी जोडलेला नाही. येशूच्या नावाने शापित नाही तर तुम्ही खूप आशीर्वादित आहात.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, वधस्तंभावरील पूर्ण झालेल्या कार्याबद्दल आणि ख्रिस्त येशूमध्ये मला मिळालेल्या विजयाबद्दल तुझे आभार. माझ्या जीवनात निंदा, भीती, लाज आणि मर्यादा आणणाऱ्या प्रत्येक आवाजाला मी नाकारतो.**

### भविष्यसूचक घोषणा

**येशूच्या नावात मी शापित नाही तर मी खूप आशीर्वादित आहे. प्रभूची कृपा हा माझा कायमचा पत्ता आहे, आणि येशूच्या नावाने माझ्या सर्व रेषा सुखद ठिकाणी पडल्या आहेत.**

**पुढील अभ्यास**
रोमकरांस ८:१

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४०**
होशेय ११-१२; यहूदा १



# जिंकण्यासाठी तैनात

**स्तोत्र ८२:६ (MARVBSI)**
**मी म्हणालो, "तुम्ही देव आहात, तुम्ही सर्व परात्पराचे पुत्र आहात.**

राजा चार्ल्सची आई मरेपर्यंत तो राजा होऊ शकला नाही. राजपुत्र केवळ राजा किंवा राणीच्या मृत्यूनंतरच सिंहासनावर बसू शकतो. ते जिवंत असताना, वारसदार असला तरी तो कशावरही नियंत्रण ठेवत नाही. म्हणूनच वेल्ससारखी ठिकाणे अस्तित्वात आहेत, जिथे राजपुत्र नियंत्रण वापरू शकतात कारण तो प्रदेश राजा किंवा राणीच्या थेट शासनाबाहेर असतो.

देवाला माहित आहे की आपल्या शास्त्रानुसार आपण देखील "देव" आहोत, आणि ज्याप्रमाणे राजा जिथे राहतो तिथे राजपुत्र पूर्णपणे राज्य करू शकत नाही, त्याचप्रमाणे आपण सर्वजण स्वर्गात नियंत्रण ठेवू शकत नाही. म्हणूनच, जिंकण्यासाठी आणि प्रभुत्व मिळवण्यासाठी आपल्याला पृथ्वीवर तैनात (deployed) करण्यात आले. देवाने तुम्हाला समाज, सरकार आणि कुटुंबांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी पाठवले आहे. जग तुमची वाट पाहत आहे; बाहेर जा आणि जिंका!

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, पृथ्वीवरीलमाझे कार्य समजून घेण्यासाठी माझे डोळे उघड. माझा प्रभाव कमी करणारी प्रत्येक मर्यादा, भीती आणि गोंधळ दूर कर. मी सामान्य नाही; मी तुझ्याद्वारे बदल घडवून आणण्यासाठी, व्यवस्थांवर प्रभाव पाडण्यासाठी आणि तुझे राज्य प्रकट करण्यासाठी पाठवला गेलो आहे. माझ्यासमोर असलेल्या प्रत्येक आव्हानावर मात करण्यासाठी मला सामर्थ्य दे. माझे जीवन माझे कुटुंब, समाज आणि पिढीमध्ये परिवर्तन घडवून आणो. आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी जगावर प्रभुत्व मिळवण्यासाठी निर्माण झालो आहे. माझ्या कुटुंबात, माझ्या समाजात आणि माझ्या पिढीमध्ये गोष्टी बदलण्याचा दैवी अधिकार माझ्याकडे आहे. मी आज देवाकडून जिंकण्यासाठी तैनात केलेला म्हणून बाहेर जात आहे.**

**पुढील अभ्यास**
उत्पत्ती १:२८

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४१**
होशेय १३-१४; प्रकटीकरण १




# उत्तम अहवाल

**यशया ५३:१ (MARVBSI)**
**आम्ही ऐकलेल्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला आहे? परमेश्वराचा भुज कोणास प्रकट झाला आहे?**

जग सर्व प्रकारच्या बातम्या आणि माहितीने भरलेले आहे. मी बऱ्याचदा म्हणतो की आजच्या काळात, जर तुम्ही बातम्या पाहिल्या नाहीत, तर तुम्ही अनभिज्ञ राहाल, आणि जर तुम्ही बातम्या पाहिल्या तर तुमची दिशाभूल होईल. नेटवर्क्स आता पूर्वग्रह, प्रचार आणि विकृतीने भरलेले आहेत.

भविष्यवक्त्याचा आक्रोश सोपा होता: "आमच्या अहवालावर कोण विश्वास ठेवेल?" देव आत्ता तुमच्याशी बोलत आहे, आणि तुम्हाला सांगत आहे की समृद्धी आणि शांती तुमच्या वाटेवर आहे. इतर अहवाल आहेत की नाही हा प्रश्न नाही; प्रश्न हा आहे की तुम्ही कोणावर विश्वास ठेवाल. इतर प्रत्येक आवाजा पेक्षा देवाचे वचन निवडा. तो जे सांगत आहे त्यावर विश्वास ठेवा, त्यावर कृती करा आणि तुम्ही नक्कीच एक साक्ष घेऊन परत याल.

### आजची प्रार्थना

**प्रभू, मी तुझ्या मुखातून निघालेल्या प्रत्येक वचनावर विश्वास ठेवतो. तू जे सांगतोस त्याची इच्छा आणि कृती दोन्ही करण्यास मला मदत कर. येशूच्या नावाने मी सर्व प्रकारच्या शंका आणि चिंतेवर मात करतो.**

### भविष्यसूचक घोषणा

**परमेश्वराचे वचन हे माझे मार्गदर्शक आणि दिशादर्शक आहे. मी माझ्या जीवनातील कोणतेही लक्ष्य चुकणार नाही. माझा भाग येशूच्या नावाने सुरक्षित आणि स्थापित आहे.**

**पुढील अभ्यास**
रोमकरांस १०:१६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४२**
योएल १-३; प्रकटीकरण २



# मनाची लढाई

**२ करिंथ १०:५ (MARVBSI)**
**तर्कवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले असे सर्वकाही पाडून टाकून आम्ही प्रत्येक कल्पना अंकित करून तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास लावतो;**

आपले मन केवळ जीवनातील खाचखळगे घासणारा मांसाचा स्नायू नाही; ते त्याहूनही पलीकडे जाते. पवित्र शास्त्र म्हणते की जसा माणूस विचार करतो, तसाच तो असतो. याचा अर्थ तुम्ही जे विचार करता त्याचेच तुम्ही एक उत्पादन आहात.

आजचे आपले शास्त्र दाखवते की आपले मन ही एक रणांगण आहे. असे काही विचार येतात जे ईश्वरीय नसतात. म्हणूनच आपल्याला प्रत्येक गोष्ट वचनाच्या अधीन ठेवावी लागते. जेव्हा तुम्ही मृत्यू, तुमची लाज, किंवा पदावनतीचा विचार करता, तेव्हा तुमच्या मनात सकारात्मक शब्द बोला आणि कोणतीही नकारात्मकता पुसून टाका. समृद्धी तुमची आहे, आणि देव तुम्हाला अमर्याद आशीर्वाद देत आहे.

### आजची प्रार्थना

**पित्या, तुझ्या वचनाद्वारे, मी सैतानाच्या सर्व युक्त्यांवर मात करतो. माझे मन आणि माझे शरीर वचनाच्या अधीन आहेत, आणि तुझे वचन हे रॅप्चरपर्यंत माझा दर्जा राहील.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी घोषित करतो आणि जाहीर करतोकी देवाचे वचन हा माझा दर्जा आणि भक्कम पाया आहे. येशूच्या नावाने या जीवनात मला कशामुळेही डळमळीत करता येणार नाही.**

**पुढील अभ्यास**
लूक १२:२२-२६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४३**
आमोस १-३; प्रकटीकरण ३




# राजनैतिक संरक्षण

**२ करिंथ ५:२० (MARVBSI)**
**म्हणून देव आमच्याकडून विनवत असल्यासारखे आम्ही ख्रिस्ताच्या वतीने वकिली करतो; देवाबरोबर समेट केलेले असे तुम्ही व्हा, अशी आम्ही ख्रिस्ताच्या वतीने विनंती करतो.**

या पिढीतील एकअष्टपैलू नेता बनण्याचा देवाचा आशीर्वाद मला लाभला आहे. ख्रिस्ती जगात उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर, मला माझ्या देशाचा राजदूत होण्याचा बहुमानही मिळाला आहे. यातून मला समजले आहे की, काही प्रमाणात, शासन आणि राजनैतिक संरक्षण (diplomatic immunity) कसे कार्य करते.

उदाहरणार्थ, जरतुम्ही तुमच्या देशात गुन्हा केला आणि दुसऱ्या देशाच्या दूतावासात (embassy) पळून गेलात, तर पोलीस तुम्हाला पकडू शकत नाहीत कारण, राजनैतिक संरक्षणाच्या नियमांनुसार, तुम्ही आता तुमच्या देशात नाही—तुम्ही दूतावासाने प्रतिनिधित्व केलेल्या देशात आहात.

जेव्हा देव म्हणाला की तुम्ही राजदूत आहात, तेव्हा याचा अर्थ असा की तुम्ही दुसऱ्या देशाच्या आत एका वेगळ्या देशाचे (किंवा राज्याचे) प्रतिनिधित्व करता. सैतान आणि संकटे तुम्हाला स्पर्श करू शकत नाहीत कारण तुम्ही वेगळ्या प्रदेशात आहात. येशूच्या नावाने तुमच्याकडे राजनैतिक संरक्षण आहे.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, माझा दैवी हक्क आणि अधिकार वापरण्यास मदत कर. माझ्या जीवाला धोका देणाऱ्या सर्वशत्रूंना, मी येशूच्या नावाने त्यांची पकड ढिली करत आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**स्वर्गाचा राजदूत म्हणून, मी घोषित करतो की माझ्या जीवनात कोणताही दुष्काळ पडणार नाही. माझ्या जीवनाशी संबंधित प्रत्येक गोष्ट आता येशूच्या नावाने पूर्ण होत आहे.**

**पुढील अभ्यास**
१ पेत्र २:९

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४४**
आमोस ४-६; प्रकटीकरण ४




# उच्च पद

**स्तोत्रसंहिता ८:५ (MARVBSI)**
**तू त्याला देवापेक्षा किंचित कमी असे केले आहेस; त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस.**

अनेक ख्रिस्ती आणि सामान्य लोकांचा वरील शास्त्रावचनाचा एकसामान्य अर्थ आहे. याचा खरा अर्थ धर्मद्रोही(heresy) वाटू शकतो, पण ते खरे सत्य आहे. तेथील "देवदूत" हा शब्द केवळ संदेशवाहक या अर्थाने वापरलेला नाही—नाही. हिब्रूमध्ये तो शब्द "एलोहिम" (Elohim) आहे, ज्याचा अर्थ देव स्वतः असा होतो, देवदूत नाही, ज्याचा अर्थ संदेशवाहक असा होतो.

या दैवी श्रेणीरचानेत, (hierarchy), आपल्याला स्वतः देवापेक्षा थोडे कमी बनवण्यात आले आहे, आणि देवदूत आपल्या मागे येतात. तुम्ही तुमच्या कल्पनेपेक्षाही मोठे आहात. जा आणि विजय मिळवा.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मी प्रार्थना करतो की त्याच कृपेने आणि समजुतीने, मी प्रत्येक गोष्ट माझ्या कल्याणासाठी घडून आणू शकेन. आज मी जगात असताना, माझ्या जीवनातील प्रत्येक पाऊलाला देवाचा आत्मा मार्गदर्शन करतो.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी माझ्या यशाला सुसंगत होण्याचा आदेश देतो. दैवी सामर्थ्याने मी येशूच्या नावाने घोषित करतो की, मी विजयी होत आहे.**

**पुढील अभ्यास**
उत्पत्ती १:२६-२७

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४५**
आमोस ७-९; प्रकटीकरण ५



Good News DAILY

# नीतिमत्तेचे दान

**रोमकरांस पत्र ५:१७ (MARVBSI)**
**कारण जर त्या एकाच इसमाच्या द्वारे, त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषेकरून त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करतील.**

दान ही अशी गोष्ट आहे जी तुम्हाला विनामूल्य मिळते, तुम्ही काही केले म्हणून नाही, तर देणाऱ्याच्या इच्छेनुसार मिळते. पवित्र शास्त्र म्हणते की आपल्याला नीतिमत्तेचे दान मिळाले आहे. नीतिमत्त्व म्हणजे देवासमोर योग्य स्थितीत असणे. आणि तुम्ही देवासमोर योग्य कसे दिसता? तुम्ही योग्य आहात कारण तुम्ही येशू ख्रिस्ताचा स्वीकार केला आहे.

ज्या क्षणी तुम्ही ख्रिस्ताचा स्वीकार केला, त्या क्षणी कार्य करणारी नीतिमत्ता यापुढे तुमची नाही तर ख्रिस्ताची आहे. तुम्ही देवासमोर धैर्याने उभे राहू शकता आणि काहीही मागू शकता, कारण त्याच्या दृष्टीने तो कोणतीही अपूर्णता पाहत नाही, तो केवळ ख्रिस्ताला पाहतो. आपला प्रभू येशू शुद्ध आहे, आणि त्याच्यामध्ये असल्याने, तुम्हीही शुद्ध आहात. प्रभूची स्तुती करा!

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, नीतिमत्तेच्या दानाबद्दल मी तुझे आभार मानतो. मी प्रार्थना करतो की मी नेहमी समज आणि नूतनीकरण केलेल्या मनात चालेन. मी जे काही आज्ञा देईन ते मान्य केले जाईल कारण मी तुझा आहे आणि तू माझा आहेस.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी घोषित करतो की मला ख्रिस्ताद्वारे कृपेची विपुलता आणि नीतिमत्तेचे दान मिळाले आहे. मी देवासमोर नीतिमान, स्वीकारलेला आणि निष्कलंक उभा आहे. मी पाप, भीती आणि मर्यादेवर जीवनात राज्य करतो. माझा आवाज अधिकाराचा आहे कारण मी ख्रिस्तामधील माझ्या स्थितीतून बोलतो.**

**पुढील अभ्यास**
रोमकरांस ३:२२-२४

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४६**
लूक २३:२६-५६; स्तोत्रसंहिता १२६-१२८




GoodNews DAILY

# बाहेर पडण्याची योजना

**१ करिंथ १०:१३ (MARVBSI)**
**मनुष्याला सहन करता येत नाही अशी परीक्षा तुमच्यावर गुदरली नाही; आणि देव विश्वसनीय आहे, तो तुमची परीक्षा तुमच्या शक्तीपलीकडे होऊ देणार नाही, तर परीक्षेबरोबर तिच्यातून निभावण्याचा उपायही करील, ह्यासाठी की, तुम्ही ती सहन करण्यास समर्थ व्हावे.**

जीवनाच्या अनेक क्षेत्रांत, शहाणे लोक गरज पडण्यापूर्वीच बाहेर पडण्याची योजना (exit plan) तयार करून ठेवतात. संकटापूर्वीच वैमानिकांना आपत्कालीन प्रक्रियेचे प्रशिक्षण दिले जाते. इमारतींना आगीच्या वेळी बाहेर पडण्यासाठी चिन्हांकित मार्ग (exits) असतात. विनाशकारी नुकसान टाळण्यासाठी गुंतवणूकदार 'स्टॉप-लॉस' मर्यादा निश्चित करतात. योजना अगोदरच तयार केलेली असते जेणेकरून जेव्हा दबाव येतो, तेव्हा बाहेर जाण्याचा स्पष्ट मार्ग असतो.

त्याचप्रमाणे, देवाने तुम्हाला बाहेर पडण्याच्या मार्गाशिवाय सोडलेले नाही. मग तो आर्थिक ताण असो, डॉक्टरांचा अहवाल असो, वारंवार होणारी निराशा असो, किंवा प्रचंड दबाव असो, इतरांना ज्या परिस्थितीतून जावे लागते त्यातून जाण्यासाठी तुमची नियुक्ती केलेली नाही. जरी परिस्थिती अंतिम वाटत असली तरी तुम्ही जगासारख्याच परिणामांच्या अधीन नाही. नेहमी बाहेर पडण्याचा एक मार्ग असतो; तुमची जबाबदारी ती ओळखणे आणि त्या मार्गाने जाणे ही आहे.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, माझ्यासाठी नेहमी बाहेर पडण्याचा मार्ग उपलब्ध करून दिल्याबद्दल तुझे आभार. प्रत्येक परिस्थितीत तू तयार केलेले मार्ग ओळखण्यासाठी माझे डोळे उघड.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी देवाने माझ्यासाठी तयार केलेला बाहेर पडण्याचा प्रत्येक मार्ग ओळखतो आणि तो स्वीकारतो. मी अडकलेलो नाही, मर्यादित नाही, किंवा पराभूत नाही. मी प्रत्येक परिस्थितीतून विजयी होऊन बाहेर पडतो.**

**पुढील अभ्यास**
२ पेत्र २:९

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४७**
ओबद्या १; प्रकटीकरण ६




# वाइटापासून मुक्त

**याकोब १:१३ (MARBSI)**
**कोणाची परीक्षा होत असता, देवाने मला मोहात घातले, असे त्याने म्हणू नये; कारण देवाला वाईट गोष्टींचा मोह होत नाही आणि तो स्वतः कोणाला मोहात पाडत नाही;**

काही पदार्थ अभेद्य (impervious) असतात, याचा अर्थ ते शोषून घेत नाहीत किंवा त्यांना विरोध करणाऱ्या गोष्टींचा त्यांच्यावर परिणाम होऊ देत नाहीत. या पदार्थांची रचना अशी असते की ते कोणत्याही हस्तक्षेपाला परवानगी देत नाहीत. वातावरण कठोर असू शकते, परंतु ते त्यांच्या संरचनेत बदल करत नाही. त्यांच्या विरोधात जे येते ते त्यांच्या आत जाऊ शकत नाही.

देव वाइटासाठी अभेद्य आहे; वाइटाला त्याच्यात प्रवेश नाही, त्याच्यावर प्रभाव नाही आणि त्याच्यात स्थान नाही. त्याच्यापासून जन्मलेला म्हणून, तुमच्याकडेही तोच स्वभाव आहे जो वाईट गोष्टींना विरोध करतो आणि नाकारतो. जेव्हा तुम्ही हे समजून घेता, तेव्हा तुम्ही स्वतःला संघर्षाशी जोडणे थांबवता आणि तुमच्या खऱ्या स्वभावातून जगण्यास सुरुवात करता. ख्रिस्तामध्ये तुम्ही कोण आहात याच्याशी जे सुसंगत नाही त्याचा कधीही विचार करू नका. अप्रभावित, अविचलित आणि भ्रष्ट न होता राहा, कारण जे तुमच्या आत आहे ते त्याला परवानगी देत नाही.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी तुझ्या स्वभावाचा वाटेकरी आहे याबद्दल तुझे आभार . ख्रिस्तामध्ये मी कोण आहे याची जाणीव मजबूत कर, जेणेकरून मी प्रत्येक दबावाच्या वर जगेन आणि जे तुझे नाही त्या प्रत्येक गोष्टीला नकार देईन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी वाईट गोष्टींच्या प्रभावाखाली नाही. मी वाइटासाठी अभेद्य आहे. त्याचे माझ्यामध्ये स्थान नाही आणि माझ्यावर अधिकार नाही. मी येशूच्या सामर्थ्यशाली नावाने बळी पडत नाही किंवा भ्रष्ट होत नाही.**

**पुढील अभ्यास**
१ योहान ५:१८

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४८**
योना १-४; प्रकटीकरण ७



# वचन वाढलेच पाहिजे

**प्रेषितांची कृत्ये ६:७ (MARVBSI)**
**मग देवाच्या वचनाचा प्रसार होत गेला; यरुशलेमेत शिष्यांची संख्या फार वाढत गेली; याजक वर्गातीलही पुष्कळ लोकांनी ह्या विश्वासाला मान्यता दिली.**

कोणत्याही वातावरणात, ज्याला जोपासले जाते आणि विकसित होऊ दिले जाते, ते शेवटी वर्चस्व गाजवते. एखादे शेत दुर्लक्षित सोडा, आणि तण त्यावर अतिक्रमण करेल. कोणतीही गोष्ट जास्त काळ तटस्थ राहत नाही; काहीतरी नेहमीच वाढत असते. जे वाढते त्याला प्रभाव मिळतो; ज्याकडे दुर्लक्ष केले जाते त्यावर मात केली जाते.

जर देवाचे वचन तुमच्यामध्ये वाढत नसेल, तर दुसरी एखादी गोष्ट त्याची जागा घेईल. दबाव, भीती आणि विरुद्ध आवाज वर्चस्व गाजवू लागतील, ते अधिक बलवान आहेत म्हणून नाही, तर त्यांना वाढू दिले म्हणून. तुम्हाला परिस्थितीच्या आहारी जाण्यासाठी बनवलेले नाही. तुमच्यातील वचनाची जोपासना केली पाहिजे जोपर्यंत ते तुमच्या जीवनातील सर्वात मजबूत प्रभाव बनत नाही. जेव्हा वचन प्रभावी असते, तेव्हा तुम्ही विजयी होता. त्याचे पोषण करा, ते बोला, आणि ते तुमच्यामध्ये प्रचंड वाढ होईपर्यंत त्यावर कृती करा.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, माझ्यामध्ये कार्य करणाऱ्या तुझ्या वचनाच्या सामर्थ्या बद्दल तुझे आभार. मी दररोज त्याचे पालन करण्यासाठी आणि त्याला माझ्या जीवनात पहिले स्थान देण्याचे वचन देतो. तुझे वचन माझ्यामुळे इतके सामर्थ्याने वाढू दे की ते माझ्या प्रत्येक परिणामावर नियंत्रणठेवेल.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाचे वचन माझ्यात सामर्थ्याने वाढते आणि माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विजयी ठरते. मी दबावामुळे किंवा परिस्थितीने पराभूत होत नाही. मी विजयी होतो कारण माझ्यातील वचन विजयी होत आहे.**

**पुढील अभ्यास**
कलस्सैकर ३:१६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३४९**
मीखा १-३; प्रकटीकरण ८



# ते ढवळून काढा

**१ तीमथ्य ६:१७ (MARVBSI)**
**प्रस्तुत युगातल्या धनवानांना निक्षून सांग की, तुम्ही अभिमानी होऊ नये, चंचल धनावर आशा ठेवू नये, तर जो जिवंत देव आपणांस उपभोगासाठी सर्वकाही विपुल देतो त्याच्यावर आशा ठेवावी.**

जर तुम्ही कधी इटालियन सोडा प्यायला असेल, तर तुमच्या लक्षात येईल की घट्ट सिरप तळाशी बसतो, तर वरचे द्रव स्पष्ट आणि जवळजवळ चव नसलेले दिसते. गोडवा तिथे असतो, परंतु तो तळाशी केंद्रित राहतो. एकदा तुम्ही ते ढवळले की सर्वकाही बदलते; जे तळाशी लपलेले होते ते सर्वत्र अनुभवले जाते.

त्याचप्रमाणे, प्रत्येक ख्रिस्ती आपल्या आत ख्रिस्ताने आधीच सुरक्षित केलेले सर्व काही (विजयाचे गोड जीवन, आनंद, परिपूर्ण आरोग्य, संपत्ती) बाळगतो, परंतु ते त्याचा पूर्णपणे अनुभव घेत नाहीत. ते तळाशी स्थिरावलेले असते आणि गोडव्याची चव घेण्याची वाट पाहत असते, परंतु जे आधीपासून तुमचे आहे ते तुम्हाला सक्रिय करावे लागेल. देवाने जे विपुलतेने दिले आहे ते ढवळण्यासाठी वचनाचा वापर करा. देवाच्या सामर्थ्याला तुमच्या मध्ये सुप्त अवस्थेत राहू देऊ नका.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, ख्रिस्तामध्ये माझ्यासाठी जो विजय आधीच मिळून दिला आहे त्याबद्दल तुझे आभार. तू माझ्या अंतकरणात जे ठेवले आहे, त्याला जागृत करायला आणि माझ्या जीवनात तुझ्या सामर्थ्याची परीपूर्णता प्रकट करण्यास मला शिकव.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी निष्क्रिय किंवा सुप्त जीवन जगण्यास नकार देतो. ख्रिस्ताने जे काही साध्य केले आहे ते माझ्यामध्ये जिवंत आणि सक्रिय आहे, आणि ते माझ्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्पष्ट दिसते.**

**पुढील अभ्यास**
योहान १०:१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५०**
मीखा ४-५; प्रकटीकरण ९



Good News DAILY

# कार्यरत राहा

**लूक १९:१३ (MARVBSI)**
**त्याने आपल्या दहा दासांना बोलावले व त्यांना दहा मोहरा देऊन सांगितले, 'मी येईपर्यंत त्यांवर व्यापार करा.**

येशू परत येणार आहे ही वस्तुस्थिती आत्म्याने भरलेल्या कोणालाही शंकेच्या पलीकडे आहे. त्याचे येणे निश्चित आहे, परंतु पवित्र शास्त्र काय म्हणते ते पहा: येशू येईपर्यंत आपले कार्य करा (occupy till I come).

"ऑक्युपाय" (occupy) या शब्दाचा अर्थ मोकळी जागा भरणे असा नाही; याचा अर्थ येशू परत येईपर्यंत व्यवसाय करणे असा आहे. तुम्ही या पृथ्वीवर आहात तोपर्यंत व्यवसाय करा; तुमच्या हातांनी काहीतरी कार्य करा, आणि देव तुमच्या हाताच्या फळाला आशीर्वाद देईल.

### आजची प्रार्थना

**हे देवा, माझ्या हाताच्या कार्याला आणि माझ्या श्रमाच्या फळाला आशीर्वाद दे. पवित्र आत्म्या, माझा मार्गदर्शक आणि रणनीतीकार बन जेणेकरून मी माझ्या संपत्तीचा ताबा घेईन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी नवीन प्रदेशांवर ताबा मिळवतो आणि वर्चस्व प्रस्थापित करतो. येशूच्या नावाने पृथ्वी माझ्यासाठी चांगले परिणाम देईल.**

**पुढील अभ्यास**
कलस्सै ३:२३-२४

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५१**
मीखा ६-७; प्रकटीकरण १०



GoodNews DAILY

# साचलेले नाही

**नीतिसूत्रे ४:१८ (MARVBSI)**
**परंतु नीतिमानांचा मार्ग मध्यान्हापर्यंत उत्तरोत्तर वाढणाऱ्या उदयप्रकाशा सारखा आहे.**

साचलेले पाणी हे डास आणि सर्व प्रकारच्या आजारांचे माहेरघर असते, तर जे पाणी वाहत आणि हलत असते ते सर्वात स्वच्छ असते. त्याचप्रमाणे, जे लोक निष्क्रिय आणि साचलेले असतात ते सैतानासाठी द्वेष, खोटे, मत्सर आणि राग पेरण्याचे सोपे लक्ष्य बनतात. जे हलत नाही ते कुजायला लागते; जे वाहत राहते ते स्वच्छ राहते आणि दुषित होण्यास प्रतिकार करते.

हेच तत्त्व आध्यात्मिकरित्या लागू होते. पवित्र शास्त्र म्हणते की आपण गौरवाकडून गौरवाकडे—सामर्थ्याच्या एका पातळीवरून दुसऱ्या पातळीकडे—जातो, कारण देवामध्ये काहीही स्थिर नसते. तुम्ही त्याच्यामध्ये राहिल्यावर, तुम्ही एकाच स्थितीत इतका काळ राहू नये की भ्रष्टाचाराला संधी मिळेल. आज, तुमच्या विषयीची प्रत्येक गोष्ट गतिमान आहे आणि अधिक चांगला आकार घेत आहे.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, तुझ्या गौरवाबद्दल आणि माझ्या जीवनावरील तुझ्या स्पष्ट उपस्थितीबद्दल तुझे आभार. तुझ्या विशेष कृपेने, माझा व्यवसाय आणि जे काही माझे आहे ते येशूच्या नावाने आशीर्वादित आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी असा हुकूम देतो आणि घोषित करतो की मी या जगात एक शक्ती आहे आणि मला कोणीही थांबवू शकणार नाही किंवा आव्हान देऊ शकणार नाही. मी येशूच्या नावाने साक्षींचे नवीन दरवाजे उघडण्याची आज्ञा देतो.**

**पुढील अभ्यास**
नीतिसूत्रे ४:१८

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५२**
नहूम १-३; प्रकटीकरण ११



# रूपांतरण

**२ करिंथ ३:१८ (MARVBSI)**
**परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत; आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत.**

रूपांतरण (Metamorphosis) ही एक जैविक प्रक्रिया आहे ज्याद्वारे एखादी गोष्ट एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत बदलते. उदाहरणार्थ, फुलपाखराची सुरुवात अंड्यापासून होते, नंतर ती अळी बनते, नंतर कोश आणि शेवटी एक रंगीबेरंगी प्रौढ फुलपाखरू बनते. ख्रिस्ती म्हणून, आपण देखील रूपांतरणातून जातो: आपण एका अवस्थेतून दुसऱ्या अधिक चांगल्या अवस्थेत बदलतो.

पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की जेव्हा आपण वचनामध्ये रमतोआणि वचनाच्या आरशातून देवाकडे पाहतो, तेव्हा आपण अगदी त्याच्यासारखे बनतो. तुम्ही देवासारखे बना, जो कधीही हरत नाही किंवा अपयशी ठरत नाही, वचनाकडे जा. रूपांतरित व्हा!

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी तुझ्या वचनाबद्दल माझ्या मनात अधिक ओढ निर्माण व्हावी म्हणून मी प्रार्थना करतो. येशूच्या नावाने समजून घेण्यास मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी देवाच्या वचनाद्वारे बदलतो. वचनाच्या सामर्थ्याने मी गौरवाकडून दुसऱ्या गौरवाकडे वाटचाल करतो. माझी सर्वोत्तम रूप येशूच्या नावाने प्रकट होत आहे.**

**पुढील अभ्यास**
योहान १:१४

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५३**
लूक २४:१-३५; स्तोत्रसंहिता १२९-१३९




# वचनाद्वारे विजयी व्हा

**प्रेषितांची कृत्ये १९:२० (MARVBSI)**
**ह्या प्रमाणे प्रभूच्या सामर्थ्याचे वचन वाढत जाऊन प्रबल झाले.**

इफिसस शहरात, प्रेषितांनी उपदेश केला आणि अनेकांचे मनपरिवर्तन झाले आणि ते आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या प्रकाशाकडे आले. त्याच्या या प्रभावी सामर्थ्याचे आणि पराक्रमाचे संपूर्ण कारण आपल्या आजच्या शास्त्रवचनात दडलेले आहे. जे वाढले आणि विजयी झाले तो पौल नव्हता, तर ते वचन होते ज्याचा तो प्रचार करत होता.

देवाचे वचन अधिक प्रमाणात सेवन केल्यास तुम्ही शत्रूवर विजय मिळवता, आणि देवाचे वचन कमी प्रमाणात सेवन केल्यास शत्रू तुमच्यावर विजय मिळवेल. तुम्हीया वचनाचे पालन करत असल्यामुळे, येशूच्या नावाने तुमचा विजय निश्चित आहे.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मला तुझ्या वचनात वाढण्यास आणि तुझ्या वचनात सुसंगत राहण्यास मदत कर. तुझ्या वचनाच्या तत्त्वांवर ठाम राहण्यास आणि त्यापासून कधीही दूर न जाण्यास मला मदत कर, येशूच्या नावाने आमेन.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझ्यातील वचन वाढत आहे आणि या जीवनातील सर्व परिस्थितींवर विजय मिळवत आहे. मी बाजारपेठेत, आरोग्यामध्ये, सेवकाईत आणि सर्व गोष्टींवर येशूच्या नावाने प्रभुत्त्व मिळवितो.**

**पुढील अभ्यास**
यिर्मया २३:२९

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५४**
हबक्कूक १-३; प्रकटीकरण १२




# अंधारात नाही

**१ थेस्सल ५:२ (MSG)**
**कारण तुम्हा स्वत:ला पक्के माहीत आहे की जसा रात्री चोर येतो, तसाच प्रभूचा दिवस येतो.**

पवित्रा शास्त्र म्हणते की येशू अंधारात चोरासारखा येईल. बरेच लोक याचा उल्लेख करतात आणि हे देखील स्वीकारतात की आपला प्रभू कधी येईल हे कोणालाही माहित नाही. जरी तुम्ही वाचत असलात, तरीही हे वचन खरोखर काय सांगत आहे ते तुमच्या लक्षात येत नसेल.

आपले आजचे शास्त्रवचन सांगते की आपण जे ख्रिस्तामध्ये आहोत ते त्याच्या येण्याबद्दल अनभिज्ञ नाही. आपण प्रत्यक्षात प्रकाशात आहोत, अंधारात नाही. १ थेस्सलनीकांच्या याच अध्यायातील ४ थे वचन काय म्हणते ते पहा: "परंतु मित्रांनो, तुम्ही अंधारात नाही, मग तुम्हाला यापैकी कशानेही बेसावध कसे पकडले जाऊ शकते? तुम्ही प्रकाशाचे पुत्र आणि दिवसाच्या कन्या आहात." जे अजूनही अंधारात आहेत त्यांच्यासाठीच तो चोरासारखा असेल. प्रभूची स्तुती करा, कारण तुम्हाला माहित असेल, आणि सध्यासाठी, तो येईपर्यंत तुम्ही कार्य करत राहाल (occupy till He comes).

### आजची प्रार्थना

**प्रभू, रॅप्चरपर्यंत (rapture) जे महत्त्वाचे आहे त्यावर ठाम राहण्यास मला मदत कर. मी येशूच्या नावाने माझ्या नीतिमत्तेच्या मार्गातील सर्व मर्यादा आणि अडथळे दूर करतो.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या प्रकाशात वाढत राहीन. येशूच्या नावाने मी ज्या प्रत्येक गोष्टीला स्पर्श करतो त्यात वचनाचा प्रकाश चमकत आहे.**

**पुढील अभ्यास**
मत्तय २४:४२

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५५**
सफन्या १-३; प्रकटीकरण १३



# नियंत्रण घ्या

**शास्ते ५:६-७ (MARVBSI)**
**अनाथाचा मुलगा शमगार ह्याच्या दिवसांत, याएलेच्या दिवसांत राजमार्ग सुने पडले; वाटसरू आडमार्गांनी प्रवास करत. मी दबोरा पुढे येईपर्यंत, इस्राएलात माता म्हणून मी प्रसिद्ध होईपर्यंत, इस्राएलात कोणी नेते उरले नव्हते; मुळीच उरले नव्हते.**

उद्योगांमध्ये, राजकारणात, किंवा अगदी सेवकाईतही देवाने लोकांना काही दिवस दिलेले असतात. तो काही व्यक्तींना ते दिवस ताब्यात घेण्याची आणि त्यावर वर्चस्व गाजवण्याची कृपा देतो. पवित्रशास्त्र आपल्याला हे सांगून सुरुवात करते की ते दिवस शमगारचे होते, तरीही ७ व्या वचनात, दबोरा नावाची स्त्री उठली.

दबोरा दुसऱ्या कोणाच्या तरी दिवसांत उठली कारण त्या दिवसांचा मालक उठला नाही. हे दिवस तुमचे आहेत, आणि तुम्हाला उठून प्रदेशांचा ताबा घेण्याची गरज आहे. तुमचे कुटुंब आणि तुमच्या सभोवतालचे सर्वजण तुमची वाट पाहत आहेत. उठा!

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मला माहित आहे की प्रत्येकजण माझी वाट पाहत आहे. तुझ्या आत्म्याद्वारे उठून माझ्या कुटुंबाला आजारपण, गरिबी आणि मृत्यूपासून येशूच्या नावाने वाचवण्यासाठी मला मदत कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी प्रत्येक परिस्थितीवर नियंत्रण आणि ताबा घेतो. माझ्या कुटुंबाला येशूच्या नावाने वाचवण्याची देवाची क्षमता माझ्याकडे आहे.**

**पुढील अभ्यास**
यहोशवा १:३

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५६**
हाग्गय १-२; प्रकटीकरण १४



# तूच तो आहेस

**मत्तय११:३ (MARVBSI)**
**जे येणार आहेत ते आपणच, की आम्ही दुसऱ्याची वाट पाहावी?"**

जेव्हा बाप्तिस्मा करणारा योहान तुरुंगात होता आणि अजूनही वेदना सहन करत होता, तेव्हा त्याला एक गोष्ट आठवली: येशू हा तो मशीहा होता ज्याने त्याची सुटका केली पाहिजे. मशीहा बाहेर त्याच्या पित्याचे काम करत असताना स्वतः तुरुंगात बेड्यांत अडकलेले असणे त्याला अर्थहीन वाटले. म्हणून त्याने त्याच्या शिष्यांना येशूला विचारण्यासाठी पाठवले, "तूच तो आहेस का?"

तुमचे सर्व मित्र आणि कुटुंबातील सदस्य जे आज गैरसोयीत आहेत ते कदाचित तोच प्रश्न विचारत असतील. तूच तो आहेस का जो कुटुंबाची सुटका करेल? आज, तुमच्या कुटुंबाचा तारणहार होणे निवडा. संकटातून त्यांना वाचवणारे तुम्हीच व्हा. त्यांना येशूची सुवार्ता सांगा आणि तुमच्या परिवारात प्रकाश आणा. आजच सुरुवात करा, कारण ते ज्याची वाट पाहत आहेत तो तूच आहेस.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, ज्यांना गरज आहे त्यांची सुटका करण्यासाठी मला कृपा दे. येशूच्या नावाने त्यांच्या जीवनाच्या मार्गांवर चमकणारा प्रकाश मला बनव.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी माझ्या कुटुंबाचा तारणहार होण्यासाठी उभा झालो आहे. गरजू लोकांना आधार देण्यासाठी माझ्याकडे येशूच्या नावाने एक भक्कम पुरवठ्याचा स्रोत आहे.**

**पुढील अभ्यास**
यशया ६१:१

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५७**
जखऱ्या १-२; प्रकटीकरण १५



GoodNews DAILY

# प्रदेश बदला

**इब्री१२:२२ (MARVBSI)**
**पण तुम्ही सीयोन पर्वत, जिवंत देवाचे नगर म्हणजे स्वर्गीय यरुशलेम, लाखो देवदूत,**

पवित्र शास्त्र म्हणते की आपण सियोन पर्वताजवळ आणि असंख्य देवदूतांजवळ आलो आहोत. सध्या, तुम्हाला कदाचित पृथ्वीवरील तुमच्या भौतिक स्थानाचीच जाणीव असेल. तरीही देवाचे मूल म्हणून तुम्ही फक्त तिथेच नाही आहात; तुम्ही सियोनमध्ये राहत आहात. तुम्ही सियोनचे नागरिक आहात. तुमची आध्यात्मिक ओळख सियोन आहे.

सियोनमध्ये, दुष्काळ किंवा अपयश नाही. तिथे तुम्ही या जीवनातील संकटांच्या आवाक्याबाहेर आहात. सियोनच्या नागरिकासारखे जगा आणि सियोनच्या मुलासारखे बोला. तुम्ही एका चांगल्या प्रदेशाचे आहात.

### आजची प्रार्थना

**मी प्रार्थना करतो की देवाची कृपा माझ्यावर सावली करेल. मी प्रत्येक मौल्यवान आशीर्वादाला माझ्या पाठीशी राहण्याची आज्ञा देतो, आणि मी येशूच्या नावाने सियोनचा आशीर्वाद प्रतिबिंबित करत राहीन.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी सियोनचा नागरिक आहे, आणि मला पुरवठ्याची कमतरता नाही. येशूच्या सामर्थ्यशाली नावाने मी माझ्या सर्व कोठारांना विपुलतेने ओसंडून वाहण्याची आज्ञा देतो.**

**पुढील अभ्यास**
स्तोत्र २:६

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५८**
जखऱ्या ३-४; प्रकटीकरण १६



GoodNews DAILY

# मुक्त केलेलादिवस

**शास्ते ६:२५-२६ (MARVBSI)**
**त्याच रात्री परमेश्वराने गिदोनाला म्हटले, "आपल्या बापाचा गोऱ्हा म्हणजे दुसरा गोऱ्हा जो सात वर्षांचा आहे तो घे; तुझ्या बापाची बआल देवाची वेदी पाडून टाक व तिच्याजवळ असलेली अशेरा मूर्ती तोडून टाक. 'मग त्या खडकाच्या उच्चभागी आपला देव परमेश्वर ह्याच्यासाठी विहित केलेल्या पद्धतीप्रमाणे वेदी बांध आणि तू फोडलेल्या अशेरा मूर्तीची लाकडे तिच्यावर ठेवून त्यावर त्या दुसऱ्या गोऱ्हाचे हवन कर."**

गिदोनाला बाल देवाची वेदी पाडून टाकण्याची आणि त्याच ठिकाणी परमेश्वरासाठी एक वेदी बांधण्याची आज्ञा देण्यात आली होती. तेथे जे स्थापित केले गेले होते त्याद्वारे त्या स्थानाची मुक्तता (redeemed) करण्यात आली. आज, काही जण २५ डिसेंबरला प्रभू येशूचा जन्म साजरा करण्याबाबत वाद घालतात कारण त्याचा संबंध भूतकाळातील मूर्तीपूजक परंपरांशी जोडला जातो. परंतु तत्त्व कायम आहे: जे एकेकाळी दुसऱ्या कशासाठी तरी वापरले गेले होते, ते ताब्यात घेऊन देवाला समर्पित केले जाऊ शकते.

प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने, आपण हा दिवस त्याच्यासाठी ताब्यात घेतला आहे! आता लक्ष भूतकाळात काय होते यावर नाही तर तो कोण आहे यावर आहे. त्याचा जन्म म्हणजे जगात तारणाचा प्रवेश आणि मानवजातीसाठी देवाच्या योजनेच्या पूर्ततेची सुरुवात आहे.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, जगाला प्रभू येशू ख्रिस्ताची भेट दिल्याबद्दल मी तुझे आभार मानतो. मानवजातीचा प्रकाश आणि तारण म्हणून तुझ्या पुत्राला पाठवल्याबद्दल तुझे आभार. मी त्याच्या जन्माचा आनंद साजरा करतो, आणि त्याच्याद्वारे मला मिळालेल्या तारणाबद्दल आणि जीवनाबद्दल माझे हृदय कृतज्ञतेने भरलेले आहे.**

### भविष्यसूचक घोषणा

**येशू ख्रिस्त राज्य करतो, आणि त्याचा विजय माझ्या जीवनात स्थापित झाला आहे. मी त्याच्या विजयाच्या पूर्णतेत चालत, त्याच्या प्रभुत्वाखाली जगतो. हालेलुया, ख्रिस्ताने सर्व गोष्टींवर विजय मिळवला आहे!**

**पुढील अभ्यास**
यशया ९:६; लूक २:१०-११

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३५९**
जखऱ्या ५-६; प्रकटीकरण १७




Good News DAILY

# पुरवठ्याची हमी

**फिलिप्पैकरांस पत्र ४:६ (MARVBSI)**
**कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा.**

एका अशा पित्याची कल्पना करा ज्याच्या मालकीची हजारो टेकड्यांवरील गुरे आहेत, जो विश्वाचा निर्माता आहे, आणि जो तुम्हाला तुमच्या विनंत्या त्याला सांगण्यासाठी आमंत्रित करत आहे. किती मोठा बहुमान! आजचे शास्त्र आपल्याला आठवण करून देते की आपण कशाचीही काळजी करू नये. त्याऐवजी, आपल्याला फक्त आपल्या विनंत्या त्याला सांगण्याची गरज आहे.

आज, देवाला तुमच्या विनंत्या सांगण्यासाठी वेळ काढा. तुमची देणी त्याच्याकडे घेऊन या, कारण तो ती भरू शकतो. तुमचा स्वर्गीय पिता "श्रीमंत" या शब्दाने तुम्ही जी काही कल्पना करू शकता त्यापेक्षा अधिक श्रीमंत आहे, आणि त्याचा पुरवठा अनंतकाळचा आहे. कमतरता भासू देऊ नका किंवा दुःख सहन करू नका, कारण तुमचा स्वर्गात एक श्रीमंत पिता आहे. त्याला तुमच्या समस्या सांगा.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी माझ्या विनंत्या तुला सांगतो. मी प्रार्थना करतो की माझ्या सर्व इच्छा पूर्ण केल्या जाव्यात. येशूच्या नावाने मी तुझ्यासमोर आणि मला पाहणाऱ्यांसमोर कृपेची प्रार्थना करतो.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझ्या प्रार्थनांना होकारार्थी उत्तर मिळाले आहे. मी विपुलतेचे जीवन जगेन, आणि येशूच्या नावाने वरून सर्व गोष्टींचा पुरवठा केला जाईल.**

**पुढील अभ्यास**
स्तोत्र ५०:१०

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३६०**
लूक २४:३५-५३; स्तोत्रसंहिता १४०-१५०




# आणखी चिंता नाही

**मत्तय ६:३४ (MARVBSI)**
**ह्यास्तव उद्याची चिंता करू नका, कारण उद्याची चिंता उद्याला; ज्या दिवसाचे दुःख त्या दिवसाला पुरे.**

देवाचे मूल म्हणून, तुम्हाला उद्याची काळजी करण्यासाठी अभिषेक केलेला नाही. उद्याची काळजी करण्याची परवानगी असणारी एकमेव संस्था म्हणजे "उद्या". देवाला माहित आहे की मन बिले, अन्न आणि इतर गोष्टींबद्दल विचार करून अतिरिक्त काम करू शकते. तरीही आपल्याला अन्न, कपडे, आपले शरीर, आपले जीवन कशाचीही चिंता न करण्याची आज्ञा दिली आहे!

देवाच्या अनेक लोकांना वाटते की आपण अजिबात विचार करू नये, परंतु त्याचा अर्थ असा नाही. चिंता ही निराशेच्या स्थितीतून येते, हे न जाणून घेतल्याने की तुम्ही स्वर्गाचे राजदूत आहात. पवित्र शास्त्र म्हणते की चिंताजनक असा कोणताही विचार करू नका. तुम्ही देवाचे बीज आहात, आणि त्याने तुम्हाला जीवनाशी संबंधित सर्व आशीर्वादांनी आशीर्वादित केले आहे. तुमच्या भविष्यासाठी अगोदरच त्याचे आभार माना, आणि तुमचा पुरवठा विपुल असेल. काळजी करण्याची गरज नाही.

### आजची प्रार्थना

**मी प्रार्थना करतो की माझे दिवस कृपेने भरलेले असेल. माझ्या जीवनात कोणतीही कमतरता किंवा मर्यादा नाही. पवित्र आत्म्या, माझा रणनीतीकार बन जेणेकरून मी कोणतीही संधी गमावणार नाही. प्रभू, येशूच्या नावाने माझा उद्याचा दिवस सुरक्षित केल्याबद्दल धन्यवाद.**

### भविष्यसूचक घोषणा

**माझे जीवन पूर्णपणे पुरवलेले आहे आणि माझी सर्व कोठारे भरलेली आहेत. मी माझ्या संसाधनांचे नियंत्रण आणि ताबा घेतो, आणि येशूच्या नावाने मला कोणत्याही चांगल्या गोष्टीची कमतरता भासणार नाही.**

**पुढील अभ्यास**
फिलिप्पैकर ४:६-७

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३६१**
जखऱ्या ७-८; प्रकटीकरण १८



GoodNews DAILY

# खरी संपत्ती

**इफिसकरांस पत्र ३:८ (MARVBSI)**
**मला 'मी जो सर्व पवित्र जनांतील लहानाहून लहान त्या माझ्यावर ही कृपा अशी झाली की, मी ख्रिस्ताच्या अगाध समृद्धीची सुवार्ता परराष्ट्रीयांना सांगावी;**

हॉर्मुझची सामुद्रधुनी २०२५-२०२६ च्या मध्य-पूर्व आणि जागतिक ऊर्जा संकटाचा केंद्रबिंदू बनली आहे, ज्याने जगभरातील अनेक अर्थव्यवस्थांना प्रभावित आणि पंगू केले आहे. मध्य-पूर्वेत जे घडत आहे त्याचे परिणाम उत्तर अमेरिका, आशिया आणि आफ्रिकेपर्यंतच्या अर्थव्यवस्थांना जाणवण्यासाठी एका अरुंद जलमार्गाचा कसा वापर केला जाऊ शकतो?

राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था असतात, ज्या बहुधा माणसाच्या शहाणपणावर बनवलेल्या असतात, परंतु पवित्र शास्त्र मध्ये असे काहीतरी आहे ज्याला ख्रिस्ताची अगम्य संपत्ती म्हटले आहे. हे तेल, सोने किंवा हिऱ्यांच्या पलीकडचे आहे. देवामध्ये आपल्याकडे "श्रीमंत" या शब्दापेक्षाही अधिक श्रीमंत असे काहीतरी आहे. जसे जसे तुम्हाला त्याचे वचन अधिक मिळेल, तसे तसे तुम्ही त्याच्या संपत्तीनुसार जगाल. पृथ्वीवरील घडामोडींनी तुम्ही पंगू होणार नाही कारण तुमचा पुरवठा वरून आहे.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, माझ्या आयुष्याच्या प्रत्येक दिवशी माझा पुरवठा ओसंडून वाहू दे. माझ्या सभोवतालची सर्व संसाधने पाहण्यासाठी माझे डोळे उघडले जावेत अशी मी प्रार्थना करतो.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी असा हुकूम देतो आणि घोषित करतो की माझा पुरवठा कधीही आटणार नाही. येशूच्या नावाने या पृथ्वीवरील कोणत्याही नकारात्मक घटनांचा माझ्यावर कधीही परिणाम होणार नाही.**

**पुढील अभ्यास**
इफिसकरांस २:७

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३६२**
जखऱ्या ९-१०; प्रकटीकरण १९



# मेघगर्जनेचे पुत्र आणि कन्या

**मार्क३:१७ (MARVBSI)**
**जब्दीचा मुलगा याकोब व याकोबाचा भाऊ योहान ह्यांना बोआनेर्गेस म्हणजे गर्जनेचे पुत्र हेही नाव दिले:**

शास्त्रामधील दोन भावांना—याकोब आणि योहान—विनाकारण मेघगर्जनेचे पुत्र असे टोपणनाव दिले गेले नव्हते. त्यांचा स्वभाव उत्साही, राज्याद्वारे चालविल्या जाणाऱ्या तीव्रतेने चिन्हांकित होता. जेव्हा एका शोमरोनी गावाने येशूला नाकारले, तेव्हा त्यांनी प्रखर संतापाने प्रतिक्रिया दिली, आणि असेही विचारले, "प्रभू, त्यांना भस्म करण्यासाठी आम्ही स्वर्गातून अग्नी पाचारण करावा अशी तुझी इच्छा आहे का?" येशूने त्यांना फटकारले, तरीही हे देवाच्या राज्याच्या सन्मानासाठी त्यांचा दृढनिश्चय प्रकट करते.

तुमच्याबद्दल काय आत्म्यात तुमचे टोपणनाव काय आहे? तुम्ही कशासाठी ओळखले जाता? आजपासून तुम्ही एखाद्या महान गोष्टीसाठी ओळखले जाल असा निश्चय करा. ते आत्मे जिंकणे, गरिबांना मदत करणे किंवा तुमच्या संस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणे असू शकते. तुमच्या स्वतःच्या मार्गाने मेघगर्जनेचे पुत्र किंवा कन्या व्हा.

### आजची प्रार्थना

**हे पित्या, मी प्रार्थना करतो की तुझा अभिषेक आणि तुझी कृपा मला माझ्या मार्गाने प्रभावी होण्यास मदत करो. येशूच्या सामर्थ्यशाली नावाने एखाद्या महान गोष्टीसाठी माझे नाव ओळखले जावे असे कर.**

### भविष्यसूचक घोषणा

**मी घोषित करतो आणि जाहीर करतो की मी देवाचा अग्नी धारण करतो. विश्वासाच्या सेनापतीं मध्ये माझे नाव घेतले जाईल. मी माझ्या देवाला ओळखतो, आणि येशूच्या नावाने मी पराक्रम करेन.**

**पुढील अभ्यास**
लूक ९:५४

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३६३**
जखऱ्या ११-१२; प्रकटीकरण २०



GoodNews DAILY

# गौरवाची आशा

**कलस्सै १:२७ (MARVBSI)**
**'ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ती परराष्ट्रीयांमध्ये काय आहे हे आपल्या पवित्र जनांना कळवणे देवाला बरे वाटले; गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे तो ते रहस्य आहे. '**

एखादी व्यक्ती करू शकणारी सर्वात मोठी गुंतवणूक म्हणजे आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा स्वीकार करणे. तो तुमचा उद्याचा दिवस सुरक्षित असल्याची हमी देणारा आहे. बायबल म्हणते की तुमच्या आतील ख्रिस्त हा सर्व गौरवाची आशा आहे. गोष्टी संथ वाटू शकतात आणि कधीकधी निराशाजनक वाटू शकतात, परंतु तुमच्यातील देव हा पुरावा आहे की तुमचा उद्याचा दिवस अधिक उजळ असेल.

वर्ष संपत आहे, आणि तुम्हाला वाटत असेल की तुम्ही यापेक्षा चांगली कामगिरी करू शकला असता. परंतु देवाचे आभार माना, कारण त्याच्याद्वारे तुमचा पुढचा ऋतू अधिक उजळ आणि चांगला असेल. परमेश्वराचे तेल तुम्हाला एक गौरवशाली शेवट देईल!

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, माझे भविष्य तुझ्यामध्ये सुरक्षित असल्याबद्दल तुझे आभार. येशूच्या नावाने सर्व तटबंदी तोडली जावी. या वर्षाच्या शेवटी आणि येणाऱ्या सर्व वर्षांसाठी माझे जीवन तुझे गौरव प्रतिबिंबित करो.**

### भविष्यसूचक घोषणा

**देवाचे सामर्थ्य माझ्या आत आहे. मी प्रत्येक लपलेल्या आशीर्वादाला आता प्रकट होण्याची आज्ञा देतो. येशूच्या नावाने देवाचे गौरव पाहण्यासाठी माझे कुटुंब आणि मी जिवंत राहू.**

**पुढील अभ्यास**
गलतीकर २:२०

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३६४**
जखऱ्या १३-१४; प्रकटीकरण २१



# उत्तम शेवट करणारा

**२ तीमथ्य ४:७ (MARVBSI)**
**जे सुयुद्ध ते मी केले आहे, धाव संपवली आहे, विश्वास राखला आहे;**

आपले आजचे शास्त्र वेगवेगळ्या प्रकारे वापरले जाते. अनेकजण ते अंत्यसंस्कारांमध्ये किंवा दु:खाच्या क्षणी वापरतात. तथापि, हे शास्त्र त्याहूनही पलीकडचे आहे; हे अशा व्यक्तीचे प्रतिबिंब आहे ज्याने शर्यत धावली आणि उत्तम शेवट केला.

या वर्षी, तुम्ही देखील उत्तम शेवट केला आहे. तुम्ही विश्वास टिकवून ठेवलात, आणि आता पुढच्या ऋतूवर लक्ष केंद्रित करण्याची वेळ आली आहे. तुम्हाला ज्या क्षेत्रांवर काम करण्याची गरज आहे त्यावर विचार करा आणि पवित्र आत्म्याला मदतीसाठी सांगा. तुमचे भविष्य सुरक्षिततेपेक्षा अधिक आहे, म्हणून आत्मविश्वासाने पुढे जा. प्रत्येक गोष्टीत, तुम्ही चांगली सुरुवात कराल आणि त्याहूनही उत्तम शेवट कराल. येशूच्या नावाने तुम्ही एक उत्तम शेवट करणारे आहात.

### आजची प्रार्थना

**हे प्रभू, मी या वर्षासाठी तुझे आभार मानतो. मी एका नवीन ऋतूत प्रवेश करत असताना, जे सर्वात महत्त्वाचे आहे त्यावर लक्ष केंद्रित करण्यास मला मदत कर. येशूच्या नावाने माझ्या यशामध्ये अडथळा आणू शकणारी प्रत्येक गोष्ट मुळापासून उपटून काढ.**

### भविष्यसूचक घोषणा

**हे वर्ष संपवत असताना, मी गमावलेला प्रत्येक आशीर्वाद मी पुढच्या ऋतूत घेऊन जातो. येशूच्या नावाने येणाऱ्या वर्षाचे नवीन आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी मी माझ्या हृदयात आणि माझ्या आत्म्यात एक व्यासपीठ तयार करतो.**

**पुढील अभ्यास**
इब्री १२:१

**३६५ बायबल आव्हान - दिवस ३६५**
मलाखी १-४; प्रकटीकरण २२




# आपले दैनिक भविष्यसूचक मार्गदर्शक

गुडन्यूज डेली आमच्या मुख्य भक्तीसह किशोरवयीन आणि मुलांसाठी विचारपूर्वक तयार केलेल्या समर्पित आवृत्त्या सादर करण्यास आनंदित आहे. प्रत्येक आवृत्ती परेषित उएबरट एंजेलच्या हृदयातून थेट दैनिक भविष्यसूचक शब्द देते, जे जीवनांच्या प्रत्येक टप्प्याशी बोलते आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्याशी जोडते.

देवाचे वचन संबंधित आणि प्रभावी मार्गाने जिवंत करण्यासाठी या भक्ती काळजीपूर्वक एकत्र केल्या गेल्या आहेत, ज्यामुळे वाचकांना विश्वास, समज आणि आध्यात्मिक परिपक्वता वाढण्यास मदत होईल. आमचे ध्येय हे सुनिश्चित करणे आहे की देवाचे सत्य सर्व वयोगटातील हृदयापर्यंत पोहोचेल आणि दररोज त्याच्याबरोबर सखोल चालण्याची प्रेरणा देईल.




**किशोरवयीन आवृत्ती**
आध्यात्मिक शहाणपण आणि सामर्थ्याने जीवनातील आव्हानांना नेव्हिगेट करण्यासाठी तरुणांना सुसज्ज करणाऱ्या शक्तिशाली अंतर्दृष्टीसह खोलवर जाते.

**मुलांची आवृत्ती**
विश्वास, प्रेम आणि देवाच्या अभिवचनांच्या मूलभूत संकल्पनांचा मजेशीर आणि आकर्षक मार्गाने परिचय देण्यासाठी डिझाइन केलेले तरुण अंतःकरणे देवाशी मजबूत नातेसंबंध विकसित करण्यास आणि बायबलला जीवनात आणण्यास मदत करते.

दररोज, तुम्हाला प्रेषित उएबरट एंजेल यांनी लिहिलेले तुमचे भविष्यसूचक वचन प्राप्त होईल, जो देवाबरोबर तुमचे चालणे बळकट करण्यासाठी आणि त्याच्या वचनानुसार जगण्यात मार्गदर्शन करण्यासाठी एक दैवी संदेश आहे. कुटुंबांसाठी विश्वासात एकत्र वाढण्याचा आणि देवाच्या सत्याची समज अधिक सखोल करण्याचा हा एक शक्तिशाली मार्ग आहे.

**चुकवू नका!**
गुडन्यूज डेलीच्या परिवर्तनशील शक्तीचा अनुभव घेण्यास प्रारंभ करा. प्रत्येक पिढीला उत्थान आणि प्रेरणा देण्यासाठी डिझाइन केलेले एक भविष्यसूचक मार्गदर्शक!

SCAN ME



# आपला प्रभु येशू ख्रिस्त

आपला प्रभु येशू ख्रिस्त हा ख्रिस्ती विश्वासाचा आधारस्तंभ आहे, त्याचे जीवन आणि शिकवणींनी इतिहासाच्या मार्गावर खोलवर प्रभाव पाडला आहे. आपला प्रभु येशू ख्रिस्त त्याच्या अतुलनीय करुणा, शहाणपण आणि त्याने केलेल्या चमत्कारी कृत्यांसाठी ओळखला जातो. त्याचा संदेश प्रेम, क्षमा आणि अनंतकाळच्या जीवनाचे अभिवचन यावर केंद्रित होता, जो त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना आशा आणि मुक्ती प्रदान करतो. त्याच्या संपूर्ण सेवेदरम्यान, त्याने यहुदियाच्या देशांत प्रवास केला, आजाऱ्यांना बरे केले, पीडितांचे सांत्वन केले आणि देवाच्या अनंतकाळच्या राज्याविषयी शिकवले.

येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक प्रभु आणि तारणारा म्हणून स्वीकारणे म्हणजे त्याच्या शिकवणुकी स्वीकारणे आणि आपल्या जीवनात त्याच्या परिवर्तनशील उपस्थितीला आमंत्रित करणे. हा आध्यात्मिक परिपूर्णतेकडे जाणारा प्रवास आहे, जो विश्वास, प्रेम आणि तारणाच्या अभिवचनावर आधारित आहे.

आपल्या प्रभु येशू ख्रिस्तादवारे आपल्याला सामर्थ्य, आशा आणि शाश्वत शांतीचा मार्ग सापडतो. परिपूर्ण होणे किंवा तारण मिळविणे म्हणजे आपल्या जीवनासाठी देवाला आणि त्याच्या योजनेला आणि हेतूला अधीन करणे होय. हे आपल्या जुन्या मार्गांकडे वळणे आणि येशू ख्रिस्ताकडे वळणे, आपल्या पापांपासून क्षमा मागणे आणि त्याच्यामध्ये आपल्याला नवीन जीवन देणे आहे.

**रोमकरांस पत्र 10:9 (KJV)**
**" जर तुम्ही येशू प्रभु आहे असे आपल्या तोंडाने घोषित केले आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असे आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवला, तर तुमचे तारण होईल."**

तारण ही देवाने आपल्याला दिलेली मोफत देणगी आहे आणि आपण त्याची मुले बनतो. हे देवाच्या कुटुंबात एक अपरिवर्तनीय स्वीकृती आहे आणि त्याच्या उरवरित निर्मितीमध्ये देवाला प्रतिबिंबित करण्याच्या उद्देशाने पूर्णपणे आणि पूर्णपणे जीवन जगण्याचे सामर्थ्य आहे.



# तुम्ही येशू ख्रिस्ताला स्वीकारले आहे का?

"कारण मनुष्याचा पुत्र हरवलेल्या लोकांचा शोध घेण्यासाठी व त्यांचे तारण करण्यासाठी आला आहे." (लूक 19:10)

**आम्ही तुम्हाला या प्रार्थनेद्वारे येशू ख्रिस्ताला तुमच्या जीवनाचा प्रभु बनविण्यासाठी आमंत्रित करतो;**

"हे प्रभु देवा, मी येशू ख्रिस्ताच्या नावाने तुझ्याकडे आलो आहे. जिवंत देवाचा पुत्र येशू ख्रिस्तावर माझा पूर्ण अंतःकरणाने विश्वास आहे. माझा विश्वास आहे की तो माझ्यासाठी मरण पावला आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले. माझा विश्वास आहे की तो आज जिवंत आहे. मी माझ्या तोंडाने कबूल करतो की येशू ख्रिस्त या दिवसापासून माझ्या जीवनाचा प्रभु आहे. त्याच्यादवारे आणि त्याच्या नावाने मला अनंतकाळचे जीवन आहे; मी पुन्हा जन्माला आलो आहे."

परमेश्वरा, माझ्या आत्म्याला वाचवल्याबद्दल धन्यवाद!
मी आता देवाची मुलगी आहे. हलेलुयाह!"

**अभिनंदन!**
**आता तू देवाचे मूल आहेस.**

**तुयाच्या वचनात राहून, दररोज प्रार्थना करून आणि आपला विश्वास मजबूत ठेवून वाढत रहा. देवाचा तुमच्यासाठी एक अविश्वसनीय प्रवास आहे.**


**ख्रिश्चन म्हणून आणखी वाढण्यासाठी, आमच्याशी संपर्क साधा:**
**UK:** +44 1244 727242 | **USA** +1 448 877 0344
**RSA:** +27 872 654 913 | **ZWE** +263 8677 211 645
**WhatsApp:** 0773 195 955
**Email:** gnd@goodnewsworld.com


SCAN ME



# संरक्षणासाठी पवित्र शास्त्रातील परिच्छेद

तुम्ही देवाच्या सामर्थ्याने वेढलेले आहात, कोणतेही वाईट तुमच्यासमोर उभे राहू शकत नाही!

**यशया 54.**

**14.** मी दृढ आहे, नीतिमत्तेवर आधारलेला आहे. कोणत्याही त्रासापासून दूर, घाबरण्यासारखे काही नाही! दहशतीपासून दूर, ते जवळ देखील येणार नाही!

**15.** जर कोणी माझ्यावर हल्ला केला तर देवाने त्यांना पाठवले आहे असा मी क्षणभरही विचार करणार नाही. आणि जर कोणी माझ्यावर हल्ला केला तर त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही.

**16.** देवाने लोहार निर्माण केला जो त्याच्या फोर्जला आग लावतो आणि ठार मारण्यासाठी तयार केलेले शस्त्र बनवतो. त्याने विध्वंसक देखील निर्माण केले.

**17.** परंतु मला इजा करू शकेल असे कोणतेही शस्त्र तयार केले गेले नाही. जो कोणी माझ्यावर आरोप करेल त्याला खोटारडा म्हणून काढून टाकले जाईल. मी देवाचा सेवक आहे म्हणून मी अशी अपेक्षा करू शकतो की देव हे पाहील की सर्व काही माझ्यासाठी चांगल्यासाठी कार्य करेल.

**देव हेच म्हणतो आणि ते येशूच्या नावाने अपयशी ठरणार नाही!**


**ख्रिश्चन म्हणून आणखी वाढण्यासाठी, आमच्याशी संपर्क साधा:**
**UK:** +44 1244 727242 | **USA** +1 448 877 0344
**RSA:** +27 872 654 913 | **ZWE** +263 8677 211 645
**WhatsApp:** 0773 195 955
**Email:** gnd@goodnewsworld.com


SCAN ME




# जागतिक दृष्टीसाठी जागतिक अर्थसंकल्पाची आवश्यकता असते

गुडन्यूज डेली पार्टनर व्हा



दर महिन्यात, आमचे समर्पित भागीदार अनाथालये, तुरुंग, रुग्णालये, नर्सिंग होम, शाळा, सरकारी संस्था आणि जगभरातील इतर अनेक ठिकाणी लोकांना गुडन्यूज डेली भक्तीच्या विनामूल्य प्रती वितरित करतात. या जागतिक वितरण मोहिमेचा परिणाम म्हणून आम्हाला तारण, उपचार, दैवी तरतूद आणि इतर अनेक चमत्कारांची असंख्य साक्ष मिळाली आहेत.

आमच्यात सामील व्हा आणि देवाच्या या गौरवशाली चळवळीचा भाग व्हा, एखाद्याला नवीन सुरुवात आणि उद्यासाठी नवीन आशा द्या.

**खरेदीचन म्हणून आणखी वाढण्यासाठी, आमच्याशी संपर्क साधा:**
**UK:** +44 1244 727242 | **USA** +1 448 877 0344
**RSA:** +27 872 654 913 | **ZWE** +263 8677 211 645
**WhatsApp:** 0773 195 955
**Email:** gnd@goodnewsworld.com

SCAN ME




एक संदेश

# अनेक भाषा

**कारण ख्रस्तिाच्या संदेशाला भाषेचा कोणताही अडथळा माहति नाही**

गुडन्यूज डेली अनेक मोठ्या प्रमाणात बोलल्या जाणार् या भाषांमधये भाषांतर करण्यादवारे जगभरातील जीवनात बदल घडवून आणत आहे, ज्यामुळे लाखो लोकांना येशू ख्रस्तिाच्या तारण ज्ञानात प्रवेश मळित आहे. राष्ट्रे आणि संस्कृतीमधये, सरवत्र लोक भवषियसूचक वचनाचा सामना करीत आहेत आणि या भक्तीदवारे देवाशी जीवन बदलणार् या चकमकींचा अनुभव घेत आहेत.




गुडन्यूज डेली अडथळे तोडत आहे आणि तयांच्या सवत: च्या भाषेत थेट लोकांच्या हृदयात बोलत आहे. घरे आणि शाळांपासून ते चरच, वदियापीठे आणि अगदी नेते आणि राष्ट्रपतीपर्यंत हे समाजाच्या परत्येक सतरावर पोहोचत आहे.

संदेष्टा उएबरट एंजेलचे भवषियसूचक वचन परत्येक राष्ट्रात आणि परत्येक भाषेपर्यंत पोहोचवून, गुडन्यूज डेली या पढिीतील महान आज्ञा पूरण करण्यास मदत करीत आहे.

GoodNews
DAILY

# आमच्या मध्ये आपले स्वागत आहे
# ऑनलाइन हब



**अधिक शोधा आज आमच्या वेबसाइटला भेट द्या**

प्रौढ, किशोरवयीन मुले आणि मुलांसाठी भक्ती पाहण्यासाठी गुडन्यूज डेली वेबसाइटला भेट द्या, प्रत्येक आपला विश्वास मजबूत करण्यासाठी आणि देवाच्या वचनाबद्दल आपली समज अधिक सखोल करण्यासाठी काळजीपूर्वक लिहिलेली आहे. वेबसाइटमध्ये पेगंबर उएबर्ट एंजेलच्या अंतर्दृष्टी शकिवणी, नवीनतम गुडन्यूज डेली इव्हेंटवरील अद्यतने आणि आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात वाढण्यास आणि भरभराट होण्यास मदत करण्यासाठी डिझाइन केलेल्या संसाधनांची विस्तृत श्रेणी देखील आहे.

आपण दररोज प्रेरणा, सखोल प्रकटीकरण किवा गुडन्यूज वर्ल्डशी कनेक्ट राहण्याचे मार्ग शोधत असलात तरीही, आपल्याला आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट गुडन्यूज डेली वेबसाइटवर एकाच ठिकाणी उपलब्ध आहे.

**सोशल मीडियावर आमच्याशी कनेक्ट व्हा:**
@goodnewsdailydevotional
For daily encouragement, teachings and uplifting messages.

**आमची वेबसाईट**
www.goodnewsdailydevotional.com

# अंक 4 | 2026
## ऑक्टोबर - नोव्हेंबर - डिसेंबर

गुडन्यूज डेली हे स्पिरिट एम्बेसीद्वारे निर्मित एक भक्ती आहे:
गुडन्यूज चर्च, संदेष्टा उएबर्ट एंजेलच्या भविष्यसूचक शिकवणी आणि प्रकटीकरण सामायिक करते. हे येशू ख्रिस्ताच्या संदेशाचा प्रसार करण्यासाठी आणि देवाच्या वचनाने विश्वासणाऱ्यांना सक्षम करण्यासाठी समर्पित आहे.

**अधिक माहितीसाठी, प्रार्थनेसाठी, किंवा सामील होण्यासाठी, कृपया आपल्या स्थानिक शाखेशी संपर्क साधा:**

शाखेचे नाव:
व्यक्तीशी संपर्क साधा:
फोन नंबर:
ईमेल:
पत्ता:

**कॉपीराइट © 2025 by Uebert Angel**
**सर्व हक्क राखीव.**

support@goodnewsworld.com
www.goodnewsworld.com

अधिक माहितीसाठी किंवा आपली साक्ष सामायिक करण्यासाठी:
gnd@goodnewsworld.com | www.goodnewsdailydevotional.com

**ख्रिश्चन म्हणून आणखी वाढण्यासाठी, आमच्याशी संपर्क साधा:**
**UK:** +44 3333 448 612 | **USA** +1 240 781 6942
**RSA:** +27 51 004 0209 | **ZWE** +263 773 195 955
**Email:** gnd@goodnewsworld.com

SCAN ME



For further information on how to grow as a Christian, please get in touch with us at:

UK: +44 1244 727242
USA +1 448 877 0344
RSA +27 872 654 913
ZWE +263 8677 211 645
WhatsApp: 0773 195 955

**gnd@goodnewsworld.com**
**goodnewsdailydevotional.com**

**SCAN FOR YOUR FREE DOWNLOAD**